

# माणूस

५ सप्टेंबर १९७० । चाळीस पैसे

पिस्तुल. हात. एक शरीर. एक क्षण.

मग अर्थात अटक. खटला. कोर्ट. वकील. साक्षी.
जबाब. खोटी समर्थने. खुनाचा हेतू अमूक. तमूक.
'मी' खुनी आहे. वस्तुस्थिती 'मी' आहे. अद्याप.
निकाल. शिक्षा. फाशी.
तिची गजांआडची भेट. निळे निळे डोळे.

दि स्ट्रेंजर

शनिवार, ५ सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : पंधरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ दिनांक २६ ऑगस्टचा 'माणूस' आज मिळाला. बरा वाटला. आठवड्यातून दोनदा-- ही कल्पना उत्तम ! जुन्या वर्गणीत अधिक अंक (दुप्पट) देणार त्याबद्दल धन्यवाद !

चालू 'माणूस'चे मुखपृष्ठ उत्कृष्ट आहे. फडणीसांची शैली---त्याबद्दल जादा लिहिणे न लगे. 'कात्रणे !' मनोरंजक आहे. आता माणूस दोनदा निघणार तेव्हा ---सारखे गंभीर अंक नसावेत. विनोदासाठी--- चुटके, विनोदी कविता, चित्रे, लेख---यासाठी काही पाने राखून ठेवावीत. '४७ दिवस' सारखे 'खास लिखाण' मिळवल्यास तशा प्रकारच्या साहित्याचे नेहमीच मोठे स्वागत होईल.

बऱ्याच दिवसापासून ब. मो. पुरंदरे यांची अनुपस्थिती दिसते, त्यांच्या गोष्टी जरूर द्याव्यात.

२४ ऑगस्ट, १९७० — अण्णाराव गोविंद ढोईजोडे, सोलापूर

◻ पहिला द्विसाप्ताहिक अंक मिळाला. मुक्ताफळे हे सदर आणि 'ठेवी का घटल्या' हा लेख फारच आवडला. व्यंगचित्रात चित्रकलेच्या दृष्टीने जरी गुण नव्हते तरी

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आपण जो रेशमी चिमटा घेतला आहेत तो खरोखर वाखाणण्यासारखा आहे.

२२ ऑगस्ट, १९७० आ. बा. नाडकर्णी, मुंबई

◻ २६ ऑगस्टचा अंक वाचला. मुखपृष्ठ प्रसंगोचित परंपरेप्रमाणे. आपला 'आद्य भूमिक्रान्तिकारक' मनाचा ठाव घेतो. चीड येते. खेद वाटतो. त्यानेच हे पत्र लिहिले. सेना महाराजांची कात्रणे खुशखुशीत.

'द्विसाप्ताहिक' हा उपक्रम स्तुत्य. मात्र बुधवारच्या अंकात वि. म. जोशी नसले तरी सुधाकर राजे हवेत. 'ग्यानबा'च्या बदल्यात 'सेना महाराज' आहेत. कथा चांगल्या हव्यात.

अनिरुद्ध बर्व्यांना आवर्जून धन्यवाद कळवा.

२७ ऑगस्ट, १९७० हेमन्त पत्की, पुणे

◻ आपला दि. २२ चा अंक वाचला. (अर्थात पूर्वीचे वाचले नाहीत असे नव्हे.) सदर अंकात बँक राष्ट्रीयीकरणाच्या संदर्भात श्री. बिवलकर यांनी आम्हा बँक कर्मचाऱ्यांच्या श्रेणीबाबत जे विचार मांडले आहेत त्यांचा वस्तुनिष्ठ परिस्थितीमधून पुर्नविचार व्हावा असे वाटते.

श्री. बिवलकर यांचा ग्रामीण जनतेशी तसा खऱ्या अर्थाने संबंध आला नाही असे म्हणण्याखेरीज सध्या तरी मला गत्यंतर नाही. माझ्या गेल्या १०।१२ वर्षांच्या अनुभवावरून तरी असे आढळून आले आहे की, ग्रामीण जनता इतकी साधी भोळी आणि सहजासहजी Class–Conflict ला बळी पडणारी नाही. अन्यथा खेड्यातील मूळच्या गरीब पण गेल्या १५ वर्षात अकस्मात श्रीमंत झालेल्या, स्थानिक लोकांच्या रहाणीचा परिणाम सर्वसाधारण जनतेवर व्हावयास हवा होता. पण प्रत्यक्षात मात्र तसे काही होत नाही. मग खरोखरीच योग्य श्रमाचा योग्य मोबदला म्हणून बँक कर्मचाऱ्यांना जर दोन पैसे जास्त मिळाले तर त्यावर ओरड होण्याची जरुरी नाही.

सध्याच्या परिस्थितीत २।४ हजार वस्तीच्या खेड्यात जाऊन रहाणे कितपत सुरक्षित आहे याची कल्पना श्री. बिवलकरांनी जरूर लक्षात घ्यावी. शिवाय ग्रामीण शाखेचा स्टाफ ३ किंवा ४ असतो. आणि ही संख्या गावातील महागाई आणि वर्गविद्वेष वाढविण्यास पुरेशी आहे असे म्हणणे म्हणजे आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करणे होय. त्याचबरोबर मी असेही नमूद करू इच्छितो की, सध्यांची वेतनश्रेणी ही कर्मचाऱ्यांनी कोणकोणत्या गोष्टींचे नुकसान सोसून मिळविली आहे याची त्रयस्थांना कशी कल्पना येणार? आजकाल बँक कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीवर बऱ्याच लोकांचा डोळा आहे. पण त्यांच्या Practical अडचणीं (ग्रामीण भागातील) कडे सोयिस्करपणे डोळेझाक केली जाते.

२३ ऑगस्ट, १९७० पी. के. देशपांडे, विटा

◻ ◻ ◻



अरुण गोसावी

# बेळगाव । वसंतरावदादा आक्रमक धोरण । नवी आशा

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आता या क्षणी आपली खुर्ची खाली करून देतो म्हटले तर आपण ती मुळीच स्वीकारणार नाही. तसे अनेक लोक त्या खुर्चीत उड्या मारायला आसुसले असतील. पण आपण तयार होणार नाही.

कारण अर्थातच बेळगाव. हा प्रश्न मोठाच कटकटीचा होऊन बसला आहे. त्यातली मुख्य मेख म्हणजे महाजन कमिशनच्या अहवालाची. कमिशन नेमल्या नेमल्या त्याचा अहवाल बिनशर्त मान्य करू असे आपण सांगून टाकले. कमिशनच्या टर्म्स काय, कुठल्या तत्त्वांवर त्याने विचार करायचा वगैरे गोष्टींची आम्ही थोडीही चिंता केली नाही. आता तेच कमिशन बोकांडी बसले आहे. म्हैसूर म्हणते आहे कमिशनलाच चिकटून रहा. अहवाल येण्यापूर्वीच आम्ही तो स्वीकारू हे सांगितले तो मूर्खपणा झाला, चूक झाली असे स्पष्टपणे सांगून बाजूलाही होता येत नाही.

मग आता महाराष्ट्र सरकारने काय करायचे ? प्रश्न 'तडीला' न्यायचा म्हणजे नेमके काय करावयाचे हाच खरा प्रश्न महाराष्ट्र सरकारपुढे आणि महाराष्ट्र काँग्रेसपुढे उभा आहे. विधानसभेमध्ये, परिषदेमध्ये ठराव केले, महाराष्ट्र काँग्रेसच्या बैठकीत ठराव केले. धमक्या दिल्या. पण काही झाले नाही. मग काय करायचे ? विधानसभेत आरडाओरड करणारे विरोधी पक्ष हात झटकून मोकळे होतात. त्यांचे पक्षबंधू म्हैसूरमध्ये काय करताहेत ? एकाही विरोधी पक्षाच्या म्हैसूर आणि महाराष्ट्र शाखेचे या विषयावर पटते का ? शेवटी प्रश्न सोडविण्याची खरी जबाबदारी काँग्रेसवरच पडते.

काँग्रेस काय करणार ? केन्द्रीय नेत्यांना ज्यावेळी धमकी द्यायला हवी होती तेव्हा शेपूट खाली घातले. मागच्या अधिवेशनात मराठी खासदारांनी धरण्याची भाषा केली तेव्हा दिल्ली हादरली. पण आता दरम्यान परिस्थिती बदलली. इंदिरा-

बाईंची ताकद वाढली. आता धरण्याच्या भाषेला त्या भीक घालणार नाहीत. मग महाराष्ट्र कांग्रेसने काय करायचे ? महाराष्ट्र कांग्रेसने एकच करायला हवे. इंदिराबाईंपुढे खुशाल लोटांगण घालून महाजन कमिशनच्या चुकीबद्दल माफी मागावी. आणि बाईंच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून मूग गिळून गप्प बसावे. जसे चव्हाणांनी मुंबईसाठी नेहरूंशी वर्तन ठेवले तसे. त्याशिवाय दुसरा उपायच नाही.

केन्द्र सरकारवर दबाव आणण्यासंबंधीचे जे हास्यास्पद नाटक गेले दोन आठवडे चालू आहे त्याचा पोकळपणा कुणाच्याच लक्षात येत नाही असे नाही. पण प्राप्त परिस्थितीत दुसरा इलाज काय ? विरोधी पक्षीयांनी विधानसभेत आरडाओरडा करायचा, काम होऊ द्यायचे नाही, आणि मग स्पीकरने सभा तहकूब करायची. घातले नाटक कुणालाच कळत नाही ? विरोधी पक्षीयांच्या ताकदीचा उच्चांक म्हणजे विधानसभेत आरडाओरडा करणे. या वांझ गोंधळाच्या पलीकडे विरोधी पक्ष काहीच करू शकत नाहीत. विधानसभेत कांग्रेसपक्षाची ताकद केवढी प्रचंड ! मनात आणले तर कांग्रेसजन विरोधीपक्षीयांना सहज बाहेर फेकू शकतात. म्हणूनच विरोधी पक्षीय सभागृहात मारामारी करायला धजावत नाहीत. आणि विरोधकांच्या आरडयाओरडयात सरकारला एखादे बिल पास करून घ्यायचे असले म्हणजे कांग्रेसची ताकद बघायला हवी. ‘अनुकूल म्हणतील होय—’ अशी सभापतींनी साद घातली की त्याला कांग्रेसजनांच्या ‘हो ऽऽऽय’च्या जल्लोषाची अशी कानठळ्या बसविणारी प्रतिसाद येते की विरोधकांच्या उरात धडकी बसावी. सभागृहाचे छप्पर उडून जाते की काय असे वाटावे.

पण कांग्रेसची विधिमंडळातील ही प्रचंड ताकद दिल्लीश्वरांपुढे वांझोटी ठरते. मुंबईचे विधिमंडळ तहकूब करण्यापलीकडे महाराष्ट्र कांग्रेस काय करू शकते ?

परंतु आता पुन: एकदा लढाईच्या तुताऱ्या फुंकायच्या कांग्रेसने ठरविले आहेसे दिसते. महाराष्ट्र प्रदेश कांग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील हे नुकतेच दोन महिन्याच्या लांबलचक दौऱ्यावरून परत आले आहेत. पार्लमेंटपुढे धरणे धरणे, इंदिरा सरकारशी असहकार करणे वगैरे कल्पना वसंतदादांच्याच. पण चव्हाण—नाईकांनी सबुरीचा सल्ला दिला आणि वसंतदादा परदेश दौऱ्यावर निघून गेले. म्हणजे एका परीने त्यांनी चव्हाण—नाईकांना बेळगाव प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या पद्धती वापरण्याची एक संधी दिली.

चव्हाण—नाईक (म्हणजे नाईकच. चव्हाणांनी आतापर्यंत काय केले ?) आतापर्यंत तरी आपल्या प्रयत्नात यशस्वी झालेले दिसत नाहीत. त्यामुळे या प्रश्नाची सूत्रे वसंतदादांनी आपल्या हाती घेतल्याचे दिसते. आतापर्यंत दिल्लीश्वरांनी महाराष्ट्राला, वसंतराव नाईकांना या बाबतीत जी वागणूक दिली त्याचा अहवाल ऐकून वसंतदादा भलतेच गरम झाले म्हणतात. ते नुकतेच दिल्लीला जाऊन आले.

पृष्ठ ६२ वर

## □ दास्यमुक्ती ते हास्यमुक्ती — एक प्रवास

संतप्त तरुण तुम्ही पाहिला आहे काय ? नाही ! आम्ही देखील परवा परवापर्यंत पाहिलेला नव्हता. सुप्त तरुण आम्ही पाहिलेले होते. रोज पहातो. पडल्या पडल्या त्यांनी शाळा कॉलिजचा अभ्यास केला. झोपेतून जागे व्हावे तसे त्यांनी चुटकीसरशी लग्न केले. पहाटेच्या स्वप्नासारखी — गोड — बाळसेदार मुले त्यांना झाली. 'लुप्त' राहून संसार केल्याने त्यांची संख्या दो या तीनच राहिली. या मुलांचे हळूहळू नवे कोरे 'सुप्त' तरुण झाले. यथावकाश वार्धक्य येताच ओरिजिनल 'सुप्त' तरुण आडवे झाले.

संतप्त तरुण आंध्र-बंगालमध्ये आहेत असे म्हणतात. मुंबई-पुण्यात संतप्त तरुण म्हणून कविता वगैरे लिखाण करणारी मंडळी आम्ही लांबून पाहिली. ही मंडळी संतप्त झाली तरी काहीही करू शकतील, असे वाटेना. कारण ती 'तरुण' आहेत हेच खरे वाटेना. परंतु अचानक आम्हाला अस्सल संतप्त तरुण दिसला. एक नाही दोन दिसले. अगदी आमच्या घराजवळ. आमच्या गल्लीत.

त्याचे असे झाले. मंगळवार होता. सिगारेटी संपल्या म्हणून त्या आणण्यासाठी आम्ही पानाच्या दुकानापाशी गेलो होतो. रस्ता नेहमीप्रमाणे वहात होता. माणसे जा ये करीत होती. या माणसांना दचकवीत, ढुशा मारीत रिक्शा फुरफुरत होत्या. बैलगाड्या आणि हातगाड्या त्यातूनच वाट काढीत होत्या. अर्धा रस्ता अर्थात गेले दोन महिने खोदलेला होता. तितक्यात कुठूनशा चार-पाच मुली लगबगीने किलबिल करीत आल्या. त्यांच्या हातात पूजेची झाकलेली तबके होती. मंगळागौरीच्या पूजेला त्या निघाल्या असाव्या. यामुळे अंगावर दागदागिने होते. कोऱ्या वस्त्रांच्या सळसळीत, केसातील फुलांचा सुगंध मिसळलेला होता. यातली एक मुलगी तर माझ्या ओळखीची होती. गेल्या वर्षीच ती चांगली M. Sc. झाली होती. आणि तरी आज नऊवारीचा घोळ टाचेवर खेळवीत पूजेला निघाली होती ! नाकात ठसठशीत नथ घालून. डोळयांना सुखावणारा हा घोळका अंगावरून जात असताना आम्ही क्षणभर पाहिला असेल नसेल...तितक्यात शेजारी उभ्या असलेल्या एका दणकट तरुणाचे शब्द ऐकू आले—

'सहन होत नाही वस्या हे मला ! इथे या मुली अंगावर रेशमी वस्त्रे घालतात, आणि तिकडे झोपडपट्टीत लज्जारक्षणापुरते वस्त्रही अंगावर आहे—नाही. इथे सोन्याचा धूर आणि तिथे दारिद्र्याची काजळी. या पूजा, हे हसणंखिदळणं, ही कोरी पातळे, हे दागिने—कुणीतरी अंगावर तापलेल्या पळीने डाग द्यावे तसं होतंय मला—'

मी वळून पाहिले. पाहिले तो आमचा मित्र कुशा भुईनळे. मी पाठीवर थाप मारताच त्याने मला ओळखले. बरोबरच्या मित्राची ओळख सांगितली—

'हा माझा मित्र साथी वशा वाजंत्री...'

आम्ही आपला गाढवासारखा प्रश्न विचारला–
' हे काय करतात ?'
एखाद्या खुळ्याकडे पहावे तसें आमच्याकडे पहात कुशा म्हणाला– ' काय करतात म्हणजे ? पार्टीवर्क...'
आम्ही म्हटले– ' चला चहा घेऊ – घरीच.'
तिघे घराकडे वळलों. कोपऱ्यावर हातगाडीवर बसलेल्या हातगाडीवाल्याने विचारले – ' किती वाजल्याल ?'
कुशाने मनगटावरच्या घड्याळात पाहून त्याला वेळ सांगितली. हातगाडी-वाल्याजवळ घड्याळ नसताना भुईनळे घड्याळ कसे काय बाळगतो ते आम्हाला कळेना. बाकी जाऊ द्या. कसा झाला तरी भुईनळे आपला दोस्त आहे.
घरात चहाची वर्दी दिली. साथी, वाजंत्री व आम्ही सिगारेटी पेटवल्या. कुशा मोकळा होता. बोलत होता–
' मध्ययुगीन धर्म आणि जातिकल्पना यांच्या आधारावर जगणारी माणसे पाहिली की माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाते ! आता आपण पाहिलेल्या मुली ! शिकलेल्या असून मंगळागौरी पूजतात ! गणपतीला जातात. सत्यनारायण करतात. हा प्रस्थापित समाज आपण उखडून टाकला पाहिजे...'
प्रस्थापित समाजात आम्ही नक्की नाही अशा सोयिस्कर कल्पनेने आम्ही आपले म्हटले–
' अरे कुशा, जीवनात गोडवा निर्माण करण्याकरता हा धर्म खूप काही करतो असे नाही तुला वाटत ? माणूस केवळ भाकरीवर जगत नाही–'
मॅन शाल नॉट लिव्ह बाय् ब्रेड अलोन – याचा अर्थ, माणूस केवळ भाकरी खाऊ शकत नाही. लोणी हवे, दूध हवे, गूळ हवा असे सगळे आम्ही त्याला सांगणार होतो. तितक्यात साथी वाजंत्री भलताच पिसाळला–
' साली गणपतीला ही गर्दी. आमच्या पक्षाच्या सभेला कोण नाय आणि त्या पोट सुटलेल्या देवापुढे माणसांच्या रांगा ! इंटलेक्चुअल लोक गणपतीला जातात ! शाळेत सांगतात – Knowledge is power आणि इकडे पहावा तो गणपती पॉवरफुल !'
कुशालाही अवसान चढले.
' या धर्माने हिंदू माणसाला बांधून टाकले आहे. त्याला मोकळा केला पाहिजे. उदरंभरण – म्हणजे भूक लागल्यामुळे खाणे नाही – तर ' जाणिजे यज्ञकर्म ' म्हणे ! जेवण्यापूर्वीदेखील देवाला नैवेद्य ! जेवायचें कसे, झोपायचे कसे, लग्न केव्हा करायचे, कसे करायचे, करायचे नसले तर काय काय करायचे – जन्मा-पासून तो मरेपर्यंत या धर्माच्या दुष्ट चक्रात माणूस गरागरा फिरत रहातो. हजार हातांनी तो माणसाला बांधून टाकतो. हे हात तोडले पाहिजेत–'
आम्हाला आपली एक शंका आली आणि धीर करून आम्ही कुशाला अडवले–
' अरे कुशा, धर्म असून माणूस इतका क्रूर आणि अन्यायी आहे. धर्मच नसता तर काय झाले असते ?'

'तू देखिल प्रस्थापितांपैकीच एक गुलाम आहेस! या प्रस्थापितांनी केवढे जाळे टाकले आहे याची कल्पना नाही कुणाला! हा पु. ल. देशपांडे, तो सुधीर फडके, रणजित देसाई, वसंत कानेटकर...'

'या मंडळींनी तुमचं काय केलं बुवा कुशा? तू पु. ल. देशपांडयाची – 'बटाटयाची चाळ' बघ, 'असा मी' बघ, 'वाऱ्यावरची वरात' बघ, सगळे थिएटर तासन्तास हसत असते...'

'हे हसणंच आम्हाला बंद करायचे आहे. माणसांनी हसत रहावे यापरते समाजाचे दुर्दैव ते कोणते! माधवराव पेशवे, कर्ण, संभाजी यांच्या जीवनावरच्या कादंबऱ्या लोक चवीने वाचतात याचा अर्थ काय? गीत रामायण ऐकायला स्त्री-पुरुषांची झुंबड उडावी? हे हसणं, हा आनंद, हे गायन, यालाच चूड लावल्या-खेरीज दास्यमुक्ती शक्य नाही. मला हे काही सहन होत नाही–'

प्रस्थापित घरातून चहाचे कप आणण्यासाठी मी उठता उठता म्हटले–

'कुशा तू डॉक्टरांना का दाखवत नाहीस तुझी तब्येत एकदा–?'

चहाचा कप हातातून घेता घेता कुशा म्हणाला–

'हसण्यावारी नेण्यासारखा हा विचार नाही आहे. आजचा तरुण असा संतप्त आहे. मी संतप्त आहे. हा वश्या संतप्त आहे....'

'घ्या. चहा घ्या.'

फुर्र...फुर्र...फुर्र...

'पण मला कळत नाही कुशा – यातून काय साधणार आहात तुम्ही?'

'अरे आम्हाला काही का न साधेना. पण आम्ही हे करूच करू–'

फुर्र...फुर्र...

हास्यमुक्त संतप्त तरुण निघून गेल्यावर आम्ही चहाचे कप उचलून स्वैपाकघरात आलो. सकाळपासून – 'वाऱ्यावरची वरात'ची तिकिटे काढायला गेलेले चिरंजीव घरात येत होते. त्यांनी गळयातला ट्रॅन्झिस्टर काढून ठेवला आणि जाहीर केले–

'फक्त दोनच तिकिटे मिळाली कशीबशी!'

'आता हो काय करायचं?' बायको म्हणाली. आम्ही जाहीर केले–


'तिकिट मिळाले असते तरी आम्ही आलो नसतो. हिंदू आर्य-स्त्रियांच्या कल्पनांचा पाठपुरावा करणारा, मध्यमवर्गीयांना खोटा दिलासा देत हसवणारा, प्रस्थापितांच्या सरंजामशाही अर्थव्यवस्थेचा निषेध न करणारा,...हा कार्यक्रम आम्हाला पहायचा नाही. विषम समाजव्यवस्था आहे तशी ठेऊन – संसदीय लोकशाही, नियोजनवादी अर्थव्यवस्था–'

'अहो – तुम्ही तुमच्या खोलीत जाऊन काय ते वडवडा. ते कोण आले होते ते गेले असले तरी थोडया वेळाने दुसरे कुणीतरी येतील...त्यांना सांगा हे सगळं–'

आमचे हसणे तूर्त बंद आहे! पेटलेला 'भुईनळे' आणि संतप्त 'वाजंत्री' यांची ही किमया आहे.

–ग्यानबा

# औषध किमतींचा सावळा गोंधळ



रा. म. बिवलकर

स्वातंत्र्योत्तर काळातील थोड्या फार चांगल्या घटनांची यादी करायला बसलो, तर त्यात औषधनिर्मिती उद्योगाचा विकास आणि त्यात आलेल्या वैविध्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या उद्योगाच्या विकासामुळेच या देशातील रोग-राईचे मान कमी झाले आहे आणि देशातील वयोमान सरासरी दुपटीहून अधिक वाढले आहे. मरणवेग हजारी १५ ने उतरला आहे. पण हे सारे खरे असले तरी, गेल्या १५।२० वर्षात निरनिराळ्या औषधांचे उत्पादनप्रमाण वाढूनही त्यांच्या किमती मात्र कमी न होता वाढतच आहेत ही गोष्ट सामान्य माणसांना नेहमीच खटकत आली आहे. औषधकारखान्यांच्या भपकेदार इमारती, तिथले 'पॉश' वातावरण, भरपूर पगार, भत्ते व कमिशन मिळवणारे त्यांचे प्रतिनिधी, जाहिरातीवर प्रचंड प्रमाणात चालणारा त्यांचा खर्च, डॉक्टरलोकांना वाटले जाणारे मोफत नमुने, त्यांना दिल्या जाणाऱ्या उंची भेटवस्तू, हा सारा रुबाब पाहात असताना हा सारा खर्च बिछान्याला खिळलेल्या गरीब रुग्णाइताच्या खिशातून चालला आहे याची त्याला जाणीव होते. चैनीच्या वस्तूंचे कारखानदारही भरमसाठ नफा ओढीत असतात. पण त्या वस्तू आपल्या खिशाला परवडल्या तरच माणूस घेतो. न घेतल्या म्हणून माणसाचे अडत नाही. पण औषधांचे तसे नसते. ती काही कुणी मजा, चैन म्हणून घेत नाही. अशा जीवनावश्यक वस्तूंचे कडाडणारे भाव सामान्य माणसांना नेहमीच सतावीत असतात. त्यामुळे औषध–कारखान-

दारांचे आणि व्यावसायिकांचे 'ते' वैभव त्याच्या डोळ्यात सलत असते. हे सारे वैभव औषधांच्या भरमसाठ किमती आकारून नफेबाजी करूनच, आणि तेही सामान्य माणसांच्या जीवाशी खेळूनच या मंडळींनी मिळवले आहे अशी त्याची धारणा असते. विशिष्ट औषधाच्या भरमसाठ किमतीमुळे आपण आपल्या जिवलग व्यक्तीला मृत्यूच्या खाईतून बाहेर खेचू शकलो नाही याची जाणीव व त्यातील अगतिकता त्याच्या मनाला सदैव जाळीत असते. 'समाजवादी समाजरचना' निर्मिल्याची 'घोषणा' सतत दुमदुमत ठेवणाऱ्या आपल्या सरकारने याबाबतीत काही करू नये याची खंत त्याला जाचीत असते.

सामान्य माणसाच्या हृदयातील या शल्याने 'उद्रेकाची' पातळी गाठल्यावरच सरकार जागे झाले! (तो त्याचा नेहमीचाच शिरस्ता आहे!) पण आता गाडे निकरावर आले होते. लोकसभेमध्ये पुनःपुन्हा सामान्य माणसाचे हे गाऱ्हाणे मांडले जाऊ लागले व पेट्रोल आणि रसायन मंत्रालयाला त्याची त्वरित दखल घ्यावी लागली. १९६२ सालच्या चिनी हल्ल्यानंतर या समस्येला तोंड फुटले होते. त्यावेळी सरकारने औषधांच्या किमती नियंत्रण करणारा हुकूम काढून १ एप्रिल १९६३ रोजी औषधांच्या किमती गोठविल्या होत्या. एक एप्रिल १९६३ चे औषधांचे भाव मुळातच चढे होते ही त्यावरील ग्राहकांची प्रतिक्रिया होती, तर किमती अशा तऱ्हेने गोठवण्यात औषधनिर्माण उद्योगांवर अन्याय होत आहे अशी कारखानदारांची ओरड होती. म्हणून औषधांच्या रास्त किमती ठरविण्याच्या दृष्टीने सरकारने १९६६ साली तो प्रश्न टॅरिफ कमिशनसारख्या तज्ञ मंडळाकडे सोपविला होता. अनेकविध औषधांच्या कारखान्याला पडणाऱ्या किमती ठरविणे हा मोठा गुंतागुंतीचा आणि कठीण प्रश्न होता. त्यामुळे त्या तज्ञ मंडळाला याबाबतीतील आपल्या शिफारशी करायला दोन वर्षे लागली. टॅरिफ कमिशनने आपला अहवाल १९६८ साली सरकारला सादर केला. पण त्या गोष्टीलाही दोन वर्षे उलटली तरी सरकार काही हालचाल करीना. औषधांच्या किमती तर भडकत होत्या. लोककल्याणकारी राज्यात लोकांना रोजच्या गरजेची औषधेही खिशाला परवडणाऱ्या भावात मिळेनात. लोकसभेतील लोकप्रतिनिधींनी सरकारला धारेवर धरले. आणि १६ मे १९७० रोजी पेट्रोल आणि रसायन मंत्रालयाच्या मंत्र्यांनी— डॉ. त्रिगुण सेन यांनी नवा औषधांच्या किमती नियंत्रित करणारा हुकूम लोकसभेत सादर केला. १७ मेला तो मंजूरही झाला. या हुकुमान्वये १७ मूलभूत औषधांच्या विक्रीच्या किमती ठरवून देण्यात आल्या. इतर मोठ्या परिमाणाने विक्री होणाऱ्या औषधांच्या किमती गोठविण्यात आल्या. औषध निर्मात्यांनी अगर आयात करणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात विक्री होत असलेल्या औषधांच्या किमती सरकारला पंधरा दिवसांच्या आत कळवाव्या आणि त्या किमतीत सरकारच्या पूर्वअनुमतीशिवाय बदल करू नये असाही आदेश देण्यात आला.

यामुळे सतरा मूलभूत औषधांच्या किंमती सरासरीने ३०% कमी होतील आणि विविध औषधांच्या बाबतीतील ही घट १० ते ७० टक्क्यापर्यंत असेल असे सरकारने जाहीर केले होते. हुकूम निघाल्यापासून फक्त १५ दिवसात हे ग्राहकांच्या प्रत्ययाला येईल असे त्यांचे म्हणणे होते.

## सरकारची फटफजिती

पण सरकारने औषधांच्या किमती ठरविल्याचे जे गमक कारखानदारांना कळविले होते त्याप्रमाणे किमती ठरवून तशी किमतपत्रके तयार करायला काही वेळ लागणार होता. ती किमतीपत्रके खेडोपाडी औषधे विकणाऱ्यांपर्यंत पोचल्याशिवाय सामान्य माणसाला त्या नियंत्रणाचा फायदा मिळणार नव्हता. म्हणून १७ मेला औषधांच्या किमती नियंत्रण करणारा हुकूम निघाला असला तरी प्रत्यक्ष किंमती कमी करायच्या त्या १ ऑगस्टपासून असे सरकारने कारखानदाराना कळविले होते. तसे जाहीरही झाले. एक ऑगस्टपासून औषधे स्वस्त होणार म्हणून सामान्य माणूस खूष झाला. पण एक ऑगस्ट अजून दूरच होता तोच सामान्य माणसाला नेहमी लागणाऱ्या सॉरिडॉन-कोडोपायरिन, फ्रुटसॉल्ट, आयोडेक्स्, सल्फा ड्रग्ज्, इन्शुलिन, मल्टि व्हिटॅमिन्स्, व्हिक्स् व्हेपोरब् यांसारख्या अनेक औषधांच्या किंमती बेसुमार वाढत गेल्या. दोन महिन्याच्या अवधीत त्या १० ते ६०% पर्यंत वाढल्या. एक ऑगस्टला किंमती उतरल्या त्या नेहमी न लागणाऱ्या औषधांच्या, काही मुळातच खूप महाग असलेल्या औषधांच्या. तीही औषधे बाजारात नव्हती. त्यांच्या फक्त किंमती कागदावर उतरल्या होत्या ! हा काय प्रकार आहे ते कुणालाच कळेना. लोकसभेत रसायनमंत्र्याना धारेवर धरले गेले. त्यांची बोबडीच वळली. कारखानदारानी सरकारला बनवले की सरकारनेच नियंत्रण गलथानपणे हाताळले ? औषधांच्या किंमती वाढल्या कशा ? उतरलेल्या किंमतींची औषधे बाजारातून गायब झाली कशी ? किंमती वाढविताना सरकारची संमती कारखानदारानी घेतली होती का ? न घेतली असल्यास का नाही ? मंत्र्यांवर अनेक प्रश्नांचा भडिमार झाला. 'मी चौकशी मंडळ नेमतो' या त्यांच्या उत्तराला, केव्हा, त्या चौकशी मंडळाचा अहवाल येऊन किंमतीवर नियंत्रण आणीपर्यंत सामान्य माणसाच्या खिशातले लक्षावधी रुपये कारखानदारांच्या खिशात जातील–याला जबाबदार कोण, असे फटकारले गेले. '२४०० कारखानदारांच्या विविध औषधांच्या रास्त किंमती ठरवायला २।३ वर्षे लागतील म्हणूनच आम्ही त्यांना किंमती ठरविण्याचे 'गमक' दिले होते. १५% पेक्षा अधिक फायदा त्यांना घेता येणार नाही, अशीच पद्धत होती.' ते खरे हो, पण त्यांनी १५% पेक्षा अधिक फायदा घेतला तर त्याचे काय ?' 'तर तो आम्ही त्यांना संशोधन व निर्मिती यावर खर्चायला लावू' – सारीच विधाने गुळमुळीत. डॉक्टर सेन यांची पुरी भंबेरी उडाली. औषध नियंत्रणाबाबत सरकारची फटफजीती झाली.

त्यामुळे सरकार अस्वस्थ होणे साहाजीक होते. काहीतरी त्वरित करायला हवे

होते. आणि १८ ऑगस्टला सरकारने औषध निर्मात्यांना, वितरकांना, विक्रेत्यांना आदेश दिला की, एक ऑगस्टपासून ज्या औषधांच्या किमती कमी केल्या आहेत त्या तशाच ठेऊन, इतर सर्व औषधांच्या किमती १५ मे १९७० रोजी ज्या होत्या त्याच किमतींना ती औषधे विकली पाहिजेत. 'वाजवी किमतीत औषधांचे उत्पादन व वाटप करण्यात ज्या औषधकंपन्या कुचराई करतील, त्यांचे व्यवस्थापन सरकार ताब्यात घेईल.' असा कडक इशारा रसायन खात्याच्या मंत्र्यांनी २० ऑगस्ट रोजी लोकसभेत बोलूनही दाखविला.

मला समजत नाही ते हे की इतकी फजिती उडाल्यानंतरही डॉक्टरसाहेबांनी औषध कंपन्या ताब्यात घ्यायची भाषा सहज बोलावी! धमकी ठीक आहे. पण रास्त किमती ठरवून त्या प्रत्यक्षात आणणे ज्या मंत्रालयाला जमले नाही त्यांनी अशा वल्गना करण्यापूर्वी शक्याशक्यतेचा विचार करायला हवा.

## निर्मात्यांची बाजू

औषधांच्या किमती नियंत्रित करण्याचा प्रश्न धसास लागल्याबरोबर औषध-निर्मात्या कंपन्यांनी, प्रत्यक्ष नियंत्रण न आणताही आपल्या विविध औषधांच्या किमती २२ ते २५ टक्क्यांनी उतरविण्याचे कबूल केले होते. या आश्वासनाचा अर्थ औषध निर्माते भरमसाठ नफा मिळवीत आहेत असाच होता. टॅरिफ कमिशनच्या शिफारसी विचारात घेऊन त्यात काही बदल करून औषधांच्या किमती नियंत्रित करणारा हुकूम निघणार अशी कुणकुण लागल्याबरोबर औषध निर्मात्यांनी किमत-नियंत्रणाच्या सरकारी धोरणावर टीकेची झोड उठविली. दि. ७ मार्च १९७० रोजी, ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे, पाचवी ऑल इंडिया ड्रग ॲण्ड फॉर्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरर्स कॉन्फरन्स भरविण्यात आली. त्या कॉन्फरन्समध्ये, औषधांच्या किमती वाढायला सरकारी धोरणच कसे कारणीभूत आहे हे दाखविणारे अनेक मुद्दे ठासून मांडले गेले. आव्हाने दिली गेली. कॉन्फरन्सच्या मते औषधांचा उत्पादनखर्च वाढविणारे घटक असे :–

१ । पेट्रोल व रसायन मंत्रालय आणि आरोग्य मंत्रालय किमती कमी करा म्हणतात तर अर्थखाते फॉर्मास्युटिकल केमिकल्सवर १०% कर आकारते.

२ : ग्राहकाने औषधाची किमत १०० पैसे मोजली तर त्यात–

१० पैसे ठोक व्यापारी घेतो.
२० पैसे किरकोळ व्यापाऱ्याचे.
२४ पैसे सरकारी विविध कर.
४२ पैसे कच्च्या मालाचा खर्च.
४ पैसे औषध निर्मात्याचा नफा.
१०० पैसे

४ पैसे नफा म्हणजे १०% पडतो. त्यातून रेल्वेभाडे, पोस्टेज, टेलीफोन्स,

जकाती भराव्या लागतात. ते खर्च प्रतिवर्षी वाढतच जातात. याचा परिणाम किंमतीवर होतो.

३ : निर्मात्यांना योग्य गुणवत्तेचा कच्चा माल वेळेवारी मिळत नाही. कारण रसायन-उद्योग या देशात नवा आहे.

४ : सरकारी औषध-उद्योगांच्या किंमतीही कमी नाहीतच.

५ : औषध-उद्योगांना निरनिराळ्या ५०० प्रकारचा, १६–१७ कोटी रुपये किंमतीचा कच्चा माल परदेशातून आयात करावा लागतो. यातील एखाद्या पदार्थाचे उत्पादन देशात सुरू झाले तरी पुरेसे उत्पादन, योग्य भावात, योग्य वेळी पुरविण्याची त्या कारखान्याची ताकद आहे की नाही तेही न पाहता, सरकार तो पदार्थ आयातीच्या यादीतून गाळते. जी रसायने मूळची अमेरिकेची नाहीत ती मदतीच्या कराराखाली अमेरिकेतूनच आयात करण्याची सक्ती केली जाते. यात माल मिळण्यास १८।२० महिन्यांचा विलंब लागतो.

६ : स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशनमार्फतच काही रसायने व औषधे आयात करण्याच्या सक्तीमुळे कमी गुणवत्तेचा माल, अधिक किंमतीत आणि तोही विलंबाने पदरात पडतो.

७ : काही मूलद्रव्यांच्या भारतात पडणाऱ्या किंमती व आंतरराष्ट्रीय किंमती यात भरमसाठ तफावत आहे. उदा०–

| मूलद्रव्य | भारतातील किंमत | | आंतरराष्ट्रीय किंमत | |
|---|---|---|---|---|
| १. क्लोरम्फेनिकोल | ४१० | रु. किलो | १०० | रु. किलो. |
| २. टेट्रासायक्लीन | ८५० | ,, ,, | ६७० | ,, ,, |
| ३. स्ट्रेप्टोमायसीन सल्फेट | ३०४ | ,, ,, | १८० | ,, ,, |
| ४. नायसिनामाईड | १३० | ,, ,, | २७ | ,, ,, |
| ५. आय्. एन्. एच्. | १३० | ,, ,, | ४० | ,, ,, |

डायथिल कार्बामायझिन सायट्रेट, मेन्थाल, अँमिडोपायरिन या रसायनांच्या किंमतीतही अशीच भरमसाठ तफावत दिसून येते.

८ : इंडियन ड्रग्ज् अँण्ड फॉर्मास्युटिकल्स् लि. (I. D. P. L.) ही मूलरसायने निर्मिणारी सरकारी संस्था फार चढ्या किंमती घेते. तरीही म्हणे एक रुपयाच्या विक्रीमागे तिला ९ रु. तोटा सहन करावा लागतो ! आपल्या उत्पन्नाच्या ३३% एवढी रक्कम ही कंपनी आपल्या तीन कारखान्यातील रशियन तज्ज्ञांच्या पगारावर खर्च करते. रशियाशी 'रुपयात व्यवहार' याचा अर्थ त्यांच्या तांत्रिक सहकार्याने चालविलेल्या कारखान्यांच्या गळ्याला असा गळफास लावणे नव्हे ! पण सरकार हे चालू देते.

९ : पॅकिंग मटीरिअलच्या किंमतीही भरमसाठ वाढल्या आहेत. रबर स्टॉपर्स

ॲल्युमिनिअम् स्टॉपर्स, ग्लास बॉट्ल्स्, व्हायल्स्, ॲम्प्यूल्स्, अल्युमिनिअमच्या व प्लॅस्टिकच्या डब्या, आर्ट पेपर, कार्डबोर्ड या वस्तूंच्या किमती परदेशापेक्षा दुप्पट महाग आहेत. बॉक्स्बोर्ड, क्रोम पेपर्स तर तिपटीने महाग पडतात.

१० : शिवाय संशोधनावर बराच खर्च करावा लागतो.

११ : जाहिरातीवर तर मालाचा उठाव. त्यावरही खूपच खर्च करावा लागतो.

सरकार वरील अनेकविध वस्तूंच्या वाढत्या किमतीवर नियंत्रणे घालायला तयार नाही, कच्चा माल योग्य किमतीत वेळेवारी मिळवून द्यायला तयार नाही, I. D. P. L. S. T. C. यांसारख्या अकार्यक्षम कंपन्यांचे पाय आमच्या पायात अडकवणार आणि शिवाय गरीब जनतेची 'कणव' आल्याचा बहाणा करून आम्हालाच किमती कमी करायला सांगणार, वा नियंत्रणे लादणार, वा कारखाने सरकारच्या ताब्यात घेण्याच्या धमक्या देणार. याला काय अर्थ आहे ?

## आक्रस्ताळेपणा

वरील काही मुद्द्यात तथ्य आहे. काही ठिकाणी सत्य दडविण्याचा प्रयत्न आहे. सगळीच औषधे संशोधित नसतात. जाहिरातीचा खर्च, किमती २५% कमी करण्याचे मान्य करतानाही होताच. एकूण उत्पादन खर्चात अनेक खर्च फुगवून लावले आहेत हे लगेच ध्यानात येते. शिवाय कारखानदारांनी हे सारे मुद्दे टॅरिफ कमिशनच्या चौकशीच्या वेळीही मांडले असणारच. त्या सर्वांचा साकल्याने विचार करूनच टॅरिफ् कमिशनने शिफारसी केल्या आणि त्यातील बऱ्याच १६ मे च्या किमत नियंत्रक हुकुमात ग्रथित झाल्या. त्यामुळे कारखानदारांचा वरील कांगावा अगदी उघडा पडतो. औषधांच्या किरकोळींच्या किमती ठरविताना वरील कुठल्याही साध्या औषधाबाबत कारखान्याला पडणाऱ्या किमतीत ७५% वाढ मान्य केली आहे. कारखान्याला पडणाऱ्या किमतीत (Ex-Factory Price) कच्चा माल, त्याचे पक्क्या मालात रूपांतर करण्याचा खर्च, पॅकिंगचा खर्च जमेस धरला जातो. ७५% च्या वाढीत वाहतूक, विक्रीवाढीचा खर्च, इतर सेवा, व्यापाऱ्यांना द्यावयाचे कमिशन आणि उत्पादकाचा नफा यांचा अंतर्भाव होतो.

एखादे औषध निर्माण करण्याकरता थोडेफार प्रयोग करावे लागले असले तर वरील ७५% वाढीच्या जागी १००% वाढ ३ वर्षेपर्यंत देण्याचे सरकारने मान्य केले आहे. काही विशेष मूलभूत संशोधन करून एखादे औषध कारखान्याने बनविले असेल तर पाच वर्षेपर्यंत ती वाढ १५०% द्यायचे सरकारने मान्य केले आहे.

किरकोळ किमती ठरविण्याचे वरील गमक अगदी रास्त आहे. त्यात सर्व प्रकारच्या उत्पादन खर्चांचा तर समावेश आहेच पण शिवाय संशोधनाला चालना देण्याचाही प्रयत्न आहे. यात उत्पादकांना १५% एवढा नफा मिळूनही ग्राहकांचे कल्याण साधावे ही भावना आहे.

१६ मेच्या औषधांच्या किमती नियंत्रण करणाऱ्या हुकुमावर औषध निर्मात्यांच्या

संघटनेने 'संपूर्णतया अव्यवहारी' आणि 'आर्थिक दृष्टया तोटयाचा' असा शेरा तर मारलाच आणि शिवाय सरकारने वरील हुकूम काढताना टेट्रासायक्लीन, स्ट्रेप्टोमायसीन या काही औषधांबाबत टॅरिफ कमिशनच्या शिफारशीपेक्षा चढी किमत ठरवून दिली तर व्हिटॅमिन बी १ व इन्शुलीन यांसारख्या औषधांबाबत कमिशनच्या शिफारसी बाजूला ठेऊन निर्दयपणे कुऱ्हाड चालविली; असा आक्षेप घेतला. संघटनेचा दुसरा आक्षेप असा की औषधांच्या किमती ठरविताना कच्चा माल व सेवा यांच्या ज्या किमती आधारभूत धरल्या गेल्या त्या १९६६–६७ सालच्या आहेत. गेल्या चार वर्षांत या किमती दिडीने वाढल्या आहेत. 'ही गोष्ट विचारात घेऊनच नव्या किमती शक्यतों ठरविण्यात येतील' असे स्पष्ट आश्वासन डॉ. सेन यांनी १३ मेला औषध निर्मात्यांना दिले होते. पण १६ मे च्या हुकुमामध्ये त्याची तामिली झाली नाही. त्यामुळे आम्हाला नाईलाजाने उत्पादनात, रोजगारीत, विक्रीवाढीच्या प्रयत्नात व जाहिरातीत आणि नव्या संशोधनांच्या बाबतीत कपात करण्याचे धोरण अवलंबावे लागेल.


औषध-निर्मात्यांच्या या धमक्या मूळातच निराधार आहेत. आकस्ताळेपणाच्या आहेत. किमत नियंत्रण हुकुमात कुठेच ताठर धोरण ठेवलेले दिसत नाहीत. आज ठरविलेल्या किमती फक्त वर्षभरच कायम रहाणार आहेत. त्यानंतर कुणाही निर्मात्याला वर उल्लेखिलेल्या चौकटीत उत्पादनखर्चाची वाढ दाखवून आपल्या औषधाची किमत सरकारकडून बदलून घेता येईल. इतकेच नव्हे तर या वर्षभरात सरकारही, नवनवीन पुढे उपस्थित होणारे मुद्दे विचारात घेऊन, धंद्याची संपूर्ण चौकशी करून नव्या किमती जाहीर करू शकेल. १५% नफ्याची आकारणीही भांडवल गुंतवणुकीवर न आधारता एकूण विक्रीवर आधारण्याची मुभा देण्यात सरकारने लवचिक धोरणच स्वीकारल्याचे जाणवते; आणि असे असतानाही औषध निर्मात्यांनी तशी गुर्मीची भाषा करावी ही आश्चर्याची गोष्ट आहे.

## त्वरित उपाययोजना

ही आश्चर्याची गोष्ट ठरावी सामान्य माणसांच्या बाबतीत. पेट्रोल आणि रसायन खात्याच्या मंत्र्याना या मंडळींच्या विचारांची दिशा आधी कळायला हवी होती. त्या दृष्टीने, बाजारातून औषधे गायब होणे, औषधांची साठेबाजी व काळाबाजार होणे, औषधांच्या किमती वाटेल तशा वाढविणे, औषधनिर्मितीत भेसळ करणे, बनावट औषधे बाजारात येणे, डिस्कार्डेड मालही बाजारात टाकणे यासारख्या औषध निर्मात्यांच्या संभाव्य 'करणी'वर त्वरित काय इलाज करता येतील, करायला हवेत, कायद्यात काय सुधारणा हव्यात याचा त्यांच्या मंत्रालयाने आधी विचार करायला हवा होता. अत्यंत आत्मकेंद्री, स्वार्थी, अराष्ट्रीय बनलेली या राष्ट्रातील मंडळी स्वार्थाकरता कुठल्याही गोष्टी करायचे टाळणार नाहीत याची कल्पना सरकारला हवी होती. तसा विचार त्यांनी केला असता तर

लोकांच्या मागणीला साद देऊन औषधांच्या किमती नियंत्रण करणारा अर्धा-कच्चा हुकूम त्यांनी घाईगर्दीने काढला नसता! औषधांच्या वाढत्या किमती ही या राष्ट्रातील सर्वकाळची डोकेदुखी आहे. यात भरमसाठ नफेबाजी जशी आहे तशीच अनधिकृत निर्मिती, बनावटगिरी, भेसळ अशा अनेक गुंतागुंतीच्या समस्या आहेत. मानवी जीवनाशी क्रूर खेळ खेळणाऱ्या या उद्योगाला नियंत्रित करताना त्यामुळेच फार सावधगिरीने पावले टाकण्याची जरुरी होती. बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे केंद्र सरकारातील काही मंडळी ज्या लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाली, त्याच लाटेवर प्रवास करण्याची रसायनमंत्र्यांना इच्छा होणे साहजिकच होते! पण या घसरड्या मार्गावर पावले टाकताना त्यांच्या हेही ध्यानी आले नाही की, महाराष्ट्र, गुजराथ आणि तामिळनाड या तीनच राज्यात फक्त फुलफ्लेज्ड् ड्रग कंट्रोल अॅडमिनिस्ट्रेटर्स आजवर नेमले गेले आहेत. इतर १५ राज्यात औषधनिर्मिती-वितरण यावर नियंत्रण करणारी यंत्रणाच सुस्थित प्रमाणात उपलब्ध नाही! वरील प्रगत (!) म्हणविल्या जाणाऱ्या राज्यातही या कामाकरता इतकी थोडी माणसे नेमली आहेत की, ड्रग इन्स्पेक्टर राज्यातील प्रत्येक औषध कारखान्याला फक्त एकदाच भेट देऊ शकतो. केमिस्टांच्या दुकानी तर दोन वर्षातून एकदा तरी त्यांची पायधूळ पडते की नाही कोण जाणे! अशा अवस्थेत देशात शेकड्यांनी अनधिकृत औषधनिर्माते आहेत, अनधिकृत वितरक आहेत, ड्रग कंट्रोलखाली न येणारी औषधे निर्माण करणारे आहेत, भेसळ करणारे व बनावट औषधे निर्मिणारे आहेत, त्यांच्या कारवायांना अडसर बसायचा कसा? मूळ देशात ज्या औषधांवर बंदी अगर निर्मितीवर नियंत्रण आहे ती औषधे भारतात मोकळेपणाने विकली जातात तरीही सरकार काही करू शकत नाही. मग सरकारी यंत्रणा एवढी शिथिल असताना किमत नियंत्रणाची घाई करणे अगर 'औषधकंपन्या ताब्यात घेण्याची' भाषा बोलणे कितपत रास्त आहे याचा डॉ. सेन यांनी अगर नामदार झकेरियांनी विचार करायला नको का?

सरकारच्या अशा अर्धवट धोरणामुळे ग्राहकांना किती भूर्दंड पडतो याची जाणीव मंत्र्यांनी ठेवायला नको का?



# विचारवेध

समीर

## ◻ ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचे कार्य


डॉ. तेलो मॅस्करेन्हस दहा वर्षांच्या प्रदीर्घ कारावासानंतर सुटून भारताला परतले तेव्हा त्यांना विचारण्यात आले, तुमच्या सुटकेसाठी सर्वात अधिक प्रयत्न कोणी केले ? त्यांनी उत्तर दिले : ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संस्थेने. ॲम्नेस्टीने डॉ. मॅस्करेन्हस यांच्या सुटकेसाठी खरोखरीच फार चिकाटीने प्रयत्न केले, परंतु या संस्थेच्या प्रयत्नामुळे मुक्त झालेल्या अशा प्रकाशातल्या व्यक्ती फारच थोड्या आहेत. कारण ॲम्नेस्टीचा मुख्य भर 'सामान्य' म्हणून ज्याचे वर्गीकरण झाले आहे अशा राजकीय कैद्यांना दिलासा देणे व प्रसंगी स्वातंत्र्य प्राप्त करून देणे यावर आहे. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचे सरचिटणीस मार्टिन एनल्स नुकतेच भारतात येऊन गेले तेव्हा जगात सर्वत्र राजकीय मतभेदामुळे कारावास भोगणाऱ्या कैद्यांच्या मुक्ततेसाठी चिकाटीने प्रयत्न करणाऱ्या या संस्थेच्या कार्याची त्यांनी पुढील माहिती दिली :

आपल्या राजकीय मताची किंमत म्हणून कारावास भोगणाऱ्या सामान्य जनांचे ॲम्नेस्टीला विशेष महत्त्व वाटते, कारण 'आपला विसर पडलेला नाही ही जाणीव कैद्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाची असते.' 'मानवी हक्क हे आंतरराष्ट्रीय असतात. 'निरनिराळ्या देशातल्या सरकारांना—प्रतिकूल मताच्या सरकारांनाही—आता हळूहळू हे सत्य पटू लागले आहे. 'आम्ही त्यांना जाणीव करून देतो की देशातल्या जनतेचे मत जरी दाबून टाकता आले तरी आंतरराष्ट्रीय मत दाबता येत नाही' आणि हे खरे असल्याचे या संस्थेच्या अहवालावरून दिसते. कारण या संस्थेने एखाद्या कैद्याच्या प्रकरणावर प्रकाश टाकल्यानंतर त्याची सुटका लवकर झाल्याचा 'योगायोग' अनेक वेळा घडला आहे. आतापर्यंत ॲम्नेस्टीने २०० हून अधिक कैद्यांची सुटका घडवून आणली आहे.

पण सामान्य राजकीय कैद्यांच्या वतीने ॲम्नेस्टीने चालविलेला हा लढा दंगेखोर चळवळीच्या मार्गाने नव्हे तर मन वळविण्याच्या मार्गाने चालतो, व त्याची साधनेही अशीच निरुपद्रवी असतात. त्यातले एक साधन म्हणजे पोस्टकार्ड. ॲम्नेस्टीजवळ

सुमारे ८,००० कैद्यांची यादी आहे, त्यातली तीन नावे दर महिन्याला निवडली जातात; ती निवडली गेली की लगेच अॅम्नेस्टी–सदस्य त्या देशाच्या सरकारवर पोस्टकार्डांचा वर्षाव करतात. हल्ली या संस्थेच्या शाखा २५ देशात आहेत. हे सर्व देश मिळून ७०० सदस्य–गट आहेत, व एकूण सदस्य–संख्या १५,००० आहे, यावरून पोस्टकार्डांचा पाऊस किती मोठा पडत असेल याची कल्पना येईल. अॅम्नेस्टी–गटांच्या कार्यपद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते स्वतःच्या देशातल्या कैद्यांचे प्रकरण कधीच स्वतः हाताळीत नाहीत, इतकेच नव्हे तर आपल्या देशांतल्या राजकीय कैद्यांची माहितीही पुरवीत नाहीत. या संघटनात्मक चातुर्यामुळे सदस्यांचे मन एखाद्या प्रकरणात अनिष्ट रीतीने अडकत नाही. अॅम्नेस्टीचे लंडनमधील केंद्र–कार्यालय दर गटावर तीन कैद्यांची सुटका घडवून आणण्याचे कार्य सोपविते. एकदा ही निवड झाली की तो गट केवळ त्या कैद्यांशी व त्यांच्या कुटुंबियांशी संबंध प्रस्थापित करून त्यांना दिलासा देण्याचे कार्य करतो.

लंडनच्या 'ऑब्झरवर' दैनिकात दिनांक २८ मे १९६१ रोजी एक लेख प्रकाशित झाला त्यातून अॅम्नेस्टीचा जन्म झाला. आता ही संस्था जगभर पसरली असून तिची सदस्य-संख्या वाढत आहे. या संस्थेला यूनो, युनेस्को व कौन्सिल ऑफ युरोपची सल्लागार संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. 'ग्रीक तुरुंगातल्या कैद्यांच्या दुर्दशेवर या संस्थेने जो अहवाल दिला तिचा परिणाम म्हणजे ग्रीसला कौन्सिल ऑफ युरोपमधून काढून टाकण्यात आले.' तरीदेखील या संस्थेचा मुख्य भर साधारणपणे राजकारणापासून दूर राहणाऱ्या मंडळींवर आहे.' या संस्थेला राजकीय पातळीवर नव्हे तर 'मानवी' पातळीवर कार्य करणे अधिक आवडते. दक्षिण आफ्रिका, पोर्तुगाल व ऱ्होडेशियासारख्या काही देशात अॅम्नेस्टीच्या ध्येयाला अजून फारसे महत्त्व मिळालेले नाही. पण इतर देशांतल्या सरकारांना 'आता हळूहळू उमज पडू लागली आहे.' ज्या ठिकाणी ही उमज पडायला उशीर लागतो तेथेही अॅम्नेस्टी इंटरनॅशनल आपल्या प्रतीकाला साजेल अशा सातत्याने कार्य करीत राहते. ते प्रतीक म्हणजे काटेरी तारांच्या कुंपणात बंदिस्त असूनही संथपणे मिणमिणणारी मेणबत्ती.



रातराणी । विजय तेंडुलकर

काम्यू प्रेमिकांसाठी

# दि स्ट्रेंजर

कोणी एक मी.

कोणीही.

कदाचित तुम्हीच. किंवा मीच. किंवा रस्त्यात दिसला न दिसला अंगावरून निघून जाणारा आणखी कोणी.

ते महत्त्वाचे नाही. या तपशिलाच्या गोष्टी.

या 'मी'ची आई मरण पावते.

ज्यांचे कोणी नाही अशा वृद्धांसाठी चालवण्यात येणाऱ्या अनाथाश्रमात मरण पावते.

ती मेल्याचेच आश्रमामार्फत कळते.

मग 'मी' आश्रमात जातो.

शवपेटी ठेवलेली असते तिच्या पुढ्यात बसतो.

तिथला ओठंगलेला मूड. पुष्कळसा अंधार. क्षीण उजेड. विलक्षण शांतता. पलीकडे पाठमोरी बसून मृतासाठी बायबल-पठण करणारी जोगीण. चढणारी रात्र मनात कसल्याही संवेदना नसलेली एक कायम बथ्थड जाणीव.

आई गेली. आईगेलीआईगेलीआईगेलीआईगेलीआ—

कोणी तरी खायला आणून देते; तेव्हा कळते भूक लागली आहे.

सकाळ फटफटते तेव्हा कळते, झोपलोच नाही.

शवयात्रेसाठी माणसे जमतात. सगळी म्हातारी. सगळीच अनाथ. शोकप्रदर्शन करता करता नकळत उघड्या दंतविहीन तोंडांनी पेंगणारी. एकाचे डोळे सारखे झरत असतात. हा आईचा मित्र; अनाथाश्रमातला. शवयात्रेत हा वेगळी वाट शोधून स्मशानात सर्वांआधी पोचण्यासाठी आपला एक अधू पाय ओढीत लगबगत चालतो.

भाजते उन्ह. साडेतीन हात खड्डा. आईचा मित्र घेरी येऊन खड्ड्यातच आईच्या शवपेटीवर पडायचा, पण वाचतो.

मनात एकच घण पुन्हा पुन्हा पडत रहातो, आई आज गेली.

की काल ?

पण त्याला महत्त्व तरी काय.

आई गेली.

प्रश्न गैरलागू. उत्तरे नाहीत.

आईला पुरून 'मी' शहाराकडे परततो.

कुठे काही कमी नाही, जास्त नाही. सारे चालायचे तसे चालले आहे. चाळीतला कुत्रेवाला थेरडा चुकार कुत्र्याच्या नावाने चिरचिरायचा तसाच तो चिरचिरतो आहे. जणू आई गेलीच नाही. किंवा आई नावाचे काही झालेच नाही. एक भास. आपल्यासकट.

आपण सुद्धा खातो पितो आहोत, श्वासोच्छ्वास करतो आहोत, दाढी करतो आहोत, सिगारेटी जाळतो आहोत, हिंडतो फिरतो आहोत, नोकरीवरसुद्धा जातो आहोत, नोकरीवर कोणी म्हणतो, वय काय होते ? हूं, फारच होते. म्हणजे काही हरकत नाही...

'मी'ला जुनी मैत्रिण भेटते. दोघे मौज करतात. ती लग्नाचा विषय काढते. तो तो विषय शिताफीने टाळतो. दोघे समुद्रकाठी जातात. पोहतात, वाळूत लोळतात, भटकतात, झोपतात. एका दुसऱ्या जोडप्याशी मैत्री करतात. त्या जोडप्यातल्या पुरुषाच्या वाटेला एक अरब जातो त्याची चीड उगाच येऊन 'मी' त्या पुरुषा-बरोबरच अरबाच्या शोधात निघतो. दोन प्रहरचे अल्जीरियातले भयानक उन्ह वरखाली जाळ पेटावा तसे पेटलेले असते. डोळे दिपत असतात. शरीर जळत असते, तो अरब. त्याचा जोडीदार. दोघे तरुण. रसरशीत. तगडे. उघडे. ते पहातात. 'मी' आणि त्याचा जोडीदार उलट पहातो. जोडीदार पिस्तुल काढतो. 'मी' ते ओढून घेतो. उन्ह. जाळते उन्ह. दिपवणारे चकचकते उन्ह. बथ्थड डोके. तारवटल्या संवेदना. उघडी शरीरे. भयंकर निःस्तब्धता. रोखल्या नजरा. अरब हलतात. एक पळतो. दुसरा ताठ. पिस्तुल. दुसऱ्याची रुंद, हलती छाती. पिस्तुल. दुसऱ्याची धोके-बाज रोखली नजर. पिस्तुल. चाप. आणि दुसऱ्याची आकस्मिक हालचाल. चाप. गोळी. एक. दोन. तीन. चार. कोसळले शरीर. झटके देणारे शरीर. रक्त. पाच. सहा. पिस्तुल रिते. सर्व गोळ्या त्या शरीरात. त्या निष्प्राण, पसरल्या, विच्छिन्न, तरण्याबांड शरीरात. अनोळखी शरीरात.

खून.

का ? कसा ? कशासाठी ? प्रश्न नाहीत. कारण उत्तरे नाहीत.

फक्त वस्तुस्थिती. बस्स ? एक पिस्तुल. एक हात. एक शरीर. एक क्षण. एक भयंकर क्षण.

मग अर्थात अटक. खटला. कोर्ट. वकील. साक्षी. जबाब. तपासण्या. आरोप. समर्थने. उलटसुलट युक्तिवादांच्या कंटाळवाण्या कसरती. खुनाचा हेतू अमूक होता, खुनाचा हेतू तमूक होता. 'मी' खुनी आहे, 'मी' स्खलनशील आहे. 'मी' सज्जन आहे, 'मी' पाजी आहे—

वस्तुस्थिती : 'मी' आहे. अद्याप आहे.

निकाल. शिक्षा. फाशी. मैत्रिणीची गजांआडची भेट. पाणावून हसणारे निळ निळे डोळे. पुन्हा समुद्रावर जाऊ...मजा करू...तू सुटशील...नक्की...(लग्नाची आता बात नाही...)

धर्मगुरूची मरणपूर्व भेट. तुरुंगातला एक उपचार. ईश्वराला शरण जा. पापांची कबुली देऊन स्वच्छ हो. तो दयाघन आहे...तो क्षमा करील...

पण तो कुठे आहे ? त्याच्या अस्तित्वाचा पुरावा कोठे आहे ? या अर्थहीन, हेतूहीन अस्तित्वाला शेंडा कोठे आहे, बुरखा कोठे आहे ? या त्रिशंकू अस्तित्वाला वाली आहे कोण ? आणि ज्या अस्तित्वावर आपला ताबा नाही त्याबद्दल क्षमा-याचना कसली आणि कुणाकडे ?

'मी'चा अंतरात्मा त्याला निक्षून सांगतो, या प्रकारचे काही नाही. जे दिसते, जाणवते, भोगावे लागते त्यापलीकडे अस्तित्व नाही. आणि जे दिसते, जाणवते, भोगावे लागते ते तर जगण्याच्या योग्यतेचे अस्तित्व नाही. आहे ते सर्व अर्थहीन; आणि त्याच्या पूर्वी आणि नंतर देखील सारे अर्थहीनच. एक न संपणारी अकारण, अहेतुक, बेवारस, अनाथ, अशी अर्थहीनता–हे अस्तित्व. हे नाकारता न येणारे अस्तित्व.

आत शून्य. बाहेर शून्यच. पोकळी केवढाली तरी.

प्रथमच 'मी'चे रखरखीत डोळे थोडे झरतात, थोडे वहातात. कशासाठी ? कोणासाठी ? काही नाही. उगीच. एक शारीरिक प्रक्रिया म्हणूनच. डोळयांनी झरायचे तरी कोणासाठी आणि का ?

दारे खडाखड उघडतात. 'दूत' खाड् खाड् आत येऊन पोचतात.

फाशीचा समय समीप आलेला असतो.

चुकार हात मागे गच्च बांधले जातात-जे कधीच मालकाच्या हुकुमाने वागले नाहीत ते मालकाचे उरत नाहीत.

शर्टाची कॉलर टरकावली जाते. ही दोरीची व्यवस्था. आता गळा उघडा राहील.

पोकळीतून पोकळीत प्रवास. अस्तित्वाच्या अंधारातून मृत्यू नामक अंधाराच्या दरीकडे प्रस्थान.

एकजण आला. वाढला. जगला. मारले. मेला. बस्स...

'दि स्ट्रेंजर' या चित्रपटाची ही अशी कथा. 'आउटसायडर' या इंग्रजी नावाने आपल्याकडे परिचित असलेल्या एका जगद्विख्यात आधुनिक कादंबरीतून ही घेतलेली आहे. या कादंबरीचा कर्ता आल्बेर काम्यु हा अस्तित्ववादा ( Existentialism ) च्या पंथाचा मानला जातो. म्हणजे तो स्वतः पूर्वीच एका अपघातात मरण पावला परंतु त्याचे साहित्य या पंथात मोडते. 'आउटसायडर' ही त्याची सर्वात महत्त्वाची साहित्यकृती. मानवी जीवनामागील अर्थहीनतेचा, ॲब्सर्डिटीचा एक विलक्षण अलिप्त

आणि त्रासदायक प्रत्यय ही कादंबरी घडवते. कादंबरीतील 'मी' च्या वृत्तात नकळत वाचक पाय ठेवतो आणि मग या 'मी' चे जगणे आणि या जगण्यात माणसाची कशी भयंकर कोंडी होते त्याविषयीचे त्याचे शुष्क,जवळजवळ निर्विकार, तपशीलवार वाटणे, नकळता वाचकाचे सारे स्वास्थ्य, समाधान पोखरत जाते. 'जगायची पण चोरी आहे, मरायची पण चोरी आहे' या स्वरूपाचे या कादंबरीतले 'मी' चे अस्तित्व असह्य होते; पण या कादंबरीचे, त्यातही तिच्यातील शुष्क, निर्विकार आणि आत आत एकादा हुंदका शोषणाऱ्या निवेदनाचे सामर्थ्य एवढं प्रचंड आहे की ही कादंबरी मध्ये सोडूनही मोकळे होता येत नाही. जणू उःशाप नसलेला हा एक शापच शापित काम्यूने या जीवनाकडे भिरकावला आहे.

अशा या तापदायक कादंबरीवरचा व्हिस्कांनी दिग्दर्शित चित्रपट कोणत्याही प्रकारे सुखद असणे शक्यच नाही. परंतु हा 'द स्ट्रेंजर' चित्रपट मात्र कादंबरी-इतका तापदायक तर नाहीच परंतु उलट आपल्या तांत्रिक अंगांनी दृष्टीसुख देणारा आहे. एक तर तो रंगीत आहे. मग हे रंग नजरेला भावणारे असावेत हे आलेच. त्यानुरूप दृश्ये सुबकपणे चित्रित होणेही मग पर्यायाने येते. परिणामी हा 'स्ट्रेंजर' 'आउटसायडर'चा मनस्वी रखरखीतपणा आणि त्यातला अल्जीरियन उन्हाचा जाळ सुसह्य करीत आपल्यापुढे उलगडत जातो. एका अर्थाने दहा इतर चित्रपटांसारखा होतो. 'आउटसायडर' च्या तळपत्या, तारवटल्या वास्तवाचे या 'स्ट्रेंजर'मधील सुबक, रंगीन वास्तवाशी फारसे नाते उरलेले नाही.

तसेच कादंबरीतील 'मी' अध्याहृत, अशरीरी आहे. ते एक वाट चुकलेले, वाट नसलेले अस्तित्व आहे. तो मी असेन, तुम्ही असाल. कोणीही असू शकेल. चित्रपटात या 'मी'ची भूमिका मार्सेल्लो मास्त्रिआनी या देखण्या इटालियन नटाने केली आहे. चित्रपटातील 'मी' एक निश्चित व्यक्तिमत्त्व आहे. यामुळे कादंबरीतील अदृश्य, अनिश्चित 'मी'च्या मगरमिठीत वाचक जेवढा घुसमटतो, तगमगतो, तेवढा या चित्रपटातल्या दृश्य आणि निश्चित 'मी'च्या अस्तित्वाने तगमगत किंवा घुसमटत नाही. दिग्दर्शकाने आपले कसब पदोपदी दाखवूनही 'स्ट्रेंजर' उपराच रहातो. सर्व भूमिका—छायाचित्रणासकट—दर्जेदार वठूनही तो पुरेसा प्रभावी ठरत नाही.

परंतु ज्यांना 'काम्यू'विषयी प्रेम आहे त्यांना हा अवश्य पहावसा वाटेल. 'आउटसायडर'च्या मोठेपणाचा प्रत्यय हा प्रभाव हरवून बसणारा 'स्ट्रेंजर' पाहूनही मिळतो. काम्यूच्या कादंबरीतील उतारे महत्त्वाच्या प्रसंगी ऐकविणाऱ्या दिग्दर्शकाने, हाती चित्रपटासारखे जबरदस्त दृश्य माध्यम असताही काम्यूच्या निवेदनशैलीपुढे कसा पराभव मान्य केला आहे हे जाणवते आणि काम्यूविषयीचा आदर दुणावतो.

प्रभावी कलाकृतीचा हाच निकष ठरण्याला हरकत नाही. तिची मोडतोड करणारालाही तिला सलाम करावाच लागतो.

□ □ □



तू दारावर टकटक करतेस आणि मी दार उघडतो.

तेव्हा माझ्या एका हातात सिगरेट असते आणि दुसऱ्या हातात दारूचा प्याला.

तू आत येतेस आणि खुर्चीवर बसतेस. मी समोरच पलंगावर बसतो. हातातला पेला रिकामा करतो. मनगटाने तोंड पुसतो. तुझ्या कपाळावर नापसंतीची आठी उमटते आणि मी हसतो. भेसूर प्रेताने हसावे तसे.

तुला हुंदका येतो. पदराने डोळे पुशीत तू म्हणतेस, अरे काय दशा करून घेतलीस ही स्वतःची.

मी पुन्हा हसतो. तसाच. आणखी काहीच करता येणं मला शक्य नसतं.

"असं कसं केलंस रे तू ? दारू का प्यायला लागलास ? आणि शरीराची काय माती करून घेतलीस ?"– तू बड-बडत राहातेस.

मी ऐकत राहातो. बोलत नाही. मला काही बोलताच येत नसतं. तुझ्या बोलण्या-कडे माझं लक्ष असतं; नसतंही.

मग मलाच कंटाळा येतो; स्वस्थ बस-ण्याचा.

मी उठतो आणि कपाटातून बाटली काढतो. मी ती पेल्यात रिकामी करणार इतक्यात तू माझा हात धरतेस.

"नको रे घेऊ; निदान माझ्यासमोर तरी नको."

पण माझ्या हातावरील तुझ्या पकडी-पेक्षा माझी बाटलीवरील पकड अधिक घट्ट असते. मी दारू पेल्यात ओततोच. आणि तो उचलून तोंडाला लावतो. तू हाताच्या थपडीने तो उडवून लावतेस.

"इतकंही ऐकायचं नाही माझं ?"

"नाही." माझा पहिला शब्द.

"का ?"

"........."

"तुझं पत्र आलं म्हणून तर आले. ते हे पहायला नाही."

तरीही मी गप्पच. मला तुझ्याशी वाद करायचा नसतो.

"बोलत का नाहीस तू ? पटत नाही का मी काय म्हणत्ये ते ? चार वर्षां-पुर्वीचा तू कुठे आणि आजचा तू कुठे ? चार वर्षांपूर्वीची तुझी किर्ती तू साफ धुळीला मिळविलीस. तू साऱ्या कॉलेजचा स्कॉलर होतास. सारं जग तुझ्याकडे आदराने, अपेक्षेनं बघत होतं. मीही केवढ्या

---

**समाजाला मीरा पसंत नसतात.**
**समाज त्यांना 'बावरी' म्हणतो.**
**तू 'बावरी' झाली नाहीस.**
**शहाणपणाने वागलीस.**
**चूक माझीच.**
**शिक्षा मलाच.**

---

**लक्ष्मण लोंढे**

---

# शिक्षा

आशांवर जगत होते ! तुझ्याशी असलेल्या ओळखीचीही फुशारकी मारत होते. माझ्या बरोबरीच्या इतर मैत्रिणीसुद्धा मला म्हणत असत, "तुझ्याबरोबर कसं त्याचं जमतं देव जाणे. आम्हाला तर त्याची भीतीच वाटते."

मी मक्खपणे हसतो.

"बी. ए. च्या वर्गात असताना आपण किती जवळ होतो एकमेकांच्या ! तू नसलास तर वर्गात चुकल्याचुकल्यासारखं होई मला."

"हं, आपण जवळ होतो,...तसं होत असे."

"होतो नाही, आपण अजूनही तितकीच जवळ आहोत. माझं लग्न झालं तरी."

"खरंच ?" माझा प्रश्न.

"हो, का. तुला नाही तसं वाटत ?"

"नाही." माझ्या उत्तरातला थंडपणा तुला जाणवतो. तू शहारतेस.

"का, असं का रे म्हणतोस ?" कळवळून तुझा प्रश्न.

तुझा कळवळा मला दिसतो. जाणवत मात्र नाही.

मी काहीच बोलत नाही.

तू गुदमरल्यासारखी दिसतेस.

"बोल ना रे काहीतरी. माझं चुकलं असं तुला वाटत असेल तर मारसुद्धा काढ माझा. माझं चुकलं असेल तर त्याची शिक्षा अशा रीतीने तू स्वतःला घेऊ नकोस."

थोडा वेळ थांबून तू पुढे म्हणतेस.—"खरं आहे; तुझं पत्र मिळाल्याला दोन महिने होऊन गेले. तेव्हा मी येऊ शकले नाही तरी ताबडतोब मी तुला उत्तर धाडलं होतं. तुला मिळालं असेलच ना ते ?

"हं, मिळालं होतं."

"किती कळवळून मी तुला लिहिलं होतं—फार फार वाईट वाटलं होतं मला तुझं पत्र वाचून. एवढा हुषार आणि तडफदार मुलगा एकाएकी मोडावून का जावा ? जीवनात निराश का व्हावा ? आत्महत्येला तयार का व्हावा ? दोन दिवस विचार करीत होते मी त्याच्यावर. तुझ्या आत्महत्येची कल्पनाच सहन होत नव्हती मला. आणि नंतर मी तुला लिहिलं होतं – हे आत्महत्येचे विचार काढून टाक मनातून. पुन्हा उभारी घे. राखेतून उठणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे."

"हो, मला जाणवलं."

"काय ?"

"चार वर्षांत तुझी भाषा फारच सुधारली होती. चांगलं लिहू शकतेस तू आता."

"एवढंच जाणवलं ? आणखी काही नाही ? पत्रामागच्या भावना नाही जाणवल्या तुला ?"

"होत्या का काही भावना त्याच्यामागे ?" मला राहावत नाही, सहन होत नाही, आणि माझ्या तोंडून सटासट शब्द बाहेर पडतात– तूच काय, अग मी दुसऱ्या कोणालाही तसं पत्र लिहिलं असतं तरी त्यानं मला त्याच शब्दात बजावलं असतं. आत्महत्येचा विचार सोडून दे. अजून चांगल्या मार्गाला लाग म्हणून. असं कोणीच सांगितलं नसतं की छान करतोस दारू पितोस ते. अजून असाच खोल खोल खाली गर्तेत जा. म्हणूनच मी दुसऱ्या कोणालाच लिहिलं नाही. बोलावलं नाही. फक्त तुला लिहिलं. तुलाच का माहीत आहे ? आपले पूर्वापारचे ऋणानुबंध. तुझ्याशिवाय कोणापाशीच मला माझी व्यथा उघड करायची नव्हती. करता येत नव्हती. तितकं जवळचं मला कोणी नव्हतंच. एक जुना प्रसंग आठवतो तुला ? मी एकदा बी. ए. च्या वर्गात असतानाच तुला म्हटलं होतं, की मला आत्महत्या करावीशी वाटते म्हणून. तू आपल्या कानशिलावर बोट मोडून म्हणाली होतीस, इडा पिडा टळो अमंगळ पळो. आणि म्हणाली होतीस – असं नाही हं काही वेड्यासारखं करायचं. असा विचार आलाच कधी मनात तर मला बोलाव. जगाच्या पाठीवर असेन तिथून मी धावत येईन. आणि मीच तो विचार तुझ्या मनातून काढून टाकीन. अजून तो प्रसंग मला आठवतो. तूही कदाचित विसरली नसावीस. म्हणून तुला लिहिलं. तर हे तुझं पत्र. कोरडं. तू निराळं विशेष काय लिहिलंस ? मी तुला बोलावलं होतं, आलीस ?"

एवढं बोलून मला गळल्यासारखं होतं. माझं डोकं तापतं. पुन्हा हात दारूच्या पेल्याकडे जातो. पण मी तो आवरतो. बोललो नसतो तर बरं झालं असतं असं वाटतं. कपाळावर हात ठेवून मी स्वस्थ बसतो.

बऱ्याच वेळानंतर तू बोलू लागतेस–" कसं रे तुला समजावून सांगू ? तूच विचार कर. एका विवाहित स्त्रीला तिच्या पूर्वायुष्यातील एक मित्र एकटीला बोलावतो भेटायला कुठे तर दोनशे मैल अंतरावरच्या शहरात. कशी येऊ शकले असते मी ? ह्यांना तरी कसं पटवून देऊ शकले असते ?"

"हं." माझा एक उसासा. "खरं आहे."

"तरी बरं तुझं ते पत्र ह्यांच्या हातात नाही पडलं. दोन दिवस काही सुचत नव्हते मला. ह्यांनी विचारलंसुद्धा काही होतंय का तुला म्हणून. शेवटी आता इकडे काम निघालं म्हणून आले. तडक प्रथम तुला भेटायला आल्ये. ते कामसुद्धा अजून तसंच राहिलंय्."

"पण आता फार उशीर झालाय् ग. माझी आत्महत्या झालेली आहे. आता मी परत मार्गावर येऊ शकणार नाही."

"असं का म्हणतोस, तुला मार्गावर आलं पाहिजे. सुधारलं पाहिजे. आणि सांगू– मग तू लग्न केलं पाहिजेस. तुझ्या बायकोला मी तुला कसं जपायचं हे शिकवीन."

मी कडाडून म्हणतो–" माफ कर. आता तू काहीही अधिक न बोलता निघून जा.

मला दारू पिऊ दे. जा...जा..."

" नाही जाणार." तू निक्षून तशीच बसून राहतेस.

" मी सांगतो ना, तुझं काही चुकलं नाही म्हणून. तू करायचं तेवढं केलंस. माझा तुझ्यावर राग नाही. तू आता आलीस म्हणून नाही—त्या दिवशी आली नाहीस म्हणून नाही."

" पण मला तुझ्याकडून आश्वासन पाहिजे. मला तुझा चेहरा परत टवटवलेला पाहायचाय्. त्यापूर्वी मी परत जाणार नाही आणि गेल्ये तर ती बोच माझ्या मनाला आयुष्यभर खुपत राहील."

" वा तुला का टोचत रहावं ? तुझ्या परीने करता येईल तेव्हढं तू केलंस ना, मग तुझ्या मनाला समाधान वाटलं पाहिजे. जगातल्या कित्येक अशा आणखी गोष्टी आहेत को तू त्या सुधारू शकत नाहीस. माझं आयुष्य ही एक त्यातलीच गोष्ट. आपल्या परीने आपण प्रयत्न केले. नाही सफल झालं तर सोडून द्यावं. ज्याचं आयुष्य त्याच्याबरोबर."

" असं नको रे बोलू. जगापेक्षा मला तू अधिक जवळचा आहेस. तुझे माझे काही जवळचे मैत्रीचे संबंध होते, एकमेकांच्या सहवासात आयुष्याचे काही क्षण आपण एकत्र जगलो आहोत आणि आयुष्यातले जुने भाग पुसू म्हटले तरी पुसता येत नाहीत."

" माझंही तेच दुःख आहे. आपण पूर्वी इतके जवळ आलो नसतो तर मला आज-पर्यंतसुद्धा जगावसं वाटलं नसतं. एकदा काही दिवसपर्यंत तरी माझ्या कोणीतरी जवळ होतं ह्या आठवणींवरसुद्धा मी जगू शकत होतो. माझ्या हुषारीबद्दल तू बोल-लीस. अग ती तर नुसती बुद्धीची कसरत. गणितातली प्रमेये. त्याच्याबद्दल मला




कधीच काही विशेष वाटलं नव्हतं आणि आजही जर मी माझं संशोधन असंच चालू ठेवलं तर कदाचित दोन वर्षांत मला डॉक्टरेटही मिळेल. पण—आता ते शक्य नाही.”

“ का, काय अशक्य आहे ? मी आहे ना अजून तुझ्यापाशी उभी ! तुला धीर द्यायला ?”

“ नाहीस. चुकलं सगळं माझंच. मला वाटत होतं तसं की तू माझ्यापाशी आहेस. पण ते पत्र लिहिण्यापूर्वी. नव्हे तुझं उत्तर येईपर्यंत. तोपर्यंत मला वाटत होतं तू येशील. माझ्या जीवनावरची काळोखी पुन्हा झडून जाईल. पुन्हा आयुष्यात जगण्यासारखं काही मिळेल. पुन्हा असे काही क्षण येतील की त्यांच्या आधारावर, त्या आठवणींवर जीवनात पुढला प्रवास करायला मला उमेद येईल. पण—तू आली नाहीस. तू आली असतीस तर कदाचित आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली असती. आता ती वेळ टळून गेली आहे.”

धाप लागून मी थांबतो आणि पुढे म्हणतो—“ पण तू आली नाहीस. तुला यावसं वाटून आली नाहीस की पत्रावरच भागवावं असं वाटून आली नाहीस ते तुझं तुलाच माहीत.”


“ तुझ्या गळ्याशपथ सांगते, यावसं वाटत असूनही आले नाही येऊ शकले नाही.”

“ हो, आणि म्हणूनच माझा तुझ्यावर राग नाही. शिष्ट समाजाला तुझं तसं येणं योग्य वाटलं नसतं. त्यानं त्यातून अर्थ काढले असते म्हणून तू येऊ शकली नाहीस. मला तुला बोल लावायचा नाही. तू चाकोरी बाहेर येऊन काही करू शकली नाहीस. चुकलं माझंच. मीच चुकीची अपेक्षा केली तुझ्याकडून. तू मीरा होऊ शकली नाहीस. समाजाला मीरा पसंत नसतात. समाज त्यांना ‘ बावरी ’ म्हणतो. तू बावरी झाली नाहीस. शहाणपणाने वागलीस. चूक माझीच होती अशी अपेक्षा ठेवण्यात आणि म्हणून त्याची शिक्षा माझी मलाच भोगली पाहिजे. मी ती भोगतोच आहे.”

“ पण मग माझं काय ? मला का असं वागून दुःख देतोस ?”

“ काय सांगू, कधी काळी माझ्याशी आपुलकीने वागण्याचा गुन्हा केलास म्हणून. तेवढी शिक्षा तुला भोगलीच पाहिजे. जा तू आता आणि परत भेटू नकोस—”

ओंजळीने तोंड झाकून तू बाहेर जातेस आणि मी दरवाजा लावून घेतो.






फ्रान्सची सारी भिस्त ब्रिटनवर होती.

ऑस्ट्रियाचा घास पचल्यानंतर हिटलर स्वस्थ बसणार नाही हे फ्रेंच नेतृत्वाला हळूहळू उमगू लागले होते. त्यामुळे हिटलरला आताच रोखायला हवे हेही मान्य झाले

# लेखांक : चौदा

होते. परंतु त्यासाठी आपल्या स्वतःच्या बळावर काही करावे एवढी तडफ त्या नेतृत्वात नव्हती. ब्रिटनच्या मदतीशिवाय आपल्याला पाऊल उचलता येणार नाही या न्यूनगंडाने खचलेल्या फ्रेंच नेतृत्वाची नजर सदैव खाडीपलीकडच्या लंडनवर खिळलेली होती. त्यामुळे सुडेटनलँडमधील जर्मनांचे नाव घेऊन हिटलरने चेकोस्लोव्हाकियावरील आपल्या संतापाचे प्रदर्शन करताच फ्रेंच प्रधानमंत्री दलादिए चेंबर्लेनची भेट घेण्यासाठी लंडनला जायची तयारी करू लागला.

जाण्यापूर्वी त्याने जनरल गामेलिन याला चिठ्ठी धाडून विचारले, "जर्मनीनं चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केलं तर आपण चेक सरकारला कोणती मदत करू शकू ?"

गामेलिनचे जुने उत्तर कायम होते–' एकटचा फ्रान्सनं चेकोस्लोव्हाकियाला मदत करून फारसं काही साध्य होणार नाही. ब्रिटन, रशिया, रुमेनिया आणि युगोस्लाव्हिया हे चार देश काय करतात यावर बरंचसं अवलंबून आहे."

२७ एप्रिल, १९३८ ला दलादिए लंडनला गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी चेंबर्लेन, लॉर्ड हॅलिफॅक्स, दलादिए आणि बॉन्ने यांच्या चेकोस्लोव्हाकियाच्या भवितव्यासंबंधी वाटाघाटी सुरू झाल्या. दलादिए म्हणाला, "सुडेटनलँडमधल्या जर्मनांना मानानं रहाता आलं पाहिजे ही हिटलरची धमकी निव्वळ बहाणा आहे. चेकोस्लोव्हाकिया नष्ट करण्यासाठी त्याला काही तरी निमित्त हवं आहे इतकंच. म्हणून तर त्यानं सुडेटन जर्मनांना चेक सरकारविरुद्ध फूस दिलेली आहे. परंतु केवळ सुडेटन जर्मन आणि चेकोस्लोव्हाकिया यांच्यापुरता हा प्रश्न मर्यादित नाही. एकदा का चेकोस्लोव्हाकिया हिटलरच्या ताब्यात गेला की साऱ्या युरोपवर त्याचं वर्चस्व प्रस्थापित होणार आहे. हिटलरच्या तुलनेनं आमच्या नेपोलियनची महत्त्वाकांक्षा फारच माफक म्हटली पाहिजे."

हिटलरच्या भावी वाटचालीची दिशा दलादिएच्या ध्यानात आली होती. त्यामुळेच तो चिंताव्यग्र झालेला होता. आज आपण गप्प बसलो तर युरोपवर कोणते संकट कोसळणार आहे याची त्याने चेंबर्लेनला स्पष्ट कल्पना दिली.

दलादिए म्हणाला, "आज हिटलरची नजर चेकोस्लोव्हाकियावर रोखली गेलेली आहे, पण उद्या तीच नजर पोलंड आणि रुमेनिया यांच्याकडं वळणार आहे. एकदा का हे तीन देश हिटलरच्या नियंत्रणाखाली आले की त्याला तेल आणि गहू यांची ददात पडणार नाही. मग पूर्वेचा नाद सोडून हिटलर पश्चिमेकडे वळेल आणि जे घडू नये असं आपण म्हणतो ते घडायला फार वेळ लागणार नाही. हे सारं टाळायचं असेल तर आपल्याला प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. ब्रिटन आणि फ्रान्स

यांनी एकत्र येऊन चेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याचं रक्षण करण्याची कामगिरी नेटानं पार पाडायला हवी. यावेळी जर आपण कमी पडलो तर साऱ्या युरोपला ग्रासून टाकणारं युद्ध टाळणं अशक्य होणार आहे."

परराष्ट्रमंत्री बॉन्ने याचाही आवाज यावेळी चढला होता. तो म्हणाला, 'युरोपच्या नकाशावरून चेकोस्लोव्हाकियाचं नाव पुसून टाकणं एवढा साधा आणि सरळ उद्देश मनाशी बाळगूनच हिटलरची पावलं पडत आहेत. म्हणून ब्रिटन आणि फ्रान्स यांनी आता धीटपणाने उभं राहून हिटलरला रोखलं पाहिजे. तसं करायचं म्हणजे आपल्याला खूप धोका स्वीकारायला हवा हे मला मान्य आहे. पण आता नुसता विचार बस्स झाला. यावेळी गरज आहे ती कृतीची. निदान फ्रान्स तरी याबाबतीत उणा पडणार नाही."

आपण एवढा नेट धरल्यानंतर तरी 'चला, काय करायचं ते ठरवू या' असे चेंबर्लेन म्हणेल अशी दलादिएची कल्पना होती. पण तसे काहीही घडले नाही.

तसे घडणार नव्हतेही.

कारण दलादिए लंडनला यायच्या काही दिवस अगोदर चेंबर्लेनने ब्रिटनची भूमिका हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सांगून टाकली होती. त्यावेळी तो म्हणाला होता, 'चेकोस्लोव्हाकियावरून जर्मनी आणि फ्रान्स यांच्यात युद्ध सुरू झालं तर या युद्धात आपण फ्रान्सच्या बाजूनं उभं राहिलंच पाहिजे असं काही ब्रिटनवर बंधन नाही.'

चेकोस्लोव्हाकियाबाबत आपण काहीही करायला तयार नाही ही चेंबर्लेन याची भूमिका खाजगी पत्रातूनही स्पष्ट झालेली होती. हिटलरने ऑस्ट्रिया ताब्यात घेतल्यानंतर आठवडाभराने आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रात चेंबर्लेनने म्हटले होते — 'हिटलरने चेकोस्लोव्हाकियावर स्वारी केली तर त्याला अडविण्यासाठी ब्रिटन आणि फ्रान्स काहीही करू शकत नाहीत हे युरोपच्या नकाशाकडे नजर टाकली की कोणालाही कळून येईल. म्हणून चेकोस्लोव्हाकियाला कोणतेही आश्वासन द्यायची माझी तयारी नाही.'

त्यामुळे दलादिए आणि बॉन्ने यांची भाषणे ऐकल्यानंतर चेंबर्लेन त्यांना म्हणाला, "तुम्ही हिटलरचा बराच धसका घेतलेला दिसतोय. हिटलरला चेकोस्लोव्हाकिया नष्ट करायचाय ही तुमची भीती अनाठायी आहे. त्यातून समजा, हिटलरनं चेकोस्लोव्हाकियावर हल्ला केला तरी आपण त्याला रोखू शकत नाही ही वस्तुस्थिती तुम्ही ध्यानात घ्यायला हवी."

चेंबर्लेनची ही थंड वृत्ती पाहून दलादिए हादरला. या थंड वृत्तीपायी युरोपमधली आग विझविण्याऐवजी भडकेल हे चेंबर्लेनला पटवून द्यायचा दलादिएने खूप प्रयत्न केला. दोन दिवस त्या दोघात याच एका प्रश्नासंबंधी चर्चा होत होती. दलादिएचा फार आग्रह झाला तेव्हा चेंबर्लेन म्हणाला, "सुडेटन जर्मनांबाबत समजुतीनं घ्या अशी आपण जर्मनी आणि चेकोस्लोव्हाकिया या दोघांनाही विनंती

करू या. सुडेटन जर्मनांची स्वयंनिर्णयाची मागणी चेकोस्लोव्हाकियानं मान्य करावी असा आपण प्रागला खलिता धाडू या आणि हिटलरलाही अशी विनंती करू की जर्मनीनं या प्रश्नाबाबत थोडंसं मवाळ धोरण स्वीकारावं."

या पलीकडे जायची चेंबर्लेनची तयारी नव्हती. दलादिए निराश मनःस्थितीत पॅरिसला परतला.

या काळात ब्रिटिश नेतृत्वाने हिटलरची एवढी धास्ती घेतली होती की आपण दलादिएबरोबर चर्चा केली ही गोष्ट हिटलरला आवडलेली नसणार या भीतीने दलादिए चेंबर्लेन याच्या कचेरीतून बाहेर पडताच लॉर्ड हॅलिफॅक्स तातडीने जर्मन वकिलातीतील थिओडेर कोर्डट् याला भेटायला गेला. हॅलिफॅक्सने आणाशपथा घेऊन कोर्डट् याला सांगितले – 'चेंबर्लेन–दलादिए भेटीमध्ये जर्मनीविरुद्ध उपाययोजना करण्यासंबंधी मुळीच चर्चा झाली नाही. इतकंच नव्हे तर फ्रान्सनं जर्मनीविरुद्ध पाऊल उचललं तरी ब्रिटन फ्रान्सला मदत करणार नाही याचीही मी तुम्हाला ग्वाही देतो."

एवढे बोलूनच हॅलिफॅक्स थांबला नाही. जागतिक शांतता कशी टिकेल याचा विचार करण्यासाठी जर्मनी, ब्रिटन आणि अमेरिका या तीन राष्ट्रांची बैठक भरवावी असे आपल्याला वाटत असल्याचीही हॅलिफॅक्सने ग्वाही दिली. आपण फ्रान्सचा मुलाहिजा बाळगत नाही हे जर्मनीला पटविण्यासाठी ब्रिटिश नेत्यांचा हा खरा खटाटोप सुरू होता.

आपण हिटलरबरोबर वाटाघाटी सुरू केल्या तर तो आपला हेका चालवणार नाही अशी चेंबर्लेनने आपल्या मनाशी खूणगाठ बांधली होती. त्यासाठी तर त्याने आपल्या विश्वासातील सर नेव्हिल हेंडरसन याची बर्लिनमधील राजदूत म्हणून नेमणूक केली होती. हेंडरसन आपल्या प्रधानमंत्र्याचे आदेश बिनतक्रार पाळीत होता. त्यामुळे दलादिए पॅरिसला परतताच, हेंडरसनने रिबेन्ट्रॉप याला कळविले– "चेंबर्लेन–दलादिए भेटीतील चर्चेचा तपशील जर्मनीपासून लपवून ठेवायची माझ्या सरकारची मुळीच इच्छा नाही. या चर्चेच्या वेळी चेंबर्लेन यानं दलादिएचं म्हणणं ऐकून घेतलं, परंतु त्याला कोणतंही आश्वासन दिलेलं नाही."

रिबेन्ट्रॉप उत्तरला– "तुमचे प्रधानमंत्री समजूतदार आहेत हे मला माहीत आहे."

त्यानंतर त्या दोघात सुडेटन जर्मनांच्या भवितव्यासंबंधी बोलणे झाले. हेंडरसन म्हणाला, "ब्रिटन आणि जर्मनी यांनी आपापसात वाटाघाटी करून हा प्रश्न सोडवावा असं आमच्या प्रधानमंत्र्याना वाटतं. या वाटाघाटींच्या वेळी फ्रान्सला बोलावण्याचं काहीही कारण नाही. सुडेटन जर्मनांचा प्रश्न सोडविण्याबाबतची तुमची योजना तुम्ही आम्हाला समजावून सांगा; म्हणजे ती मान्य करण्याबाबत आम्ही चेक सरकारवर दडपण आणू."

ब्रिटिश नेते एवढी अजीजी करीत असतानाही त्यांच्यापाशी आपले मन मोकळे न करण्याइतका हिटलर सावध होता. आपली खुषी संपादन करण्यासाठी चेंबर्लेन फ्रान्सचा हात झिडकारून देत आहे एवढी एकच गोष्ट त्याच्या दृष्टीने महत्वाची होती.

रिबेन्ट्रॉप हेंडरसनशी भेटीगाठींचा आणि विचारविनिमयाचा मतलबी घोळ घालीत असतानाच हिटलरनें जनरल कैटेल याला बोलावून घेऊन 'केस ग्रीन' अमलात आणण्याबाबतची आपली तयारी पूर्ण झाली असल्याची खात्री करून घेतली.

'केस ग्रीन' हे चेकोस्लोव्हाकियावरील स्वारीचे सांकेतिक नाव होते. हिटलरने या योजनेचा पहिला आराखडा वर्षापूर्वीच तयार केला होता. फक्त ती अमलात आणण्यासाठी तो निमित्त शोधत होता आणि गेल्या वर्षभरात तसे निमित्त न सापडल्यामुळे तो बेचैन झाला होता

हिटलर कैटेल याला म्हणाला, "चेकोस्लोव्हाकियामध्ये सैन्य घुसविण्यासाठी आपल्याला काही तरी कारण मिळालं पाहिजे. चेकोस्लोव्हाकियाकडून आगळीक घडली नाही तर आपल्याच माणसांकरवी प्रागमधल्या आपल्या राजदूताचा खून करा. म्हणजे मग आपल्याला चटकन प्रागपर्यंत चढाई करण्यासाठी योग्य कारण मिळेल. चेकोस्लोव्हाकिया ताब्यात घ्यायला बारा तासांपेक्षा अधिक वेळ लागता कामा नये इतकं आपण अगोदरच तयार असलं पाहिजे."

म्हणजे सुडेटन जर्मनांसंबंधी ममत्व वाटत होते म्हणून हिटलरचा चेकोस्लोव्हाकियावर रोष झाला होता असे नव्हे. आपली आकांक्षा साकार करण्याचे एक साधन एवढेच त्याच्या हिशेबी सुडेटन जर्मनांचं महत्त्व होते. त्याचप्रमाणे आपल्या मनात येईल ते घडलेच पाहिजे यासाठी आपल्या सहाय्यकांना बळी द्यायलाही त्याची तयारी होती. तशीच वेळ आली असती तर प्रागमधल्या आपल्या राजदूताचा खून करण्यापर्यंतही त्याची मजल गेली असती. कारण ऑस्ट्रियावर स्वारी करण्यासाठी सबब मिळावी म्हणून व्हिएन्नातील जर्मन राजदूत फ्रान्झ फॉन पापेन याचा खून करण्याची योजना त्याने आखलेली होती. तशी गरज पडली नाही म्हणूनच पापेनचे प्राण वाचले होते.

हिटलरचे कैटेल याला एकच सांगणे होते-- "चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण करण्यासाठी लवकर निमित्त शोधून काढलं पाहिजे."

त्यासाठीच त्याने सुडेटन जर्मनांचा नेता कोनरॅड हेन्लेन याला बर्लिनला बोलावून घेऊन सांगितले, "चेक सरकार मान्य करणार नाही अशा मागण्या तुम्ही मांडल्या पाहिजेत. म्हणजे 'चेकोस्लोव्हाकियामध्ये आमच्या बांधवांचे हाल होत आहेत' असं सांगून आम्हाला तिथं सैन्य धाडता येईल."

चेकोस्लोव्हाकियातील सुडेटन लँड हा कधीही जर्मनीचा भाग नव्हता. तो पूर्वी ऑस्ट्रियाचा भाग होता. त्यामुळे सुडेटन लँडमधील जर्मन नागरिकांचे वकीलपत्र घ्यायची हिटलरला वस्तुतः काही गरज नव्हती. परंतु मध्य युरोपवर आपले प्रभुत्व प्रस्थापित झाले पाहिजे या आकांक्षेपायी हिटलरने सुडेटन जर्मनांना 'वापरण्याचे' ठरविले होते. सुडेटनलँडचा आणि जर्मनीचा काहीही संबंध नाही या ऐतिहासिक वस्तुस्थितीकडे चेंबर्लेन याने सोयिस्कर दुर्लक्ष करण्याचे ठरविले असल्यामुळे हिटलरला आणखीच फावले.

हिटलरच्या सूचनेप्रमाणे हेन्लेन याने चेक सरकारकडे अवास्तव मागण्या मांडायला प्रारंभ केला. अपेक्षेप्रमाणे चेक सरकारने या मागण्या मान्य करायला नकार देताच हेन्लेन बर्लिनला आला आणि लागलीच जर्मन नभोवाणीवरून सुडेटन जर्मनांना चिथावणारा प्रचार सुरू झाला. सुडेटन जर्मनांवर चेक सरकारकडून अमानुष अत्याचार होत असल्याच्या कपोलकल्पित वार्ता हिटलरचा प्रचारमंत्री गोबेल्स प्रक्षेपित करू लागला. सुडेटन जर्मनांनी चेक सरकारविरुद्ध दंगली सुरू कराव्यात हाच या प्रचारामागचा उद्देश होता. याच काळात सुडेटन जर्मनांना हिटलरच्या हस्तकांकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रपुरवठाही सुरू झाला.

वातावरण हळूहळू चिघळू लागले.

सुडेटन लँडचे जर्मनीच्या हातावर उदक सोडायला ब्रिटनची तयारी असली तरी तेवढ्यावर हिटलरचे समाधान होण्यासारखे नव्हते. ऑस्ट्रियाप्रमाणे चेकोस्लोव्हाकियाही जर्मनीत केव्हा विलीन करतो असे त्याला झाले होते. एखादा दिवस तर असा जाई की त्यादिवशी चेकोस्लोव्हाकियाशिवाय हिटलरला दुसरे काही सुचतच नसे. अशाच एका दिवशी त्याने बर्खटेसगाडेन येथून बर्लिनमधल्या लष्करप्रमुखाला तार धाडली—"चेक सीमेवर आपलं किती सैन्य नेऊन ठेवण्यात आलेले आहे?"

तारेनेच उत्तर गेले—"बारा डिव्हिजन्स."

एवढ्या मोघम उत्तराने काम भागणार नव्हते. हिटलरने परत तार केली—"या डिव्हिजन्सचा तपशील कळवा."

लष्करप्रमुखाने कळविले—"पायदळाच्या दहा, रणगाड्यांची एक आणि डोंगरी युद्धात तरबेज असलेल्या सैनिकांची एक—अशा बारा डिव्हिजन्स चेक सीमेनजीक उभ्या आहेत."

बारा डिव्हिजन्स जर्मन सैन्य आपल्या सीमेनजीक गोळा झालेले आहे ही बातमी चेक सरकारला कळताच, चेक सरसेनानी जनरल लुडविक क्रेजसी याने प्रागमधल्या जर्मन राजदूताकडे तक्रार नोंदवली.

जर्मन राजदूताने ठरलेले उत्तर दिले—'तुम्हाला कळलेली बातमी धादांत खोटी आहे."

जर्मन राजदूत कोणते उत्तर देणार हे चेकोस्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष बेनेस यांना माहीत होते. त्यामुळे त्यांनी जर्मन राजदूताच्या खुलाशावर विश्वास न ठेवता आपल्या मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलाविली. आपल्यालाही आता लष्करी तयारी केली पाहिजे असे मंत्रिमंडळाने सांगताच बेनेस यांनी सैन्यभरतीचा हुकूम काढला.

हिटलरने आपले बारा डिव्हिजन सैन्य चेकोस्लोव्हाकियानजीक नेऊन ठेवले आहे ही बातमी कळताच बर्लिनमधील ब्रिटिश आणि फ्रेंच राजदूतही गोंधळून गेले. ते रिबेन्ट्रॉपला सांगू लागले—' जर्मनीने चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केलं तर युरोपात नक्कीच दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडेल. म्हणून तुम्ही घाईघाईनं काहीही करू नका. अजूनही हा प्रश्न सामोपचारानं मिटू शकेल.'

लागलीच हिटलरने आपला पवित्रा बदलला.

केवळ चेकोस्लोव्हाकियातच नव्हे तर ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यांनीही आपल्या आगामी हालचालींसंबंधी बेफिकीर रहावे म्हणून हिटलरच्या सूचनेनुसार रिबेन्ट्रॉपने बर्लिनमधल्या चेक राजदूताला बोलावून घेऊन सांगितले, ' चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण करण्याचा आमचा मुळीच इरादा नाही. चेक सीमेवर जर्मन सैन्य एकवटल्याची बातमी बिलकुल खरी नाही.'

रिबेन्ट्रॉपचा हा खुलासा ऐकताच चेकोस्लोव्हाकियाप्रमाणेच ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यांनी सुटकेचा निश्वास सोडला. आपल्या दडपणामुळे हिटलर नमला अशा समजुतीने प्रत्येकाने स्वत:ची पाठ थोपटून घेतली. युरोपीय वृत्तपत्रातील या प्रतिक्रिया वाचल्यानंतर हिटलर लगबगीने बर्खटेसगाडेन येथून बर्लिनला आला आणि त्याने आपल्या वरिष्ठ सल्लागारांची बैठक बोलाविली. हिटलर गरजला, " युरोपच्या नकाशावरून चेकोस्लोव्हाकियाचे नाव पुसून टाकण्याचा माझा निश्चय झालेला आहे. मग त्यापायी साऱ्या युरोपशी आपल्याला युद्ध करावं लागलं तरी पर्वा नाही. २ ऑक्टोबरच्या आत चेकोस्लोव्हाकिया आपल्या ताब्यात आला पाहिजे. अजून चार महिन्यांचा अवधी आहे. आपण चेकोस्लोव्हाकियावर हल्ला चढवू तेव्हा कदाचित पश्चिमेकडून आपल्यावर ब्रिटन आणि फ्रान्स स्वारी करतील. म्हणून तावडतोब आपल्या पश्चिम सीमेवरील मोर्चे मजबूत करा. त्याचप्रमाणे सर्व आघाड्या झुंजविण्यासाठी आपण ९६ डिव्हिजन सैन्य उभारलं पाहिजे."

या बैठकीमध्ये पुन्हा एकदा ' केस ग्रीन 'चा विचार झाला. चेकोस्लोव्हाकियावरील आक्रमण ही हिटलरच्या दृष्टीने अपरिवर्तनीय घटना ठरली होती.

या संदर्भात रशियाचे काय धोरण राहणार आहे याचाच मध्यंतरीच्या काळात हिटलरला अंदाज घ्यायचा होता. कारण फ्रान्सप्रमाणे रशियानेही चेकोस्लोव्हाकियाबरोबर मदतीचा करार केलेला होता. चेकोस्लोव्हाकियावर कोणी आक्रमण केले

तर रशिया चेकोस्लोव्हाकियाच्या मदतीला येईल असे त्या करारामध्ये स्पष्ट म्हटले होते. फक्त त्याला एक पुस्ती जोडण्यात आलेली होती. फ्रान्स चेकोस्लोव्हाकियाच्या मदतीला आला तरच रशिया मदत करणार होता. रशियाची ही अट मोठी सूचक होती. हिटलरचा आपल्या एकट्यावर रोष ओढवून घ्यायला त्यावेळी स्टॅलिनचीही तयारी नव्हती हेच या अटीवरून स्पष्ट होत होते. आयत्या वेळी फ्रान्स आपल्याला दगा देईल अशी शंका वाटत असल्यामुळेच स्टॅलिनने चेकोस्लोव्हाकियाशी केलेल्या करारामध्ये 'फ्रान्स मदतीला आला तर' अशी अट अंतर्भूत केली होती.

हा करार होऊन आता तीन वर्षे उलटून गेली होती. फ्रान्स काय करणार आहे हा हिटलरच्या दृष्टीने प्रश्न उरलेला नव्हता. फक्त, फ्रान्स स्वस्थ बसला तरी रशिया स्वस्थ बसेल किंवा नाही हे त्याला जाणून घ्यायचे होते. चेकोस्लोव्हाकियाची सीमा रशियाला भिडलेली नव्हती. या दोन देशांच्या दरम्यान पोलंड आणि रुमेनिया यांचे प्रदेश होते. रशियन सेनेला आपल्या प्रदेशातून जाऊ द्यायला पोलंड आणि रुमेनिया परवानगी देण्याची शक्यता फारच कमी होती. त्यामुळे चेकोस्लोव्हाकियाच्या मदतीला रशियन सैन्य येण्याचा फारसा संभव नाही हे हिटलरला माहीत असले तरी त्याबद्दल खात्री करून घेणे आवश्यक होते.

रशियाचे धोरण जाणून घेण्याची जशी हिटलरला उत्सुकता होती तशीच ती फ्रान्सलाही होती. त्यामुळे १२ मे १९३८ रोजी जिनीव्हा येथे राष्ट्रसंघाची बैठक भरलेली असताना बॉन्ने याने रशियन परराष्ट्रमंत्री लिटव्हिनॉव्ह याला विचारले, 'चेकोस्लोव्हाकियावर हिटलरनं हल्ला चढविला तर रशिया कराराला जागणार आहे काय?'

'जर फ्रान्स आपल्या शब्दाला जागला तर आम्हीही आमचा शब्द पाळू,' लिटव्हिनॉव्हने फ्रान्सच्या मर्मावर बोट ठेवणारे उत्तर दिले.

त्या उत्तरातील खोचकपणाकडे दुर्लक्ष करीत बॉन्ने याने पुढचा प्रश्न विचारला, 'पण तुम्ही मदत कशी करू शकणार? पोलंड आणि रुमेनिया यांच्या प्रदेशातून सैन्य नेणं तुम्हाला शक्य होईल का?'

लिटव्हिनॉव्ह उत्तरला, 'पोलंड आणि रुमेनिया यांना दुखवायची आमची तयारी नाही. त्यामुळे जर का या दोन देशांनी त्यांच्या प्रदेशातून सैन्य पाठवायला आम्हाला परवानगी दिली नाही तर आम्हाला काहीही करता येणार नाही. पोलंड आणि रुमेनिया फ्रान्सचे मित्र आहेत. म्हणून तुम्ही त्या देशांकडून आम्हाला तशी परवानगी मिळवून द्यायला हवी.'

म्हणजे रशियाने आपली सारी जबाबदारी फ्रान्सच्या शिरावर टाकली होती. त्यामुळे बॉन्ने गोंधळून गेला. तो लिटव्हिनॉव्ह याला एवढेच म्हणाला, 'तुमच्यासाठी परवानगी काढण्याचा आम्ही प्रयत्न करू.'

परंतु या उत्तरात काहीही दम नाही हे लिटव्हिनॉव्ह याला पुरतेपणी ठाऊक होते. पोलंड आणि रुमेनिया या देशातल्या त्यावेळच्या राजवटींना कम्युनिस्ट रशियाचे भय वाटत असल्यामुळे त्यांच्याकडून तशी परवानगी मिळणे मुळीच शक्य नव्हते. शिवाय कम्युनिस्ट रशियाची मदत घेऊन हिटलरला रोखण्याची कल्पना ब्रिटनप्रमाणे फ्रान्सलाही मंजूर नव्हती. स्टॅलिनपेक्षा हिटलर त्यांना जवळचा वाटत होता.

आणि येथेच त्यांची फसगत झाली.

हुकूमशहा कोणत्या तत्त्वज्ञानाचा पाईक आहे याला मुळीच महत्त्व नसते, तो हुकूमशहा असतो आणि त्याच्या महत्त्वाकांक्षी नजरेला भोवतालच्या लोकसत्ताक राजवटी खुपत असतात एवढेच काय ते सत्य असते हे त्यावेळी अँग्लो-फ्रेंच नेतृत्वाला उमगले नव्हते. त्यामुळे हिटलर आणि स्टॅलिन या दोन सामर्थ्यसंपन्न हुकूमशहांना परस्परांविरुद्ध झुंजविण्याचे राजकारण त्यांना खेळता आले नाही.

मॉस्कोतील फ्रेंच राजदूत रॉबर्ट कोलोन्द्र हा तेवढा या राजनीतीचा पुरस्कार करीत होता. जर्मनीशी तुल्यबल असे लष्करी सामर्थ्य पूर्व युरोपमध्ये एकटचा रशियापाशी असल्यामुळे आपण रशियाची उपेक्षा करून चालणार नाही असे तो पॅरिसमधल्या आपल्या वरिष्ठांना सतत बजावीत होता. हिटलरने ऑस्ट्रियाचा कब्जा घेतल्यानंतर कोलोन्द्र याने लगेच बॉन्ने याला कळविले होते—'चेकोस्लोव्हाकियाला मदत करण्याची जर आपली खरोखरच इच्छा असेल तर आपण ताबडतोब रशियाशी लष्करी वाटाघाटी केल्या पाहिजेत.'

परंतु बॉन्ने याने त्याबाबत मुळीच उत्सुकता दाखविली नाही. अशा परिस्थितीत एकटचा रशियाने हिटलरचे वैर ओढवून घेण्याची स्टॅलिनलाही गरज भासत नव्हती. त्यामुळे युरोपचे राजकारण हिटलरला जसे हवे होते तसेच नेमके आकार घेत होते.

फ्रान्सच्या राजकीय नेतृत्वाप्रमाणेच लष्करी नेतृत्वही हिटलरविरुद्ध हालचाल करण्याच्या बाबतीत उदासीन होते. चेकोस्लोव्हाकियावर स्वारी करण्याचा हिटलरचा बेत पक्का झाला आहे याचा १९३८ च्या ऑगस्टमध्ये पुन्हा साक्षात्कार घडल्यानंतर दलादिए याने जनरल गामेलिन याला विचारले, 'पश्चिम आघाडीवर हिटलरला गुंतवून ठेवण्याइतकी आपली तयारी आहे ना?'

गामेलिन म्हणाला, 'जर्मनीनं तिथं इतकी लष्करी तयारी केलेली आहे की आपल्याला चढाईचं धोरण स्वीकारणं फार कठीण जाईल.'

गामेलिनशेजारी बसलेला जनरल जॉर्जही आपल्या लष्करी तयारीसंबंधी बोलण्याऐवजी हिटलरचे कौतुक करण्यात दंग झाला होता. तो म्हणाला, 'जर्मन प्रदेशावर पाऊल ठेवण्याइतकं सामर्थ्य आपल्या अंगी यायला अजून खूप वर्षं लागतील इतका हिटलरनं पश्चिम सीमेवर चोख बंदोबस्त केलेला आहे.'

गमतीची गोष्ट अशी की ज्यावेळी फ्रेंच सेनानींनी जर्मनीच्या लष्करी तयारीची दहशत घेतली होती त्याचवेळी जर्मन सेनानींना फ्रान्सच्या लष्करी सामर्थ्याबद्दल भीती वाटत होती. चेकोस्लोव्हाकियावरील आपल्या स्वारीचे निमित्त साधून फ्रान्सने जर आपल्याविरुद्ध युद्ध पुकारले तर आपली पंचाईत होईल असे मत जर्मन सरसेनानी जनरल लुडविक बेक याने आपल्या सहकाऱ्यांपाशी व्यक्त केले होते.

चेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याचे अपहरण करायला जर्मन सेनानींचा विरोध नव्हता. कारण ऑस्ट्रिया गिळंकृत करण्याच्या योजनेचा याच सेनानींनी अगदी हिरीरीने पुरस्कार केला होता. परंतु चेकोस्लोव्हाकियाच्या निमित्ताने जर ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया आपल्याविरुद्ध उभे ठाकले तर त्यांच्याशी झुंज घेण्याइतके सामर्थ्य आपल्यापाशी नाही या कल्पनेमुळे जर्मन सेनानींचा हिटलरच्या 'केस ग्रीन'ला विरोध होता. आपला हा विरोध हिटलरने ध्यानात घेऊन 'केस ग्रीन'चा विचार पुढे ढकलला तर ठीकच, नाही तर त्या धामधुमीचा फायदा घेऊन आपण त्याला पदच्युत करावे असा विचारही जनरल बेक प्रभृतींच्या मनात येत होता.

जनरल बेक याने पायदळप्रमुख जनरल ब्रॉशिट्श याला अशी कळकळीची विनंती केली की हिटलरला 'केस ग्रीन'पासून परावृत्त करण्याचा पायदळाने तरी प्रयत्न करून पहावा. जनरल बेक आपल्या कामात हुषार होता; परंतु प्रत्यक्ष कृती करण्याच्याबाबतीत गामेलिनचा भाऊ शोभावा इतका तो दुबळा होता. त्यामुळे 'केस ग्रीन'पायी हिटलर जर्मनीचा विनाश ओढवून घेणार आहे या भीतीने तो एवढा धास्तावला होता की केवळ ब्रॉशिट्श याच्याशी बोलून तो थांबला नाही. इतर सेनानींनाही या धोक्याची जाणीव करून देण्याचा त्याने सपाटा चालविला. आपल्या सहकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात बेकने म्हटले होते–" आपण जर चेकोस्लोव्हाकियावर हल्ला चढविला तर ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया नक्कीच आपल्याविरुद्ध उभे राहतील आणि त्यांना अमेरिकेकडून दारूगोळा आणि शस्त्रास्त्रे यांचा भरपूर पुरवठा होईल. अशा परिस्थितीत आपण हे युद्ध जिंकू शकणार नाही. म्हणून चेकोस्लोव्हा-


पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे

किंमत । साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

कियावरील आक्रमणाचा विचार तूर्त तरी रद्द करा असे आपण सर्वांनी हिटलरला बजावले पाहिजे."

बेकचे हे मत अनेक जर्मन सेनानींना पटले; परंतु यासंबंधी हिटलरशी बोलण्याचे धैर्य कोणाच्याही अंगात नव्हते. ते धाडस एकट्या जनरल अ‍ॅडॅम याने केले. हिटलर-बरोबर पश्चिम आघाडीवरील तटबंदीची पाहणी करायला गेलेला असताना अ‍ॅडॅम हिटलरला म्हणाला, "फ्रेंच सेनेनं चढाई केली तर आपली ही तटबंदी टिकाव धरू शकणार नाही असं बऱ्याच सेनानींना वाटतं."

हिटलर आपल्या नेहमीच्या स्वभावानुसार फणकारला, "जे असली भ्याड भाषा बोलतात ते बदमाष आहेत."

हिटलरचे हे उद्‌गार कळल्यानंतर जनरल बेक याने सरसेनानीपदाचे त्यागपत्र दिले. आपल्याप्रमाणे इतर सेनानींनीही राजीनामे द्यावेत अशी त्याची अपेक्षा होती. पण कोणीही बेक याचे अनुकरण केले नाही. तरीदेखील हिटलरने युद्ध ओढवून घेतले तर त्याला पदच्युत करावे हा विचार मात्र कायम होता.

बेकच्या जागी आलेल्या जनरल फ्रान्झ हाल्डेर यानेच या कार्यात पुढाकार घेतला. त्याने बेकच्या मदतीने बर्लिनमधल्या आणि भोवतालच्या सेनानींना बोलावून घेऊन आपला विचार समजावून सांगितला. राईश बँकेचा अध्यक्ष डॉ. शाख्ट या विचाराशी सहमत असल्याचे कळल्यामुळे अनेक नागरी अधिकारीही हाल्डेर याने आखलेल्या कटामध्ये सामील झाले. लंडनमधल्या जर्मन वकिलातीतील थिओडेर कोर्डट हाही त्यापैकीच होता. त्यामुळे हिटलरला सत्तेवरून उडवून लावण्याचा कट कशासाठी होत आहे याची माहिती कोर्डट याच्या मार्फत ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॉर्ड हॅलिफॅक्स याला समजली. कोर्डट हॅलिफॅक्सला म्हणाला, "येत्या १ ऑक्टोबरला चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण करण्याचं हिटलरनं ठरविलेलं आहे. म्हणून त्याच्या आदल्या दिवशी आम्ही हिटलरला पदच्युत करणार आहोत. त्यामुळे सध्या हिटलर कितीही गर्जना करीत असला तरी ब्रिटन आणि फ्रान्स यांनी चेकोस्लोव्हाकियाबाबत त्याच्याशी नमतं घेण्याचं कारण नाही."

कोर्डट्‌कडून कळलेली माहिती हॅलिफॅक्सनें चेंबर्लेनच्या कानावर घातली. परंतु हे घडून येणे शक्य नाही असे चेंबर्लेनचे मत पडले आणि म्हणून ब्रिटिश परराष्ट्र-खात्याने ही माहिती फ्रान्सला कळविली नाही. चेंबर्लेन याला फ्रान्सपेक्षा हिटलर विश्वासार्ह वाटत होता याचाच हा पुरावा होता.

१२ सप्टेंबरला न्यूरेन्बर्ग येथे नाझी पक्षाचा वार्षिक मेळावा भरलेला असताना हिटलर गरजला, 'सुडेटन लँडमधल्या आमच्या बांधवांची चेक सरकारकडून होत असलेली ससेहोलपट थांबली नाही तर आम्हाला वेगळ्या मार्गाचा विचार करावा लागेल. त्याचप्रमाणे सुडेटन लँडचं भवितव्य ठरविण्याचा तेथल्या जर्मन नागरिकांना अधिकार मिळालाच पाहिजे.'

हिटलरचे हे चिथावणीखोर भाषण ऐकताच सुडेटन जर्मनांनी दंगल आरंभिली. पोलिस-चौक्या, रेल्वे स्टेशने, टपाल-तार कचेऱ्या इत्यादी सरकारी इमारतींवर सशस्त्र हल्ले होऊ लागले. ही दंगल एवढी वाढली की चेक सरकारला लष्करी कायदा जारी करावा लागला. चेक लष्कराने दोन दिवसांच्या आत सुडेटन जर्मनांचा उठाव मोडून काढला.

आता चेकोस्लोव्हाकियावर स्वारी करायला हिटलरला निमित्त मिळाले आहे हे फ्रेंच प्रधानमंत्री दलादिए याला कळून चुकले. म्हणून त्याने त्या दिवशीच रात्री नऊ वाजता चेंबर्लेन याला फोन केला – 'सुडेटन लॅंडचा प्रश्न कसा सोडवायचा याचा विचार करण्यासाठी जर्मनी, चेकोस्लोव्हाकिया, ब्रिटन आणि फ्रान्स यांची ताबडतोब बैठक बोलवावी, म्हणजे हे प्रकरण चिघळणार नाही.'

चेंबर्लेनने दलादिएचे म्हणणे ऐकून घेतले, पण त्याच्या सूचनेबाबत कोणतेच मत व्यक्त केले नाही. एवढी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झालेली असताना चेंबर्लेन शांत असावा याचे दलादिएला आश्चर्य वाटले.

फ्रान्सला महत्त्व द्यायला चेंबर्लेनची अजूनही तयारी नव्हती. आपण एकट्यानेच हिटलरशी वाटाघाटी केल्या तर तो अजूनही आपले पाऊल मागे घेईल या भ्रमात चेंबर्लेन वावरत होता.

त्यामुळे दलादिएचा फोन आल्यानंतर दोन तासांनी चेंबर्लेनचा तातडीचा खलिता हिटलरकडे रवाना झाला. या खलित्यात ब्रिटिश प्रधानमंत्र्याने म्हटले होते – 'सुडेटन लॅंडच्या प्रश्नाची शांततेने सोडवणूक कशी करता येईल याची चर्चा करण्यासाठी आपली भेट घ्यावी असं मला वाटतं. मी उद्यादेखील विमानानं निघू शकतो. आपण कोठे आणि केव्हा भेटू शकाल हे ताबडतोब कळवावे.'

चेंबर्लेनचा हा खलिता रवाना होण्यापूर्वीच थिओडेर कोर्डट् याने बर्लिनला कळविले होते –'सुडेटनलॅंडमध्ये सार्वमत घेण्यात यावे ही जर्मनीची सूचना चेंबर्लेनला मान्य आहे. इतकेच नव्हे तर ही मागणी चेकोस्लोव्हाकियाने मंजूर करावी यासाठी चेंबर्लेन चेक सरकारवर दडपण आणायलाही तयार आहे.'

कोर्डटच्या खलित्यावरून हिटलरला व्हायचा तो बोध झाला. ब्रिटिश प्रधानमंत्र्याशी चर्चा करायला आता त्याला काहीच हरकत नव्हती.

ब्रिटनसारख्या लोकसत्ताक राष्ट्राच्या प्रधानमंत्र्याची ही लाचारी, सत्तोन्मादाने भारलेल्या त्या हुकूमशहाला सुखावणारी होती.

(क्रमश:)


---

**पुढील लेखांक : शनिवार दिनांक १२ सप्टेंबर अंकात**

---

## मार्क्सच्या मोजपट्टीने घेतलेला इतिहास

# आदिभारत



**श्री**. डांगे यांनी हे पुस्तक १९४२–४३ साली इंग्रजीत लिहिले ते १९४९ मध्ये प्रसिद्ध झाले व त्याच्या ४ आवृत्त्या निघाल्या. इतर अनेक भाषांत त्याचे अनुवाद झाले. हा मराठी अनुवाद श्रीमती रोझा देशपांडे यांनी केला असून तो गतवर्षी प्रसिद्ध झाला.

१९४२–४३ साली तुरुंगात असता इतर राजबंद्यांबरोबर महायुद्ध, राजकीय, आर्थिक व सामाजिक घडामोडी यांची चर्चा करताना डांगे यांना असे आढळले की, शासनसंस्थेचा उगम व विकास यांचा भारतीय संदर्भात व मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टिकोनातून अभ्यास झाल्याखेरीज वर्तमान-स्थितीचे आकलन होणार नाही. त्यासाठी भारतीय इतिहासाच्या प्राचीन कालखंडाचा हा अभ्यास त्यांनी केला. पुढील इतिहासाचा अभ्यास करणे मात्र त्यांना शक्य झाले नाही.

भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास भांडारकर, टिळक, कुंटे इत्यादि विद्वानांनी केला. परंतु त्यांचे लिखाण व संशोधन काही इतिहासबाह्य हेतूंनी झाले असल्याने व ऐतिहासिक भौतिकवादाची माहिती नसल्याने इतिहासाचे मळ सूत्रच त्यांना सापडले नाही. परिणामत: त्यांचा अभ्यास तपशीलाने भरलेला, पूर्वग्रहदूषित व पक्षपाती असा झाला. आपले विवेचन मात्र पूर्वग्रहविरहित, वस्तु-

**श्री. मा. भावे**

निष्ठ व सुसूत्र आहे असा डांग्यांचा दावा आहे.

इतिहासाचे इतर अभ्यासक व श्री. डांगे यांच्यात वादाचा आणखी एक मुद्दा आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाच्या मार्क्सवादी आराखड्यात भारताचा इतिहास अपवाद आहे, असे इतर इतिहासकारांचे म्हणणे आहे. असे कोणतेही वैशिष्टय श्री. डांगे नाकारतात. किंबहुना संस्कृतीच्या विकासाचे टप्पे भारतीय इतिहासात पूर्णपणे दिसून येतात हे दाखविणे हाही या पुस्तकाचा एक उद्देश आहे.

प्राथमिक गणयुक्त कम्युनिझमची पद्धती, गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही व समाजसत्तावादी पद्धती असे ५ टप्पे संस्कृतीच्या विकासात असतात, असे मार्क्सवादी मानतात. वेदांपासून महाभारताच्या कालापर्यंत आर्यांनी पहिली अवस्था पूर्ण करून दुसऱ्या अवस्थेत प्रवेश केला असे दाखविण्याचा डांग्यांचा प्रयत्न आहे. यासाठी त्यांनी वेदांतील वचने व महाभारत यांचा आधार घेतला आहे.

अग्नीचा शोध लागल्यानंतरच्या काळात रक्तसंबंधी मनुष्यांच्या साम्यसंघांच्या हकीकतीस सुरुवात होते. या साम्यसंघांचे आर्थिक जीवन, सामुदायिक श्रम व सामुदायिक उपभोग यांनी बनलेले होते. या संघाची उत्पादन व उपभोगाची जी पद्धती तीसच यज्ञ असे नाव होते. एकूण उत्पादन इतके थोडे असे की शिल्लक उत्पादन रहातच नसे. त्यामुळे शिलकी उत्पादनाचे काय करावे असा प्रश्नच उपस्थित होत नसे.

साम्यसंघास मनुष्यशक्ती कमी पडत असल्याने आपल्याच संघातील व्यक्तीस मारणे पाप समजले जाई. त्याचबरोबर परकीय टोळीशी युद्ध झाल्यास जे कैदी होत त्यांना खाऊ घालण्यास अन्न नसल्याने ताबडतोब मारून टाकीत. युद्धात जिंकलेली संपत्ती सर्वांस वाटून दिली जाई. त्यालाच दानम् असे म्हणत.

साम्यसंघात शासनसंस्था नव्हती. कामाची वाटणीहि फारशी नव्हती. उत्पादन-व्यवस्थेचे व युद्धाचे नेते निवडलेले असत, पण ते इतरांच्या बरोबरीने श्रम करीत. तसेच खाजगी संपत्ती, वर्ग, कुटुंबे हीही अस्तित्वात नव्हती. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने वागत व साम्यसंघ मातृसत्ताक असे.

यानंतर शेती व गो-पालन यांचा शोध लागला व उत्पादन पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात होऊन शिल्लक राहू लागले. साहजिकच युद्धनेते क्षत्रिय आणि उत्पादन पद्धतीचे म्हणजे यज्ञाचे नेते ब्राह्मण यांनी या संपत्तीचा ताबा घेतला. अशा रीतीने हे दोन उच्च वर्ण तयार झाले. यांखेरीजची साम्यसंघातील जनता म्हणजे वैश्य. पूर्वी कैद्यांना मारून टाकीत. आता त्यांच्या श्रमावर ब्रह्म-क्षत्रिय जगू लागले. या कैद्यांना शूद्र म्हणू लागले. अशा रीतीने चातुर्वर्ण्याची निर्मिती झाली.

ब्राह्मण-क्षत्रियांनी बळकावलेली जादा संपत्ती ही त्यांची खाजगी मालमत्ता झाली. तिच्या (खाजगी मालमत्तेच्या) रक्षणासाठी शासनसंस्थेचा उदय झाला. उत्पादन जास्त झाल्याने त्याचा क्रय-विक्रय सुरू होऊन सोन्याला महत्त्व आले व

सोन्याच्या रूपात संपत्ती साठविणे सोयीचे झाले. खाजगी संपत्तीबरोबरच कुटुंब-संस्थेचा उदय झाला. मातृसत्ताक पद्धती कुटुंबातून लोप पावून पितृसत्ताक पद्धती सुरू झाली. वैश्य व शूद्र यांच्या बरोबरच स्त्रियाही गुलाम झाल्या, म्हणजे त्यांच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तूचा उपभोग इतर घेऊ लागले.

परंतु हा बदल सहजासहजी घडून आला नाही. वैश्य–शूद्रांनी गुलामगिरीविरुद्ध बंडे केली. शिलकी उत्पादनाचा ताबा घेण्यासाठी ब्राह्मण–क्षत्रियांतही आपापसात युद्धे झाली. भारतीय युद्ध हे अशाच प्रकारचे युद्ध होय. साम्यसंघाच्या अवस्थेतून गुलामगिरीच्या अवस्थेत जाताना, संक्रमण काळात हे युद्ध झाले.

आपल्या संघातील म्हणजे रक्तसंबंधी व्यक्तीस मारणे साम्यसंघाच्या नीति-विरुद्ध होते. सामान्यांच्या मनावर या नीतीचे सावट अजून शिल्लक होते. त्यामुळेच युद्धारंभी अर्जुनाच्या मनात संदेह निर्माण झाला. परंतु वर्णयुक्त समाजाच्या नव-नीतीत साम्यसंघाच्या नीतिनियमास स्थान नव्हते. श्रीकृष्णाने नवयुगाच्या नीतीची चाहूल ऐकली होती. म्हणून त्याने अर्जुनास तू क्षत्रिय असल्याने संपत्ती मिळविणे हे तुझे कर्तव्य आहे, त्यासाठी तू कोणाशीही लढण्यास तयार असले पाहिजेस हे गुलामगिरीच्या नव्या युगाचे सूत्र सांगितले.

अशा रीतीने साम्यसंघाच्या कालखंडातून आर्य बाहेर पडले व दुसऱ्यांच्या श्रमावर जगणारे लोक ज्यात असतात अशा नव्या समाजस्थितीचा स्वीकार त्यांनी केला. विकासाच्या या दुसऱ्या पायरीसच 'गुलामगिरी' असे नाव आहे. श्री. डांगे यांच्या विवेचनाचा सारांश हा असा आहे.

श्री. डांगे यांचे हे विवेचन वाचताना सुसंगत, सुसूत्र व तर्कशुद्ध वाटते आणि त्यातील चलाखी लक्षात येत नाही. परंतु अधिक विचार करता त्या विवेचनाच्या मर्यादा व त्रुटी ध्यानात येतात.

पहिले असे की, आर्यांचा हा इतिहास स्थलकालाच्या पार्श्वभूमीवर घडला असणार. काही मामुली उल्लेख सोडले तर या पार्श्वभूमीची कोणतीही दखल डांग्यांनी घेतल्याचे आढळत नाही. परीक्षानळीत बॅक्टेरिया तपासावेत तसे मार्क्स-वादाच्या नळीत घेऊन आर्य लोक तपासले गेले आहेत. बरे, हे लोक आर्य आहेत की इतर कोणी याचीही खात्री नाही. किंबहुना डांग्यांना त्याची पर्वाही नाही. प्रस्तावनेतच त्यांनी म्हटले आहे ' 'सध्या मला या लोकांच्या समाजव्यवस्थेचा विकास कसा झाला याचा विचार करावयाचा आहे. मग ते लोक आर्य, द्रविड, मुंड मुख-मेर कोणीही असोत.' (प्रस्तावना पृष्ठ १०).

दुसरे असे की, प्राचीन भारताचा इतिहास लिहिताना तत्कालीन वाङ्मया-बरोबरच उत्खननातून उपलब्ध होणारी माहिती, भाषाशास्त्र इत्यादींचा उपयोगही केला पाहिजे. परंतु डांगे-लिखित इतिहास सर्वस्वी वेदांवर भार टाकून उभा आहे. त्यामुळे सर्वांगीण माहितीचा अभाव त्यात जाणवतो.

त्याहून महत्त्वाची गोष्ट अशी की, वेदातील व महाभारतातील वचनांचा वापर फार काळजीपूर्वक केला पाहिजे. वेदातील वचनांचे अर्थ निरनिराळे लावले जातात. त्यातून आपणास वाटणारा अर्थच योग्य कसा हे सिद्ध करण्याची जबाबदारी लेखकावर येते. महाभारतात बराच मजकूर प्रक्षिप्तही आहे. त्यामुळे मूळ मजकूर कोणता व घुसडलेला कोणता याची छाननी झाली पाहिजे. पण अशी काही काळजी डांग्यांनी घेतलेली दिसत नाही. स्वतःला सोयीस्कर वाटलेली वचने घेऊन व त्यातील अद्भुताचा पसारा काढून टाकण्याच्या सबबीखाली मन मानेल तसा अर्थ लावून त्यांनी इतिहास मार्क्सच्या मोजपट्ट्यांनी, शिप्याने कपडा बेतावा तसा, 'बेतला' आहे.

मग हे पुस्तक म्हणजे आहे तरी काय ? तर मार्क्सवाद्यांना मान्य असलेल्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर आधारित एक 'मॉडेल' डांग्यांनी तयार केले आहे. त्याला त्यांनी प्राचीन भारताच्या नावाचे 'लेबल' चिकटविले आहे, इतकेच. या पुस्तकातील काल्पनिक समाज साम्यसंघाच्या अवस्थेतून गुलामगिरीच्या अवस्थेत मार्क्सच्या नियमाबरहुकूम जातो.

हे जर मान्य केले तर पुस्तक मनोरंजक आहे. वाचताना हा इंग्रजीचा अनुवाद आहे, हे क्वचित् जाणवते. मधून मधून पुनरुक्तीही आहे. मार्क्स व एंगल्सच्या पुस्तकातील लांबच लांब उतारे आहेत. तथापि विवेचनाला ओघ आहे आणि पुस्तक शेवटपर्यंत वाचवते. साम्यवादी पुस्तकांचा एकंदर साचा लक्षात घेता हेही कमी नाही.

**आदिभारत : श्रीपाद अमृत डांगे : इंडियन इंन्स्टिटयूट ऑफ सोशल स्टडीज : १६ रु.**

□

# यशवंतराव चव्हाण जीवनदर्शन

डॉ. पंजाबराव जाधव यांनी संपादन केलेल्या 'यशवंतराव चव्हाण जीवनदर्शन' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते, बालगंधर्व रंगमंदिरात, दि. २२ रोजी साजरा झाला. समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. ना. सी. फडके यांनी भूषविले होते.

कर्मवीर प्रकाशन संस्थेतर्फे सदर ग्रंथ प्रकाशित झाला आहे. यात अनेक स्मृतिकारांनी, श्री. चव्हाण यांचेविषयक आपल्या

हृद्य आठवणी दिल्या आहेत. या स्मृतिकारात श्री. नाईक, श्री. वसंतदादा पाटील यांसारखे नेते, श्री. ना. सी. फडके, शिरीष पै, श्री. गोपीनाथ तळवलकर असे अनेक साहित्यिक व लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. किर्लोस्कर, श्री. सोपानदेव चौधरी इ. विचारवंत यांचा समावेश आहे.

ह्या स्मृतिकारातील राजकारणी पुरुषांना, श्री. चव्हाण ह्यांच्याबद्दल आदर व्यक्त करावासा वाटतो तो श्री. चव्हाण हे कुशल नेते आहेत म्हणून ! नेतृत्वास अत्यावश्यक असणारी लोकसंग्रहकता त्यांच्यापाशी आहे. प्रकाशनप्रसंगी बोलताना श्री. नाईक यांनी हे स्पष्ट केले. ते म्हणाले की, ' मी त्यांना गेली १५ वर्षे जवळून पाहिले आहे. त्यांचा अभ्यास केला आहे. शेतकरी, साहित्यिक, संशोधक वगैरे कुठल्याही क्षेत्रात जरी ते गेले तरी तेथे ते आपलेसे वाटतात. निवृत्त झाल्यावर मलाही त्यांचे चरित्र लिहिण्याची इच्छा आहे.'

साहित्यिकांना ते का प्रिय आहेत, त्याचे गमक सांगताना श्री. ना. सी. फडके म्हणाले की, ' श्री. चव्हाण हे एक नामांकित वक्ते आहेत. त्यांच्या भाषणाला एक प्रकारची शैली आहे, प्रमाणबद्धता आहे. राजकीय नेतृत्व सांभाळावे लागत असल्यामुळे ते लिहितात फार कमी, पण त्यांच्या लेखनाला विशिष्ट दर्जा आहे. १९६४ सालच्या सह्याद्रीच्या दिवाळी अंकातील त्यांचा लेख वाचला म्हणजे याची प्रचिती येते.' या ग्रंथासाठी श्री. किर्लोस्कर यांनी लिहिलेल्या लेखात असे स्पष्ट म्हटले आहे की, ' औद्योगिक क्षेत्रात त्यांच्या-माझ्यात कितीही विरोध असो, पण तरीही ते मला एक जिव्हाळ्याचे स्नेही वाटतात. एक व्यक्ती म्हणून ते समाजात कसे वागतात हे विचारात घेण्यासारखे आहे.'

स्मृतिकारांच्या स्मृतिखेरीज, यशवंतरावांनी विविध प्रसंगी केलेली भाषणे एकत्रित करून, ' विचार मंथन ' नामक लेख ह्या ग्रंथात दिलेला आहे. विशेष म्हणजे कवी यशवंतरावांनी ह्या ग्रंथास सुंदर काव्य दिले आहे. ह्या काव्यातील ' हे जीवन म्हणजे साक्षात् संदेश हा ! ', ' दिलखुलासपण बिंबले येथ लोचनी ', ' ही समूर्त कळकळ येथ उभी ठाकली ' इ. यशवंतजींच्याबद्दलचे उद्गार मनावर ठसणारे आहेत.

ह्या पुस्तकातील सगळ्यात लक्षवेधक भाग म्हणजे यशवंतरावांचे आत्मनिवेदन ! त्यात शालीनता आहे, सौजन्य आहे.

या ग्रंथाचे संपादक श्री. पंजाबराव जाधव हे शिंदे गावचे खंदे लेखक आहेत. त्यांनी यापूर्वी कर्मवीर भाऊराव पाटील जीवनदर्शन हा ग्रंथ लिहिला आहे. यशवंतरावांचा जीवनपट लिहिताना त्यांना सुमारे ७३ लेखकांचे सहाय्य मिळाले. पण त्यामुळेच ह्या ग्रंथात एक प्रकारचा दोष निर्माण झाला आहे. तो म्हणजे, इतक्या लेखकांच्या लेखाचा समावेश करावयाचा असल्याने, प्रत्येकाचाच लेख त्रोटक झाला आहे. तरीही हा ग्रंथ सर्वांनाच विशेषतः तरुणांना स्फूर्तिदायक ठरणारा आहे.

— विद्या काळे

डॉ. नरेंद्र दाभोळकर

# विज्ञानरंग

## सांभाळा ! बाळाला दात येत आहेत !

जुनी पिढी, जुनी माणसे आणि त्यांचे विचार आणि नवी पिढी, नवी माणसे आणि त्यांचे विचार यांच्यातील मतभेद हे एक सार्वत्रिक सत्य आहे. रहाणे, वागणे, आवड–निवड या साऱ्या बाबतीत कालच्या–आजच्या पिढीत फरक आढळतोच. पण काही ठिकाणी ही मतभिन्नता संघर्षाचे रूप धारण करते.

मुलाची वाढ हा असाच एक वादग्रस्त मुद्दा. छोटया बाळावर आईएवढेच प्रेम करणाऱ्या आजीला मुलाच्या निकोप, मानसिक आणि शारीरिक वाढीच्या नावाखाली जे प्रयोग चालू असतात त्याचा बहुधा राग असतो. एवढया तेवढया कारणावरून डॉक्टरांच्याकडे पळणारे मुलाचे आई–वडील तिला घाबरट वाटतात.

याची सुरुवात होते बहुधा दात येण्यापासून. सहा महिन्यापासून ते वर्षापर्यंत मुलाला होणारे पडसे, खोकला, हगवण, ओकाऱ्या, झटके किंवा इतर काहीही हे सर्व आजीबाईंच्या मते दात येण्याच्या वेळी होणाऱ्या त्रासाचाच एक भाग असतो आणि या साध्या गोष्टीसाठी डॉक्टरांकडे धावपळ करण्याची काय गरज ?

पण आजचे विज्ञानयुग आजीच्याविरुद्ध साक्ष घेऊन उभे आहे. फिनलंडच्या अव्हि टालनेन या प्रख्यात बालरोगतज्ञाच्या मते दाताचा आणि वरील त्रासाचा काहीही संबंध नसतो. हा संबंध जोडून आपण एकप्रकारे धोकाच पत्करत असतो. कारण मुलाला येणाऱ्या झटक्याचे कारण मेंदूच्या सुजेत असेल वा खोकला-ताप फुफ्फुसाच्या रोगामुळे असेल हे आपण मुळी दृष्टीआडच करतो. बाळाला दात येताना होणाऱ्या त्रासाचे स्वरूप जास्तीतजास्त थोडी अस्वस्थता, बोटे चोखणे, हिरडया घासणे, चेहरा वेडावाकडा करणे एवढया पुरतेच मर्यादित असते.

हिरडयातून दात बाहेर येताना त्रास हा होतोच. तो टाळण्यासाठी प्राचीनकाळी अनेक प्रकारच्या वनस्पतींची तेले वा प्राण्याची चरबी हिरडयावर चोळण्याची पद्धत होती. सशाच्या मेंदूचे तेल खास गुणकारी समजले जाई. हा त्रास कमी करण्यासाठी मार्गारेट स्मीथने लिग्नोकेन, अल्कोहोल आणि कॉर्बालीक ॲसिड यांचे मिश्रण समप्रमाणात करून ते पाच महिन्यापासून ते तीस महिन्यापर्यंतच्या तीनशे मुलांना लावले. आश्चर्य म्हणजे यापैकी कोणत्याही मुलाला दात येताना कसलाही त्रास झाला नाही.

मग दात येताना जो त्रास होतो तो होतो तरी कशामुळे ? त्याची दोन कारणे देत येतात. एक म्हणजे मुलाला आईच्या उदरातून मिळालेली रोगप्रतिकारक शक्ती सहा ते आठ महिन्यापर्यंत संपून जाते. त्यानंतर स्वतःची रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होण्यास उशीर लागतो. त्यामुळे मूल सहा महिन्यानंतर चटकन आजारी पडते दुसरे म्हणजे सहा महिन्यानंतर अंगावरचे दूध बंद होऊन बहुतेक सर्व मुले बाहेरचे अन्न थोडे बहुत घेऊ लागतात. या नवीन स्वरूपाच्या पदार्थाची सवय पचनसंस्थेला होण्यास काही वेळ लागतो व त्यातून पोटाच्या तक्रारी उद्‌भवतात.

एकूण काय ? दाताचे कारण पुढे करून बाळाचा मूळ रोग दृष्टिआड न करण्याची खबरदारी घेणे जरुरीचे आहे. □


# केशरी डाळ : भयानक आपत्ती

सकस अन्नाच्या अभावातून निर्माण होणारे रोग या देशात नवीन नाहीत. वाढत्या अंगाची मुले, गरोदर स्त्रिया, काबाडकष्ट करणारा श्रमिक या साऱ्यांच्या प्रकृतीच्या अपुऱ्या आहारामुळे निर्माण होणाऱ्या समस्या हाच खरा या देशातल्या विज्ञानापुढील आणि वैद्यकीयशास्त्रापुढील प्रमुख प्रश्न आहे.

पण दुर्दैव एवढयावरच थांबत नाही. मुबलक प्रमाणावर मिळणाऱ्या, वापरले जाणाऱ्या आणि भरपूर कॅलरी देवू शकणाऱ्या धान्यात ज्यावेळी विषारी द्रव्ये आढळतात त्यावेळी अन्न आघाडीवरची लढाई किती प्रकारे द्यावी लागेल याची कल्पना येते.

मध्यप्रदेश आणि राजस्थानातील कित्येक जिल्ह्यात केशरी डाळीचे पीक अमाप प्रमाणात येते. दुष्काळीप्रदेशात पाण्याच्या थेंबाशिवाय हे पीक तरारून उभे असते. चवीला चांगले, जीवनसत्त्वे भरपूर आणि नत्रयुक्त अन्नांश तर इतर कोणत्याही डाळीपेक्षा जास्त. शेतमजुरांना कामाचा मोबदला धान्यात देण्यासाठी जमीनदार या डाळीचा सर्रास उपयोग करतात. गरीब लोकांनाही विकत घ्यायला परवडेल इतके डाळीचे दर स्वस्त असतात. डाळीच्या पिठाची चपाती हे ह्या भागातील लोकांचे प्रमुख आवडीचे अन्न ठरले आहे.

येथेच दुर्दैवाच्या कहाणीचा प्रारंभ होतो. ही चपाती खाणाऱ्या शंभरांपैकी किमान दोघांचे बाबतीत तरी ही डाळ आपला प्रताप दाखविते. पाय प्रथम जड होतात' ताकद गेल्यासारखी वाटू लागते, पाय ताठ करता येत नाहीत, पायातून आणि पाठीतून जबरदस्त कळा येऊ लागतात आणि सरतेशेवटी माणूस कंबरेखाली लुळा बनतो. आपले घरदार आणि गाव सोडून भिकारी बनण्यापलीकडे त्याला दुसरा पर्यायच रहात नाही. सुमारे पस्तीस हजार लोक रेवा आणि सटाणा या केवळ दोन जिल्ह्यात



केवळ रेवा आणि सटाणा जिल्ह्यातली संख्या ३५ हजारावर

या डाळीमुळे लुळे झाले आहेत. अगदी सुरुवातीच्या काळात जर डाळीची चपाती खाणे बंद केले तर सुधारण्याची शक्यता असते, पण एकदा लुळेपण आल्यावर मग कशाचाच उपयोग होऊ शकत नाही.

राष्ट्रीय अन्न-प्रयोगशाळेत यावर सातत्याने प्रयोग चालू आहेत. त्यामध्ये या डाळीतून लॅथरस सटायव्हस् (Lathyrus Sativus) हे द्रव्ये हुडकले गेले. साऱ्या त्रासाचे मूळ हेच विषारी द्रव्य आहे. माकडे, उंदीर, कोंबडया, कबुतरे या सर्वांवर प्रयोग झाले आणि ते प्राणी विषारी द्रव्य टोचल्यापासून काही तास वा दिवसाच्या आतच पांगळे झाले ते कायमचे. या हलाहलाची प्रायोगिक सिद्धता पूर्ण झाली.

खरा प्रश्न पुढेच होता. पहिले उत्तर अगदी सोपे होते. डाळीचे उत्पादन कायद्याने बंद करा. दुष्काळामध्ये राजाने उपाशी जनतेला फक्त दूधभात खाऊन जगण्याच्या

केलेल्या उपदेशाप्रमाणे हा उपाय वाया गेला. केशरी डाळ खायची नाही तर पोटाची खळगी भरायची कशाने ? इतके सुलभ आणि सकस अन्न दुसरे मिळणार कोठून ? पांगळेपण आले तर ? देवाची मर्जी, आपण काय करणार ? त्यामुळे कायद्याने पिकाच्या लागवडीला बंदी करण्यास कडाडून विरोध झाला. कल्पना सोडून द्यावी लागली.

यानंतर आणखी काही मार्ग हाताळले गेले. डाळ जर पाण्यात उकळून घेतली तर त्यामुळे सुमारे नव्वद टक्के विषारी द्रव्य नाहीसे होते हे सिद्ध झाले. पण या प्रकारात डाळीतील बहुसंख्य जीवनसत्वे व अन्नांशही नाहीसा होत होता. त्यामुळे ही कल्पना बाजूला पडली.

प्रथम साधारण गरम पाण्यात डाळ शिजवावयाची. नंतर पंधरा मिनिटे वाफारावयाची आणि मग ती उन्हात वाळवावयाची याचा प्रयोग झाला. जवळ जवळ सर्व विषारी द्रव्याचा नाश या पद्धतीने होत होता. पण जीवनसत्वाचा नाश मात्र नाममात्र होता. अडचण निराळीच आली. या प्रक्रियेनंतर केलेल्या डाळीच्या पिठाची मुळी चपातीच लाटता येईना. चव गेली ते वेगळेच. पण तरीही या पद्धतीचा प्रचार करण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहिले आहे.

यापेक्षाही एक वेगळे उत्तर या प्रश्नाला देण्याचा आज प्रयत्न चालू आहे. केशरी डाळीतही प्रकार आहेत आणि त्यात विषारी द्रव्याचे प्रमाण हे ५% ते २·५% असे भिन्न भिन्न आढळते. तेव्हा सगळ्यात कमी विषारी द्रव्य असलेल्या डाळीचे बी तयार करून शेतकऱ्याने द्यावे या दिशेने प्रयोग चालू आहेत.

आपल्या तोंडामध्ये ब्रह्मांड दाखविणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाप्रमाणे प्रयोगशाळेत प्रयोग करणारा वैज्ञानिक उपाशी पोट, लोकशिक्षण, जमीनदारी, भिकारी ह्या साऱ्या समस्यांशी कसा जोडलेला असतो याचा हे प्रयोग म्हणजे पुरावाच आहे.

## ‘ वाचकांचा कौल ’

विज्ञानेश्वरीसाठी काय लिहावे ? कोणते बघावे ? काय आवडते ? लेखक संपादक आणि वाचक यांनीच या प्रश्नाची उत्तरे द्यावयाची असतात. ज्या क्षेत्रातील आपणास माहिती आहे आणि सुगम, आकर्षक भाषेत आपण वाचकांपर्यंत पोचवू शकतो ते लेखकाने निवडावे. संपादकाने आपले संस्कार करावेत. मग रहाते ते वाचकांचे काम ! ते अगदी स्वतंत्र ! त्याला नीरक्षीर विवेक आहे. वय, बौद्धिक पातळी, सामाजिक परिस्थिती याप्रमाणे ही त्याची अभिरुची बदलते हे, खरे पण शास्त्रीय विषयाबद्दल कुतूहल हे सर्वमान्य आहे. यात केवळ बौद्धिक भूक भागविण्यासाठी शास्त्रीय वाचन करणारे फारच थोडे. समाज आणि शासन यांचे परस्परावर परिणाम घडत असतात, प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यक्ती ते अनुभवत असते. ही शास्त्रे, त्याचे परिणाम, त्याचे कारण, स्वरूप, भावी रूप याबद्दल वाचकांना जिज्ञासा असते. ती भागविण्यासाठी ते शास्त्रीय लेख वाचतात. हे कुतूहल नेमके ओळखणे आणि पूर्ण करणे हे लेखकाचे खरे काम.

हे माझे वैयक्तिक मत नव्हे. डॉ. रे यांनी science for citizens या अ. भा. परिसंवादात 'विज्ञान आणि वाचक' या संदर्भात ही मते मांडली. कुठल्या वर्गातील वाचकांना काय आवडते याचा त्यांनी अनेक ठिकाणाहून माहिती मिळवून परिश्रमाने केलेला तक्ता मनोरंजक आहे आणि माहितीपूर्णही.

| शालेय विद्यार्थी वाचक | महाविद्यालयीन विद्यार्थी वाचक | विद्यार्थी नसलेले वाचक | सर्व थराच्या वयातील वाचक |
|---|---|---|---|
| गणिती कोडी | अणुशक्ती | अवकाश यात्रा | नवे शास्त्रीय शोध |
| घरी छोटया वस्तू तयार करणे | कारखान्यात वस्तू कशा तयार होतात | विमान | अवकाश यात्रा |
| शास्त्रीय शोध | मोठे स्थापत्य शास्त्राचे प्रकल्प | मोठे औद्योगिक प्रकल्प | अणुशक्ती |
| विमाने | शास्त्रीय शोध | कारखान्यात वस्तु कशा तयार होतात | मोठे स्थापत्य-शास्त्राचे प्रकल्प |
| अणुशक्ती | अवकाश यात्रा | शास्त्रीय शोध | कारखान्यात वस्तु कशा बनतात |
| शास्त्रज्ञांची चरित्रे | गणिती कोडी | घरी छोटया वस्तू तयार करणे | घरी छोटया वस्तू तयार करणे |
| अवकाश यात्रा | दुसऱ्या देशाचे लोक | दुसऱ्या देशाचे लोक | विमाने |
| मोठे स्थापत्य-शास्त्राचे प्रकल्प | विमाने | अणुशक्ती | गणिती कोडी |
| कारखान्यात वस्तू कशा तयार होतात | घरी छोटया वस्तू तयार करणे | खगोल शास्त्र | शास्त्रज्ञांची चरित्रे |
| शेतीज्ञान | शास्त्रज्ञांची चरित्रे | भूगर्भ शास्त्र | दुसऱ्या देशातील लोक |
| वैद्यकीय शोध | खगोल शास्त्र | प्राणी व पक्षी | वैद्यकीय शोध |
| वनस्पती | वैद्यकीय शोध | शेतीज्ञान | खगोल शास्त्र |
| प्राणी व पक्षी | प्राणी व पक्षी | वैद्यकीय शोध | प्राणी व पक्षी |
| दुसऱ्या देशातील लोक | भूगर्भ शास्त्र | गणिती कोडी | शेतीज्ञान |
| भूगर्भ शास्त्र | शेती | वनस्पती शात्र | भूगर्भ शास्त्र |
| खगोल शास्त्र | कीटक शास्त्र | शास्त्रज्ञांची चरित्रे | वनस्पती शास्त्र |
| कीटक शास्त्र | वनस्पती | कीटक शास्त्र | कीटक शास्त्र |

□ □ □

## रंगभूमि

सौ. पुष्पा भावे

## गिरिश कर्नाड

# ययाती

पौराणिक कथानकातील मूलभूत संघर्षांना महत्त्व देऊन त्यांची कालातीत पुनर्रचना करण्याचे प्रयत्न ख्रिस्तोफर फ्रायसारख्या पाश्चात्य नाटककाराने फार समर्थपणे केलेले दिसतात. भारतामध्ये पौराणिक कथानके आणि मनोरंजनप्रधान संगीत रंगभूमी यांचे साहचर्य घनिष्ठ असल्यामुळे अशा प्रयत्नांना आत्तापर्यंत वाव मिळालेला आढळत नाही. पौराणिक कथानाकांची पुनर्निमिती करताना, त्यातील कथानकाचा आराखडा वाचक-प्रेक्षकांना अगोदरच माहीत असल्यामुळे, नाटककाराला, कथानकाविषयीच्या प्राथमिक कुतूहलापलीकडे जाता येते; इतकेच नाही तर विशिष्ट समाज, विशिष्ट काल अशा संदर्भापासून दूर, प्रतिकृतिवादी रंगभूमीच्या जाचक चौकटीपासून मुक्त, अशा पातळीवर नाट्यनिर्मिती करता येते. यामुळे आजच्या आकांक्षी नाटककारांनी पौराणिक कथानकांकडे वळणे साहजिक होते.

श्री. वि. वा. शिरवाडकर यांनी आपल्या 'ययाती आणि देवयानी' या नाटकाच्या पहिल्या अंकामध्ये जुन्या पौराणिक संघर्षाला मनोविश्लेषणात्मक नवा अर्थ देण्याचा प्रयत्न केला; परंतु हे नवे सूत्र, नाटकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अंकात, रूढ रचनेमुळे, हरवून गेले. त्यातच या नाटकाचा प्रयोग 'धी गोवा हिंदू असोसिएशन' सारख्या पारंपरिक रंगसंस्थेकडे असल्यामुळे त्याचे उरलेसुरले वेगळेपण प्रयोगात नष्ट झाले. याच नाटकाच्या रचनेचा विचार करत असताना प्रथमत: श्री. गिरीश कर्नाड यांच्या 'ययाती' या कानडी नाटकाचा उल्लेख कानावर आला. लवकरच त्याचे हिंदी भाषांतर हस्तलिखित स्वरूपात वाचायला मिळाले.

श्री. कर्नाड यांनी नाटकाची रूढ तीन अंकी रचना नाकारून, सलग पाच दृश्यांतून या नाटकाची रचना केली आहे. (मराठी रंगमंचावर जाचक असणारी तीन अंकी रचना अशा अनेक प्रयोगांनी मोकळी होणे अत्यावश्यक आहे; कारण मराठीतील अनेक चांगल्या नाटकांचा घाट या तीन अंकी आग्रहामुळे बिघडला आहे.) श्री. कर्नाडांचे नाटक हा, पुत्रकर्तव्य म्हणून पित्याचे वार्धक्य स्वीकारणाऱ्या महाभारतातील पुरूकडे अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा एक प्रयत्न आहे. आपल्या चंद्रवंशाचे गुणगान ऐकून या पुरूला अभिमान वाटत नाही. किंबहुना त्याला हे ओझे टाकून देऊन, पाटी कोरी करून, केवळ एक अस्तित्व जगायचे आहे. त्याचबरोबर शर्मिष्ठा ही दानवराजकन्या होती या तपशीलाचा गहन उपयोग करण्याचा प्रयत्न नाटककाराने केलेला दिसतो. जणु तिच्या मायावीपणामुळे, तिला दिलेल्या शापाच्या भोवऱ्यात सारे ओढले जातात. शरीराच्या लालसेने जगणाऱ्या कोणाही माणसाप्रमाणे यातील ययाती भेकड आहे : शर्मिष्ठेपाशी वा देवयानीपाशी आपल्या अनेकस्त्रीत्वाची प्रौढी सांगणारा हा ययाती चित्रलेखेने तर्काच्या कात्रीत पकडल्यावर व्यभिचार इत्यादी संकेतांच्या मागे लपण्याचा प्रयत्न करतो. परंतु अर्थहीन भासणाऱ्या तिच्या आत्महत्येनेच त्याला स्वतःच्या तारुण्याचे वैयर्थ्य जाणवून तो पुरूला ते परत देतो. तरुण झालेला पुरू एकच प्रश्न विचारत राहतो : 'या साऱ्याचा अर्थ काय?'

या नाटकाची हिंदी संहिता वाचतानाही त्याच्या रचनेतील सैलपणा जाणवला होता. विशेषतः भूतकाळ नाकारणाऱ्या पुरूने आईच्या अंतःपुराचा ध्यास घेणे फारसे सुसंगत वाटत नव्हते, तरी त्या नाटकात दृश्यात्मक सामर्थ्य खचित होते. या नाटकाचा प्रा. श्री. र. भिडेकृत मराठी अनुवाद 'अभिव्यक्ती' या संस्थेने सादर केला.

श्री. सत्यदेव दुबे यांनी दिग्दर्शित केलेल्या मराठी 'ययाती'चा प्रारंभ काळ्या कापडांनी वेढलेल्या रिकाम्या अंतर्गृहात होतो. त्याच्या एका कोपऱ्यात केशरी तेजाने झळकणारा फक्त एक उंच स्तंभ–बाकी पौराणिक रंगमंचावरील सामानाची नेहमीची गर्दी फारशी नाही. वासनेचे ललित सुचवण्यासाठी या स्तंभाची योजना फार परिणामकारक झाली आहे. ययातीची भूमिका डॉ. श्रीराम लागू यांनी केली आहे, त्यांच्या नेहमीच्या सहजतेने–आवाज काहीसा बदलून–ही भूमिका ते चांगली करतातच; पण त्याचबरोबर पौराणिक परिवेष सावरण्याचा डौलही साधतात. त्यांच्याबरोबर पुरूची भूमिका, 'सुलतान' एकांकिकेतील नायकाच्या भूमिकेने प्रसिद्धी पावलेल्या श्री. प्रभाकर पाटणकर या नटाने केली आहे. या नटाची उंची काहीशी गैरसोयीची आहे. याची जाणीव असल्यामुळे किंवा ती त्यांची लकब असल्यामुळे ते किंचित पोक काढतात. अर्थात पुरूच्या भूमिकेत या दोषाला थोडा

अर्थही प्राप्त झाला आहे. या नाटकातील पुरू विकल वा बावळट नसून वंश पौरुष यांच्या रूढ कल्पना नाकरणारा बंडखोर आहे याची जाणीव नटाला पुरेशी झालेली नसावी असे वाटले. मात्र 'सुलतान'मधील राजशेखर आणि प्रस्तुत 'ययाती' मधील पुरू या भूमिकातील बेअरिंग्जचा वेगळेपणा श्री. पाटणकरांनी असा सांभाळला की त्यांच्याबद्दल काही अपेक्षा निर्माण व्हाव्या. देवयानीची भूमिका सौ. सुनीला प्रधान या नटीने अतिशय उथळ पद्धतीने सादर केली. अस्वस्थ झाल्यावर पदर चुरगाळणे, अथवा रंगमंचावर फेऱ्या घालणे, यापलीकडे भावनेचा आविष्कार त्यांच्या चेहेऱ्यावर दिसू शकत नव्हता. श्री. सत्यदेव दुबे यांच्यासारख्या कल्पक दिग्दर्शकाने असा अभिनय मान्य करावा हे खटकले. शर्मिष्ठेची या नाटकातील महत्त्वाची भूमिका सौ. सुलभा देशपांडे या गुणी नटीने केली आहे. त्यांच्या नेहमीच्या भूमिकांपेक्षा ही भूमिका काहीशी वेगळी होती. तिचे त्यांनी चीज केले आहे. फक्त, शर्मिष्ठा दानवकन्येला सहज अशा मायावीपणाने ययातीला भुलवते त्या प्रसंगी मात्र त्यांचा अभिनय काहीसा तोकडा पडला असे वाटले. मराठी रंगभूमीवरील औचित्याच्या कल्पनाही कदाचित त्यांच्या अभिनयाच्या आड आल्या असतील. दासी स्वर्णलतेचे काम डॉ. ज्योत्स्ना कार्येकर यांनी समजून केले. नाटकातील छोटी परंतु महत्त्वाची, पुरूपत्नी चित्रलेखेची भूमिका कु. रेखा सबनीस यांनी केली होती. 'अभिव्यक्ती'च्या आधीच्या प्रयोगातून त्यांच्या अभिनयाचे घडलेले दर्शन (आणि विशेषतः श्रवण) फारसे अपेक्षा वाढवणारे नव्हते. या नाटकातदेखील त्यांची दोषास्पद कृत्रिम उच्चारसरणी गंभीर प्रसंगी नाचपरिणामात व्यत्यय आणत राहिली. गेली दहा वर्षे संस्कृत-मराठी हौशी रंगमंचावर वावरणाऱ्या या सुशिक्षित नटीला आपले उच्चार सुधारता येऊ नयेत, वा त्याची गरज वाटू नये हे मोठे आश्चर्य आहे.

श्री. श्री. र. भिडे यांचा मराठी अनुवाद हिंदी अनुवादाच्या तुलनेने, अनेक ठिकाणी निष्प्रभ, तर काही ठिकाणी भावविवश झाला आहे. यामुळे श्री. कर्नाडांच्या वृत्तीतील संथता, मराठी प्रयोगात, डॉ. लागू, सौ. सुलभा देशपांडे व श्री. प्रभाकर पाटणकर यांनी आपल्या अभिनयाने निर्माण करण्याचा यत्न करूनही, साकार होऊ शकली नाही. आरंभीचा सूत्रधार नवशिका नट असल्यामुळे श्री. कर्नाडांची पौराणिकाकडे पाहण्याची दृष्टी आपल्या निवेदनातून तो प्रस्थापित करू शकला नाही. (या नटाच्या बोलण्यात श्री. माधव वाटवे यांचे अनुकरण सहज जाणवत होते.)

आश्चर्य म्हणजे या अनेक नकारात्मक गोष्टीतूनही जे नाटक साकार झाले त्यातून त्यातील प्रयत्नांचे लक्षणीयत्व जाणवत होते. गेल्या वर्षात मराठी रंगमंचावर सादर केलेल्या या आणि अशा अनुवादित प्रयोगांनी एक ताजे प्रसन्नत्व निर्माण झाले आहे. येणाऱ्या वर्षात रंगमंचमाध्यमाचा नवा आविष्कार पाहायला मिळणार, अशी आशा वाटू लागली आहे.

□

# चक्रव्यूह

शरद गोखले

परिस्थितीच्या भोवऱ्यामध्ये सापडल्यामुळे ज्याच्या आयुष्याची घडी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे अशा एका दुर्दैवी, भावनाप्रधान, कर्तव्यनिष्ठ इंजिनिअरचे भावस्पर्शी व्यक्तिचित्रण रंगधारा या नाटयसंस्थेच्या 'चक्रव्यूह'मध्ये पहावयास मिळते.

इंजिनिअर अकूत हा रेल्वे खात्यातील वरिष्ठ अधिकारी. बनखेडी या गावाजवळ नव्यानेच होत असलेल्या रेल्वेपुलाच्या कामावर त्याची नेमणूक झाली आहे. खाजगी कंपनीने टेंडर भरून पुलाचे काम मिळवले आहे. कामाच्या दर्जाबद्दल रेल्वेतर्फे मान्यता देण्याची जबाबदारी इंजिनिअर अकूतवर आहे. अवास्तव वाटावे इतक्या कमी रकमेत काम करण्याची तयारी दाखवल्याने कामाबाबत बदनामी होणार हे निश्चित असते. 'कोटेशन'-प्रमाणे काम होतंय् की नाही याची पहाणी हा कर्तव्य-कठोर इंजिनिअर डोळयात तेल घालून करत असतो. खाजगी कंपनीला इतका प्रामाणिक अधिकारी मानवणे शक्य नसते. मग कंपनीचे इंजिनिअर दिवाणसाहेब त्याला नमवण्याचे सर्व प्रयत्न सुरू करतात. इंजिनिअर आणि त्याचा मित्र शाम यांच्या आयुष्यातील बारीक सारीक तपशील मिळवून सर्व आघाड्यांवर मोर्चे बांधतात.

इंजिनिअर साहेबांच्या घरात ते स्वतः, सुस्वरूप पत्नी चंदा, आणि सख्ख्या भावापेक्षा जास्त मायेनं साहेबांना जपणारा त्यांचा मित्र शाम. एका सायंकाळी एक पत्र येते आणि या घरातील सर्व स्वास्थ्य नाहीसे होते. घरातील वातावरण बदलते. पति-पत्नींमध्ये दुरावा निर्माण होतो. चंदाच्या वडलांना याची खबर लागते. ते येऊन दाखल होतात. आणि घरातील प्रत्येक जण साहेबांच्या बदलत्या वर्तनामागील कारणांचा शोध घेऊ लागतो.

मुक्ता ही इंजिनिअर साहेबांची प्रेयसी. वेश्येची मुलगी असल्याने लग्न होण्याची शक्यता दुरावते. इतकेच नव्हे तर आईच्या आग्रहाखातर इंजिनिअर अकूत रीतीभातीनं बोहल्यावर चढतात. घरात चंदा आणि मनात मुक्ता अशी विचित्र अवस्था असते. बाह्यात्कारी सर्व गोष्टी चार चौघांप्रमाणे दिसत असतात. आणि एक

श्री. ना. पेंडसे
पुरुषोत्तम बाळ
सतीष दुभाषी
उषा सरपोतदार
शंकर घाणेकर
सुमन आरेकर
चंद्रकांत गोखले
मोहन कोठीवान

कोणा एकाचा उल्लेख म्हणजे दुसऱ्यावर अन्याय

दिवस अकल्पितपणे ते पत्र येते. भावनाप्रधान इंजिनिअरच्या जिव्हारी घाव बसतो.

पत्रातील रहस्याचा उलगडा झाल्यावर आणि इंजिनिअर साहेबांच्या आयुष्यातील मुक्ताचे स्थान माहीत झाल्यावर चंद्रा आत्महत्या करते.

आत्महत्या की खून याचा निर्णय घेताना पोलिसांचा कल खुनाकडे झुकू लागतो. परिस्थितीजन्य पुरावा इंजिनिअर अकूत यांना आरोपीच्या पिंजऱ्यात नेऊन बसवतो. सत्यप्रियतेपायी ज्यांच्याशी सतत संघर्ष करावा लागतो ते इंजिनिअर दिवाण प्रत्यक्ष खुनाचे वेळी इंजिनिअर अकूत आपल्याबरोबर असल्याचा पुरावा सादर करतात. आणि आपल्या आयुष्यात आलेल्या प्रत्येकाच्या पदरात दुःख टाकणारा हा इंजिनिअर सर्वस्वाचा त्याग करून वेगळ्या वाटेने एकटाच वाटचाल करू लागतो.

## आकर्षक मांडणी : वेधक व्यक्तिचित्रण

श्री. ना. पेंडसे यांच्या लिखाणाची बैठक छान जमली आहे. विशेषत: व्यक्तिचित्रणातील त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. नाटकाची मांडणी रसपरिपोष करणारी असून अंकांची तोड परिणामकारक आहे. नाटकातील प्रमुख व्यक्तिरेखा तीन–इंजिनिअर अकूत, पत्नी चंदा, आणि प्रेयसी मुक्ता. इंजिनिअर अकूत चारचौघांपेक्षा वेगळा आहे. नात्याने आई नसलेल्या, पण मातेचे प्रेम दिलेल्या स्त्रीसाठी प्रेयसीचा त्याग करतो. तडजोडीनं दोघं बाजूला होतात आणि मग रीतीनं केलेल्या लग्नानं घरात आलेल्या चंद्राबरोबर इंजिनिअर अकूत सुखी संसाराचं चिरेबंद नाटक सुरू करतात. अभिनयाची पातळी इतकी सुरेख की संबंधीतानाही ते वास्तव वाटावं. मुक्ताला आपल्यापासून मूल झालं आणि ते गेलं, ही वार्ता या भावनाप्रधान इंजिनिअरनं चढवलेला मुखवटा फाडून तोडून टाकते. कामाच्या जबाबदारीचा ताण आणि मनःस्वास्थ्य नाहीसं करणारं हे वृत्त, यांच्या कैचीत इंजिनिअर खचत जातो. आणि त्याची इच्छा नसूनही निरपराध चंदा भरडली जाते. पतीच्या आयुष्यातील एकमेव स्त्री आपणच असल्याचा तिचा समजही खोटा ठरतो आणि अकूतशिवाय आयुष्याचा विचार करण्यासही तयार नसल्याने ती आत्महत्या करून आपल्यापरीनं कोंडी फोडण्याचा प्रयत्न करते.

विवाहाची शक्यता नसूनही मुक्ताशी संबंध येऊ देण्याइतपत ज्याच्या नीतिकल्पना सैल आहेत– असा अकूत सर्व मोह टाळून आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहू शकेल का ? अकूतचं व्यक्तिचित्रण लेखकानं अशा खुबीनं केलं आहे की ही गंभीर घटना भावनेच्या आहारी जाऊन केलेला प्रमाद ठरतो. या प्रमादाच्या परिणामांची कल्पना आल्यावर अकूतच्या लौकीक आयुष्याची होळी होते. नाटकाच्या अखेरीस आपल्या सर्व वर्तणुकीचा पुनर्विचार करताना अकूत पस्तावतो. आईच्या उपकाराचं ओझं कुठपर्यंत वहावं, त्याची किंमत कोणत्या मर्यादेपर्यंत द्यावी, याची उमज त्याला पडली नाही असे तो सांगतो. आपल्या कर्तव्यनिष्ठेपायी कंपनीचे इंजिनिअर दिवाण यांचा सर्वनाश झाला. पण परिस्थितीशी तडजोड न स्वीकारता

आपण ज्या ताठपणाने वागलो त्याची आवश्यकता होती का? असा प्रश्न विचारून अकूत स्वतःच म्हणतो, 'या परिस्थितीत मी असाच वागलो असतो. आणि अशा या वागण्यामुळे माझ्या आयुष्यात आलेल्या प्रत्येकाच्या पदरी दुःख आलं. माझ्या-सारख्या माणसांना या जगात थारा नाही.' असं म्हणून इंजिनिअर अकत हा चक्र-व्यूह भेदून जातो.

चंदाची व्यक्तिरेखाही निर्दोष असल्याने तिची आत्महत्या अपरिहार्य म्हणून स्वीकारावी लागते.

श्यामचा उपयोग रिलीफसाठी चांगला करून घेतला आहे. चंदाचे वडलांना—अण्णांना आपल्या मुलीच्या दुःखाच्या कारणांचा छडा लावून, तिच्या संसाराची घडी पुन्हा बसवून देण्याची इच्छा असते. जावयाचा आणि मुलीचा रोष पत्करून ते जावयाच्या घरात ठाण मांडून बसलेले असतात. त्यांच्या मुलाला—नरेशला अपघात झाल्याची खोटी तार करून त्यांना बाजूला केले आहे. मुलीच्या मृत्यूनंतर वास्तविक ते परत येणे अत्यंत स्वाभाविक; तथापि नाटककाराला त्यांची सोय लावणे अशक्य झाल्यानें त्यांचे पुनरागमन होत नाही.

दिवाण आणि मुक्ता यांचे व्यक्तिचित्रणही स्वाभाविक वाटते.

लाचलुचपतीभोवती नाटक बराच वेळ घोटाळले, तरी तो त्याचा मुख्य विषय नाही. सुरेख व्यक्तिचित्रण आणि निर्माण केलेल्या प्रसंगाद्वारा आपल्या पात्रांच्या (characters) मनोघडणीचा वेध घेऊन त्यांच्या वर्तणुकीचा तर्कसुसंगत अर्थ लावण्याचा प्रयत्न लेखनामध्ये पहावयास मिळतो.

श्री. पेंडसे यांचे संवादकौशल्यही वाखाणण्यासारखे आहे.

वेश्येच्या मुलीवर प्रेम करून—केवळ ती वेश्येची मुलगी असल्यानें तिच्याशी लग्न करण्यास नकार देणे आणि आईच्या आग्रहाखातर दुसरा संसार उभा करणे—हा भाग आता वापरून वापरून गुळगुळीत झाला आहे.

आपल्या प्रियकराच्या मनोरचनेची पूर्ण कल्पना असताना आणि एकदा त्याच्या मार्गातून बाजूला व्हायचा निर्णय घेतल्यावर—मुक्ताने त्याला पत्र लिहिण्याचे कारण काय? त्यातही आपल्याला त्याच्यापासून मूल होऊन ते गेले हे सांगून तिने काय मिळवले? पत्रापेक्षाही मुक्ताचे प्रत्यक्ष आगमन अतिशय कृत्रिम व योगायोगावर आधारलेले वाटते.

रंगधाराने निर्मितीची बाजू उत्तम संभाळली आहे. पुरषोत्तम बाळ या अभ्यासू, जाणत्या दिग्दर्शकाचे दिग्दर्शन प्रयोगास लाभले आहे. आपल्या सर्व कलावंतांवर त्यांनी भरपूर मेहनत घेतली आहे. मुक्ता, चंदा आणि अकूत यांचा प्रवेश त्यांनी मोठ्या कौशल्याने बसवला आहे. प्रवेशातील कांपोझिशन्स बोलकी आहेत. मुक्ता आणि अकूत यांचा प्रवेश अतिशय स्वाभाविक व वास्तव वाटतो. त्याचे पुष्कळसे श्रेय पडद्यामागील या मार्गदर्शकाला आहे.

मुक्तासाठी बेचैन झालेल्या अकूतच्या स्वप्नात मुक्ता येते आणि आपल्या चुकीमुळे मुक्ताच्या वाटयाला कोणते भेसूर आयुष्य आले असेल, याचे कल्पना-चित्र त्याच्या डोळयासमोर उभे राहते. दुसऱ्या अंकाच्या प्रारंभीचा हा सर्व भाग अतिशय परिणामकारक झाला आहे.

विनायक चासकर यांच्या नेपथ्याचा आणि प्रकाशयोजना–कौशल्याचा चांगला उपयोग करून घेतला आहे. सोफा सेटच्या बाजूंची चक्रव्यूही रचना सूचक आहे.

नाटकाची गरज पूर्ण करणारी इतकी चांगली टीम क्वचित पहावयास मिळते. सतीष दुभाषी (अकूत), उषा सरपोतदार (चंदा), शंकर घाणेकर (शाम), सुमन आरेकर (मुक्ता), चंद्रकान्त गोखले (अण्णा), मोहन कोठीवान (दिवाण) आणि आयत्या वेळी इन्स्पेक्टरच्या छोटया भूमिकेत उभे राहिलेले पुरुषोत्तम बाळ–या सर्वांच्या व्यक्तिगत प्रयत्नातून एक प्रत्ययकारी नाटय उभे राहते. एखाद्याचा नामनिर्देष म्हणजे दुसऱ्यावर अन्याय. तो होऊ नये म्हणून मुद्दाम 'फुल कास्ट' दिली. मोहन कोठीवान हा काहीसा नाटकी कलावंत–तथापि चांगला मार्गदर्शक मिळाल्याने दिवाणसाहेबांची भूमिका मोठया ताकदीने उभी करतो. सुमन आरेकर मुक्ताला न्याय देते, तो तिच्या चेहऱ्यावरील प्रभावी भावदर्शनाने. सतीष दुभाषी यांच्या वाटयाला अतिशय अवघड भूमिका आली आहे. काही वेळा ते 'मोनोटोनस' वाटतात. पण या भूमिकेचे स्वरूपच असे आहे की दोष क्षम्य समजला जावा. शंकर घाणेकर आपली कामगिरी चोख बजावतात.

उत्तम व्यक्तिचित्रण असलेली श्री. ना पेंडसे यांची ही नवीन कलाकृती, या गुणी नटसंचाद्वारा पहाणे हा एक घेण्यासारखा अनुभव आहे.

□ □ □

---

## डोळस आंधळा

नॅशनल पार्कमध्ये एक आंधळा हातातील काठी टेकून उभा होता. त्याच्या छातीवर एक पाटी लावलेली होती, 'आंधळयाला मदत करा.' पण त्याच्या जवळची कटोरी रिकामी होती !

थोडयाच अंतरावर आणखी एक आंधळा उभा होता आणि त्याच्या भांडयात पुष्कळशी चिल्लर गोळा झालेली होती. तेथून जाणारा येणारा प्रत्येकजण परत वळून त्याच्या भांडयात एखादे नाणे टाकीत असे.

त्या आंधळयाच्या छातीवरील पाटीत लिहिले होते–

'सर्वत्र वसंत ऋतु पसरला आहे, पण मी आंधळा आहे !'

– इंद्रधनु

---

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

५ ते ११ सप्टेंबर १९७०

**मेष :** मेष राशीची माणसे अत्यंत उद्धट, अभिमानी आणि आधिभौतिक असतात. त्यांना तत्त्वज्ञान अगर अतींद्रिय शास्त्रे येत नाहीत. या आठवड्यात तर त्यांचे पंचमात रवी-मंगळ-बुध व केतू अशी चतुर्ग्रही आहे. लग्नात शनी व सप्तमात गुरू-शुक्र-चंद्र असे सर्व ग्रह शुभस्थानातून भ्रमण करीत आहेत. चंद्राचे भ्रमण पहिले दोन दिवस सप्तमातून आहे. बाकी अष्टम व नवमस्थानातून आहे. विद्येत अपयश. संतती अत्यंत वाईट वागेल. पहिले दोन दिवस धनलाभ अमाप होईल. पत्नीच्या नावावर लॉटरी तिकीट घेतल्यास अचानक धनलाभ होईल. पहिले दोन दिवस गृहस्वास्थ्य बिघडेल. मानसिक यातना फार होतील. उद्योग-धंदा विशेषत: ट्रॅन्सपोर्ट, वर्कशॉप अगर जमिनीच्या देवघेवीचे व्यवहार करणारांना भरपूर फायदा होईल. शुभ तारखा ८।९।१०।११.

**वृषभ :** या राशीची माणसे फार गोडबोली असतात. पण या आठवड्यात वाचाशुद्धीपासून त्यांना काहीही फायदा होणार नाही. घरात अनेक पाव्हणे येतील. व त्यांची ऊठबस करण्यात मनस्वास्थ्य बिघडेल, व खर्च करावा लागेल. पत्नीकडून व भागिदाराकडून सर्व कामात सहाय्य मिळेल. सरकारी कामात यश प्राप्त होईल. पराक्रम योग उत्तम आहे. ता. ४।६ ला सार्वजनिक कामात भाग घेतल्यास मानसन्मान मिळेल. 'लग्नेशे षष्ठ गेहस्थे सिंहतुल्य पराक्रमी' सध्या लग्नेश सहाव्या घरात अष्टमेश व एकादशेश गुरूबरोबर आहे. हा योग धनलाभाला चांगला. इंडीकेटला प्रतिपक्षांकडूनसुद्धा चांगलीच मदत होईल. ता. ९।१० ला प्रतिष्ठेला कमीपणा येण्याचा संभव आहे. दशमातील राहू ४२ वर्षावरील पुढाऱ्यांना गुरू-राहूच्या ९।५ योगामुळे बचावून नेईल. सहाव्या घरातील गुरू दशम स्थानाशी व धनस्थानाशी नवम-पंचमयोग करीत आहे. तो धनाला व मानसन्मानाला चांगला आहे. शुभ तारखा ५।६।७।८.

**मिथुन :** या राशीची माणसे महाकारस्थानी व धूर्त असतात. या आठवड्यात तर त्यांच्या या धूर्तपणाला चांगलीच संधी मिळेल. तृतीयातील रवी-केतू, व बुध-मंगळ या परस्पर विरोधी तत्त्वाच्या ग्रहांच्या जोड्या अनेक चमत्कार घडवून आणतील. सरकारी काँग्रेसमधील काही लोक पक्ष बदलून प्रतिपक्षात जातील.

भावंडांशी विरोध उत्पन्न होतील. इंडीकेटमधील अडाणी व्यक्तींची समजूत घालणे जड जाईल. पंचमातील गुरू-शुक्र व भाग्यातील राहू हा ९।५ योग रंकाला राव करील. संतती व मित्रांकडून चांगली मदत होईल. बौद्धिक व्यवसाय म्हणजे साहित्य लेखक-प्रकाशक-संशोधक या सर्वांना आठवडा चांगला आहे. सरकारी नोकरांना त्रास आहे. वडील भाऊ आजारी पडण्याचा योग आहे. ता ५।६ प्रत्येक बाबतीत यशदायक आहेत. गुरू-शुक्र-चंद्र योगावर सट्टा, लॉटरीची तिकिटे घेतल्यास फायदा होईल. प्रवासयोग येईल. त्यात फायदाच होईल. अष्टमेश भाग्येश शनी एकादशात गुरूदृष्ट आहे. हा योगही गुरू-शुक्र-चंद्राच्या वर दिलेल्या योगाला मदत करील. शुभ तारखा ५।६।९।१०।११.

**कर्क :** या राशीत अत्यंत उदार आणि अत्यंत चंचल मनाची माणसे असतात. या आठवड्यात तर लग्नेश व चतुर्थेश चतुर्थात चर राशीत, सप्तमेश शनी दशमात व धनस्थानात दोन तुफान वादळे, रवी-केतू ग्रहण व मंगळ-बुध विरोधी ग्रहांची जोडी. ता. ५।६ ला घरात शुभ कार्याकरता – बहुतेक विवाहाकरता पुष्कळ पाव्हणे जमतील. एकाद्या स्थावर मालमत्तेचा सौदा ठरविण्याला दिवस चांगले आहेत. मात्र प्रत्यक्ष खरेदी नंतर करावी लागेल. सध्या धनाचा खडखडाट झालेला आहे. येणारे हजारो रुपये हातात पडणार नाहीत. त्यामुळे पत जाते की काय अशी भीती उत्पन्न होईल. संततीकडून नको असलेले व्यवहार हाताळले जातील. त्यात धननाश होईल. घरात वृद्ध माणसे विशेषतः आई-वडील आजारी पडतील. वारसा-हक्काने अगर मृत्युपत्राने हातात अचानक संपत्ती पडण्याचा योग ता. ९।१०।११ ला आहे. राग अनावर होईल. तुमचे म्हणणे कोणाला पटणार नाही. भावंडांशी तीव्र मतभेद होईल. 'मौनं सर्वार्थ साधनम्' या न्यायाने आपल्या बोलण्याला निर्बंध घालावा. शुभ तारखा ५।६।९।१०।११.

**सिंह :** या राशीची माणसे जिद्दीची असतात. लग्नेश-चतुर्थेश व भाग्येश रवी-मंगळ लग्नी आहेत. धनेश व एकादशेश बुध त्यांच्याबरोबर आहे. पंचमेश गुरू व सप्तमेश शनी समोरासमोर आहेत. तृतीयेश व दशमेश शुक्र गुरूजवळ तृतीयात. पहिले दोन दिवस ता. ५।६ ला चंद्रही तिसऱ्या स्थानात आहे. असे सर्वच ग्रह शुभ योगात आहेत. विद्येत चांगली यशःप्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. उद्योग-धंदा नीट चालेल. चंद्राचे भ्रमण ३।४।५ या घरातून आहे ते चांगले आहे. घरा-संबंधी व्यवहार यशस्वी होतील. भागीदारांकडून सर्व कामात मदत होईल. प्रवास घडेल. प्रवासात धंदा वाढण्याला मदत होईल. सरकारी व सहकारी कामात भरघोस यशःप्राप्ती होईल. अचानक धनलाभ होईल. फॅन्सी मालाच्या धंद्यात पैसा प्राप्त होईल. स्वभावात चिडकेपणा निर्माण होईल. त्यावर संयम पाळणे

जरूर आहे. ता. ७।८ ला घरात काहीतरी मंगल समारंभ होईल. शुभ तारखा ७।८।९।१०।११.

कन्या : कन्याराशीची माणसे व्यवहारात अत्यंत चतुर असतात. 'मुखमे रामनाम और बगलमे छूरी ' अशी त्यांची वृत्ती असते. लग्नेश-दशमेश बुध, व्ययेश रवी, अष्टमेश-तृतीयेश मंगळ व्ययात आहेत. शिवाय रवीजवळ केतू आहे. धनेश-भाग्येश शुक्र व चतुर्थेश-सप्तमेश गुरू धनस्थानात आहेत. शिवाय एकादशेश चंद्र पहिले दोन दिवस ता. ५।६ ला धनस्थानात आहे. राहू षष्ठात व शनी अष्टमात. ग्रहांना योगबल आहे पण स्थानबल नाही. सरकारी कामात अपयश येईल. पराक्रमाला कमीपणा येईल. सामाजिक मानमान्यता जाईल. धंदा-व्यवसाय नीट चालणार नाही. सरकारी नोकरांना कामाचा त्रास होईल. फक्त धनयोग चांगलाच आहे. जमिनीच्या व्यवहारात पैसा भरपूर मिळेल. सर्व बाजूंनी पैशाची आवक सबंध आठवडाभर होत राहील. अचानक धनलाभ होईल. वडील बहिणीचे यजमान आजारी पडतील. शुभ तारखा ९।१०।११.

तूळ : या राशीच्या व्यक्तीत दोन टोकाचे स्वभाव असतात. रामही आहेत व रावणही आहेत. या आठवड्यात तृतीयेश–षष्ठेश गुरू, दशमेश चंद्र (ता. ५।६ ला) व अष्टमेश–लग्नेश शुक्र असे शुभ योगकारक ग्रह लग्नी आहेत. हातून पराक्रम चांगला घडेल. भावंडांची मदत होईल. विद्याभ्यासात थोडा कमीपणा येईल. धनेश-सप्तमेश मंगळ, भाग्येश–व्ययेश–बुध व एकादशेश रवी असे एकादशात आहेत. हा योग ४२ च्या पुढे वय असणारांना जास्त चांगला आहे. मित्रमंडळींकडून चांगली मदत होईल. सरकारचा तर पूर्ण पाठिंबा मिळेल. वागणुकीत एक प्रकारची दांभिकता भरपूर येईल. अचानक धनलाभ होईल. हा योग ता. ५।६ ला जास्त आहे. इंडीकेटचे कार्यकर्ते चांगली प्रगती करतील. धंदा–व्यवसाय चांगला चालेल. वाहतुकीचे व्यवसाय करणारांना अमाप पैसा मिळेल. साहित्यिकांचे हातून चांगले लिखाण होईल. शत्रूंकडून सुद्धा मदत होईल. सरकारी कामात यशःप्राप्ती होईल. शुभ तारखा ८।९।१०.

वृश्चिक : या राशीची माणसे हलक्या मनाची व मतलबी व पूर्ण आधिभौतिक वृत्तीची असतात. Any means to one's ends अशा वृत्तीचे त्यांचे वागणे असते. या आठवड्यात तर केंद्र त्रिकोणांचे अधिपती मंगळ–शनी–शुक्र–चंद्र–गुरू–रवी एकमेकांशी शुभ योग करीत आहेत. प्रत्येक बाबतीत यशवंत होणार. सरकारात पुढारीपण मिळेल. मोठ्या मोठ्या राजकीय कारस्थानात अपयश येणार नाही. मानमरातब प्रतिपक्षाकडून सुद्धा मिळेल. मित्रांकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. विद्येत अपयश

येईल. संततीपासून आर्थिक त्रास होईल. वडिलार्जीत मालमत्तेबद्दल वाद उपस्थित होतील. त्यात संपूर्ण यश येईल. जमिनीवर गंडांतर येईल. सुखनाश होईल. पत्नी अगर पती आजारी पडेल. ता. ५।६ ला थोडासा मनःस्ताप होईल. पण स्वभावातच "गिर गया तो टांग ऊंची" ही वृत्ती असल्यामुळे त्याबद्दल खेद वाटणार नाही. शुभ तारखा ८।९।१०।११.

**धन :** अत्यंत महत्त्वाकांक्षी व्यक्ती असतात. ह्या आठवड्यात तर चारही केंद्रांचे अधिपती बुध–गुरू शुभ योगात उदय गोलार्धांत ३।११ योगात आहेत. शिवाय ९।१०।११ चे अधिपती त्याच स्थानात अन्योन्य अवस्थेत आहेत. हा योग स्थिर कुंडलीत असल्यास त्या व्यक्तीला अमाप संपत्ती प्राप्त होते. शिवाय लग्न–धन–सहज सुख या स्थानांचे अधिपती ५।११ स्थानातून एकमेकांवर पाहात आहेत. तृतीयात राहू आहे. असे सर्वच्या सर्व ग्रह अत्यंत शुभ अवस्थेत आहेत. विद्येत यशःप्राप्ती होईल. कलावंतांना पुढे येण्याला वाव मिळेल. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे, ते फारच चांगले आहे. बुध–गुरूच्या गटाच्या अक्षरांनी नावे सुरू असलेले कलावंत पुन्हा एकदा समाजापुढे चमकतील. भाग्योदय होईल. २१ ते २४ वयाच्या व्यक्तींना जास्तच यशःप्राप्ती होईल. धनप्राप्ती चांगलीच होईल. जमिनीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करणारांना अमाप पैसा प्राप्त होईल. शुभ तारखा ६।७।८।९।१०.

**मकर :** या राशीच्या व्यक्ती अनिश्चित स्वभावाच्या असतात. आधी शनीच्या घरातला चंद्र आणि शिवाय स्व-गृहावर पाहणारा. आंधळा. या आठवड्यात त्यांच्या या स्वभावाला पोषक असेच सर्व ग्रह आहेत. लग्नेश चतुर्थात चर राशीत, सप्तमेश (चंद्र) दशमात चर राशीत ता. ५।६ ला. पंचमेश शुक्र दशमात. त्याच्याजवळ तृतीयेश–व्ययेश गुरू, धनात राहू व अष्टमात चतुर्ग्रही अशी शुभाशुभ अवस्था ग्रहांची आहे. नाट्य व्यवसायातील व्यक्तींना मानमान्यता व पैसा मिळेल. विशेष


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

करून सिनेमातील नटवर्गाला चांगले योग आहेत. भाग्यहानी होईल. मित्रांकडून फसवणूक. मिलिटरी पेशातील व्यक्तींना अत्यंत हालाचे दिवस जातील. मेडिकल व्यवसायातील व्यक्तींच्या हातून चुका होतील. नवीन ऑपरेशन्स पुढे ढकलावी. सरकारी कामात अपयश. सरकारी नोकरांना त्रासदायक दिवस आहेत. धननाश होईल. वाचाशुद्धी राहणार नाही. ता. १०।११ ला भागिदारांकडून त्रासदायक वर्तन होईल. उद्योगधंद्यात अनिश्चितता येईल. मनासारख्या गोष्टी घडणार नाहीत. सुखनाश होईल. घरात वृद्ध माणसे आजारी पडतील. शुभ तारखा ५।६।७।८.

**कुंभ** : या राशीच्या व्यक्ती नेहमी परधार्जिण्या असतात. त्यांना दुसऱ्यांचे गुण दिसतात, पण स्वतःच्या घरातल्या माणसांचे गुण दिसत नाहीत. बुद्धिमान, युग-प्रवर्तक असतात. पण स्वजनांबद्दल बेपर्वा. हा त्यांचा दोष आहे. या आठवड्यातील ग्रहमान तर या वृत्तीला पोषक असेच आहे. लग्नी राहू व बाकीचे सर्व ग्रह केंद्र त्रिकोणात. धनेश–चतुर्थेश–भाग्येश–एकादशेश गुरु–शुक्र भाग्यात. तृतीयेश–पंचमेश–सप्तमेश–अष्टमेश रवी–बुध–मंगळ–पंचमात असा सगळा ग्रहांचा तांडा प्रत्येक कामात मदतीला हजर आहे. दुधात साखर. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. श्रीपादरावांनी व इतर सिंडिकेटवाल्यांनी या आठवड्यात कोणतेही धाडसाचे कार्य हाती घ्यावे. त्यात यशःप्राप्ती निश्चित होईल. धनलाभ होईल. प्रकाशक–लेखक–साहित्यिक–कलावंत सर्वांना प्रगतिपथावर नेणारा आठवडा आहे. फक्त एकच एक वाईट योग आहे. तो म्हणजे लग्नातला राहू. आधीचा चिडका स्वभाव जास्त चिडका होईल. त्यावर उपाय दररोज चंद्रदर्शन करावे. सर्व आठवडा शुभ आहे.

**मीन** : स्वार्थत्याग करून दुसऱ्याचे कल्याण करण्याचा स्वभाव. राजे दिलीपच. गुरूच्या गाईचा जीव बचावण्याकरता सिंहापुढे मान करणारे ! त्या वेळचे सिंह देवतातुल्य होते. पण आताची माणसेही हिंसाप्रिय झाली आहेत ! बुध–गुरूचा अक्षर गट devalue झाला आहे. या आठवड्यात सर्व ग्रह अशुभस्थानांत आहेत. दशमेश–लग्नेश–तृतीयेश–अष्टमेश गुरु–शुक्र अष्टमात आहेत. ता. ५।६ षष्ठेश चंद्रही तेथेच आहे. धनेश–चतुर्थेश–षष्ठेश–सप्तमेश बुध–रवी–मंगळ सहाव्या स्थानात शत्रूस्थानात आहेत. असे सर्व ग्रह अशुभ स्थानात आहेत. धननाश होईल. आत्मघातकी विचार वाढतील, भावंडांकडून त्रास होईल. शारीरिक पीडा होईल. मानमान्यतेला धक्का बसेल. वडील माणसांना आजार होईल. सत्य बोलण्यापासून आर्थिक नुकसान होईल. फक्त चंद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे. ते मनाचा खंबीरपणा देईल. शुभ तारखा ८।९।१०।११.

□ □ □

साहेबांना भेटले. मराठी खासदारांशी ते बोलले. पण इंदिराबाई किंवा जगजीवन-राम बाबूंकडे ते फिरकले नाही म्हणतात. इतके ते रागावले आहेत. त्यांची या प्रश्नावर राजीनामा देण्याचीही तयारी आहे. पार्लमेंटपुढे उपोषणास बसण्याचा मनोदयही त्यांनी नुकताच व्यक्त केला आहे. वसंतरावदादा प्रामाणिक आहेत. चव्हाणसाहेब किंवा नाईक यांच्यासारखी कोणती सरकारी खुर्ची अद्याप त्यांना चिकटलेली नाही. त्यामुळे आपले मनोदय ते सहज कृतीत आणतील यात शंका नको. पण त्यांच्या वैयक्तिक कृतीचा तरी दिल्लीवर कितपत परिणाम होईल ?

महाराष्ट्र कांग्रेसची तातडीची बैठक कदाचित पुढल्या पंधरवड्यात भरेल. सीमाप्रश्नाच्या बाबतीत पुढे काय पावले टाकायची याचा विचार या बैठकीत होईल. महाराष्ट्रातल्या सर्व कांग्रेस आमदारांनी, खासदारांनी आणि मंत्र्यांनीही या प्रश्नावर एकदम राजीनामे द्यावेत आणि मोठा पेचप्रसंग निर्माण करावा अशी वसंतदादांची कल्पना आहे. अर्थमंत्री यशवंतराव चव्हाणसुद्धा या कल्पनेला अनुकूल आहेत आणि प्रसंग आल्यास ते स्वतः राजीनामा देण्यास तयार आहेत असे सांगण्यात येते. खरे खोटे कुणास ठाऊक.

वसंतदादा पाटलांचे म्हणणे हे की केंद्राने अजूनपर्यंत महाजन अहवालाला गंभीर असा पर्याय सुचविलेला नाही. वादग्रस्त भागात सार्वमत किंवा लवाद मंडळ हे तोडगे म्हणजे केवळ पाण्यात टाकलेले खडे आहेत. त्यांनी नुसते पृष्ठभागावर तरंग उठतील आणि लगेच विरून जातील. प्रश्न सोडविण्याचा हा निर्वाणीचा प्रामाणिक प्रयत्न नव्हे. कारण हे दोन्ही तोडगे म्हैसूर सरकार अंशतःही स्वीकारणार नाही.

मग महाराष्ट्र कांग्रेसला अभिप्रेत असलेला तोडगा कोणता ? सर्वच्या सर्व वाद-ग्रस्त भाग महाराष्ट्राला देऊन टाकणे हा ? इंदिरा गांधींना हा प्रश्न पार्लमेंटपुढे ठेवावा लागणार आहे आणि अंतिम निर्णय पार्लमेंटवर आहे. इंदिराबाईंच्या नव्या वक्तव्यानुसार त्यांचा विचार महाजन कमिशनच पार्लमेंटपुढे ठेवण्याचा आहे. ज्यांना वाटतील त्यांनी अहवालात दुरुस्त्या सुचवाव्यात. सर्वांना या बाबतीत मतस्वातंत्र्य राहील.

सर्वात व्यावहारिक तोडगा हाच. म्हैसूरचा या प्रकाराला विरोध आहे. पण हा प्रयोग पुढे रेटण्याचा इंदिराबाईंनी प्रयत्न केला तर हा विरोध गळून पडेल आणि सीमाभागाचे भविष्य सर्वस्वी संसद–सदस्यांच्या हाती अवलंबून राहील. महाजन अहवालात कोणते फेरफार करायचे, महाजन अहवाल संपूर्ण स्वीकारायचा की अंशतः फेटाळायचा, न्याय कोणता, अन्याय काय हे सर्व संसदेने ठरवायचे. ज्या

दुरुस्तीला, ज्या विधेयकाला, ज्या ठरावाला अधिक मते पडतील ती सूचना मंजूर. सरळ साधी गोष्ट. बहुमताने निर्णय लागणार.

महाजन अहवाल म्हणा किंवा सीमाविषयक कोणतेही विधेयक शेवटी संसदेसमोरच येणार. हे ध्यानात घेऊन महाराष्ट्राच्या पुढाऱ्यांनी इतर प्रांतीय खासदारांमध्ये कधी कॅनव्हासिंग केले आहे का? बहुतकरून नाही. या उलट म्हैसूर सरकारचे या दिशेने जोरात प्रयत्न चालू असल्याच्या वार्ता आहेत. शिवसेनेच्या कारवायांमुळे दक्षिणेकडच्या चारही राज्यातील सर्वपक्षीय खासदारांची मते या बाबतीत म्हैसूरच्याच बाजूने पडणार हे तर निश्चितच. पण इतर राज्येदेखील महाराष्ट्राच्या बाजूने मते द्यायला कचरतील. आपल्या बाजूने मते ओढण्यासाठी महाराष्ट्राने आपली बाजू सर्व खासदारांना पटवून द्यायला हवी. ही केवळ काँगेसचीच नव्हे तर महाराष्ट्रातल्या सर्व पक्षांची जबाबदारी आहे. विधानसभेत आरडाओरडा करणारे विरोधीपक्ष याबाबतीत काही करतात? आपापल्या पक्षात महाराष्ट्राची बाजू मांडतात? काँग्रेसने आणि विरोधीपक्षीयांनी एकजुटीने याबाबतीत कॅनव्हासिंग करायला हवे. या विषयासाठी सत्ताधारी पक्ष आणि विरोधक एक व्हायला हवेत. म्हैसूरमध्ये तसे झालेले आहे.

सीमाप्रश्न आपणच आतापर्यंत पुढे रेटीत आहोत अशी शेखी मिरविणाऱ्या विरोधी पक्षीयांवर विदर्भवादी आमदार जांबुवंत धोटे यांनी परवा विश्वासघाताचा आरोप केला. ते म्हणाले, या विरोधकांनी सीमा भागातील जनतेचा विश्वासघात केला आहे. विधान सभेचे कामकाज चालू न देण्याचा विरोधी पक्षीयांचा पवित्रा म्हणजे फार्सिकल ड्रामा. या माकडचेष्टांना त्यांनी 'तुरा कुस्ती'ची उपमाही दिली आहे. ते म्हणतात, असल्या चेष्टांनी इंदिरा गांधींवर दबाव येईल असे या लोकांना वाटत असेल तर ते मूर्खांच्या नंदनवनात रहात आहेत.

सीमा भागातले लोक २५ ऑगस्टला विधानसभेवर मोर्चा घेऊन येणार होते. पण त्या दिवसाचे कामकाज बंद पाडण्याच्या धमकीमुळे विधानसभाच बंद होती. त्यामुळे या मोर्चेवाल्यांचा विश्वासघात झाला असे त्यांचे म्हणणे. हा प्रश्न सीमाभागातल्या लोकांचा आहे. ते लोक जेवढा जोराचा आवाज उठवतील तेवढे चांगले. त्यांना साद आणि उत्तेजन देणे हे आपले कर्तव्य. या उलट इकडे आपणच विधानसभा बंद पाडून त्यांचा मोर्चा रद्द करायचा आणि पर्यायाने त्यांचा आवाज दाबून टाकायचा हा कुठला शहाणपणा? सीमाप्रश्नाची निकड महाराष्ट्रातील जनतेला खरोखरच आहे का? धोटे यांचे उत्तर—नाही. ते म्हणतात, महाराष्ट्रातील जनतेला निकड नाही असे म्हटल्याने काही बिघडत नाही. कारण प्रश्न कोणाचा आहे? महाराष्ट्राचा? मुळीच नाही. तो आहे सीमाभागातल्या जनतेचा. त्या लोकांनीच निकड दाखविणे अगत्याचे आहे. पुण्या-मुंबई-नागपूरच्या लोकांनी बेळगाव महाराष्ट्रात आले पाहिजे हे म्हणणे मूर्खपणाचे आहे. बेळगावच्या लोकांनी

तसे म्हणण्याला काही अर्थ आहे. म्हणूनच विधानसभा बंद पाडण्याला काही अर्थ नाही.

धोटे यांच्या बोलण्यात पॉइंट आहे. बेळगावात ओपीनियन पोल घेतला तर त्याची गत गोव्यासारखीच होणार नाही याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही. अर्थात धोटेंच्या म्हणण्यात पॉइंट आहे पण राजकारण नाही. बेळगावकरांचा आवाज कोण उठविणार? म्हैसूर सरकार तर हा आवाज दडपून टाकायला बसले आहेच. बेळगावकरांचीही बाजू कोणीतरी घ्यायला हवी. पण बेळगावसाठी महाराष्ट्रातला जो कुणी उपासासाठी बसेल त्याने आपल्याबरोबर बेळगावचा नगराध्यक्षही घेतला पाहिजे.

धोटे यांच्या बोलण्यातले राजकारण वेगळे आहे. ते विदर्भाचे राजकारण आहे. महाराष्ट्रातले लोक विदर्भ आमचाच आहे असे कितीही म्हणोत. विदर्भातल्या लोकांनी म्हटले पाहिजे आम्ही महाराष्ट्राचेच, हा श्री. धोटे यांच्या बोलण्याचा हेतू. आता या प्रश्नावर श्री. धोटे विधानसभेचे नागपूरचे हिवाळी अधिवेशन बंद पाडणार आहेत म्हणतात.

सध्या सारखे बेळगाव-बेळगाव-बेळगाव एवढे झाले आहे की या विषयाचा वीट येतो. चौदा वर्षं झालीत हा प्रश्न सडत पडला आहे. हा प्रश्न एवढा कठीण आहे. भारत आणि पाकिस्तानची सीमा १९४७ साली लॉर्ड रॅडक्लीफने म्हणे अवघ्या पाच आठवड्यात निश्चित केली, आणि बेळगावला एवढी वर्षं?

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Bi-Weekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649

# अग्निपुत्र

वसन्त पोतदार

प्रसिद्धीकाल : १९७० अखेर

प्रसिद्धीकाल : १९७१ मध्य

रा. म. शास्त्री

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

राजहंस प्रकाशन